PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE NOV 2019

# 'CAMPUS TO COMMUNITY': MAKING STUDENTS SENSITIZED

**DR. D. N. GANJEWAR**
Head, Dept. of English,
A.C.S.College,
Kille Dharur Dist. Beed
**(MS) INDIA**

**Prin. DR. S. Z. SHIRSATH**
Principal,
A.C.S. College,
Kille Dharur Dist. Beed
**(MS) INDIA**

**DR. SHESHAM R. S.**
Asst. Professor,
Department of English,
Deogiri College,
Aurangabad **(MS) INDIA**

## ABSTRACT

*In the present scenario, it has become an utter need to foster in the students the values that Education carries with it. Merely grabbing the degrees and grades will not be sufficient for students to become a human being. In the educational institutes, any students enhances his/her knowledge, however, at the same time the dimensions of thought process also expand; they are to be directed in a right way so as to make students able to lead a better social life. The present paper focuses on NSS unit as one of the best means of exposure in higher educational institutes for students to come front as human beings. Any society comprises of individuals with different kinds of needs. Some components of the society need to be paid more heed for various reasons. At such a juncture, an NSS unit of the colleges can play vital role in providing a helping hand to such communities.*

## INTRODUCTION

> *"Great men come and go, but what remains behind are some unforgettable impressions and heroic deeds, which transform the society for good."*
>
> **Mother Teresa**

Service to community is service to nation. Many a great scholars and philosophers talked at length about the importance of community service for social and national development. The great social leaders like Mother Teresa, Ishwar Chandra Vidyasagar, Dr. B. R. Ambedkar, Mahatma Gandhi, Raja Ram Mohan Roy, Gagde Maharaj, Vinoba Bhave, Baba Amte, and many more dedicated their entire life for social cause as they knew unless society is uplifted, national progress would be a nightmare.

Hence, social awareness can be crated amongst the students at the early ages of education so as to make them sensitive towards problems and trauma of the people. This can be best done NSS unit in the college. Moreover, NSS as an extension component of higher education was accepted by the UGC in 2006, it is imperative to study the philosophical and practical aspects of extension education, implemented through the NSS.

Nevertheless, extension education and services is not a novice term or concept. Right from the ancient Indian educational system this has emerged and practiced by pupils in ‘Gurukuls’. The ultimate objective is to channelize youth energy for the national reconstruction by revamping higher education using an independent medium- NSS. As a matter of fact, NSS is a “campus to community” programme under the Ministry of Youth Affairs and Sports, Government of India. And today, NSS has been accepted as one of the important programmes in the ‘New Education Policy’. The National Service Scheme is a student–centred programme complementary to education. It is a noble experiment in academic extension. It inculcates the spirit of voluntary work among students and teachers through sustained community interaction. It brings the academic institutions closer to the society and serves as a link between the campus and the community, college and village, knowledge and action. The overall aim of NSS is the Personality Development of Students through Community Service. It gives an extension dimension to higher education system and orient the student youth to community service.

Extension work, the third dimension of education, plays a vital role for bringing about a social transformation. The Extension Education Programme (EEP) has been introduced through National Service Scheme (NSS). Under the auspices of the NSS, teachers and students visit underprivileged sections of the community near educational institutions.

The educational institutions and teachers have a well-defined role in this regard to offer their selfless services and also by their conduct inspire their students engage in NSS activities in pursuance of the mission. The students have to realize the dignity of manual labour and make themselves available for the service of the people in distress. It extends the fruits of higher education from the campus to the wider community. Community service is a voluntary affair and one spends time and energy apparently without any material compensation.

The NSS in our social context has an added significance. Notably enough, NSS in professional education institutions has been transferring technology to practical use for the benefit of the community and ultimately for national reconstruction. The other components include: (a) creating public awareness in social issues. (b) Imparting education to the deprived sections through non-formal educational programme. (c) developing curricular linkages between fieldwork and action. NSS enables students to receive information of all social components society. It is one of the successful methods to have a glimpse of rural India through various NSS activities.5The exponents of education examined the extension component of higher education and made attempts to link education with community through NSS activities.

Extension education also covers activities related to rural and urban community development that grows from the needs of the people, and thus considered community education. For example: sensitisation programme on blood donation. The extension education is being developed as a specific field including research, teaching and field activity.

**Objectives of Extension Education**

Extension is generally conceived at two levels: extension education and extension service. These two levels of extension are interrelated, simultaneously maintaining their separate identity. For example, the NSS extension work provides learning experience to student volunteers and service to the community at the grassroot level. However, the fundamental objective of extension is to develop the rural people economically, socially and culturally by means of education. The general objectives of extension are:

- To assist people to discover and analyse their problems and identify their felt needs.
- To develop leadership among people and help them in organizing groups to solve their problems.
- To disseminate research information of economic and practical importance, useful for the people.
- To assist people in mobilizing available resources.
- To collect and transmit feedback information for solving management problems.8

**UGC Concept of Extension**

The higher education system is indisputably obligated to disseminate knowledge to a multitude of people. The policy statement of the UGC declares that if the higher education system has to discharge its responsibilities to the entire educational system and to the whole

society, it must assume extension as the third important responsibility and offer same status as given to research and teaching. Extension primarily aims at establishing links with the community to identify their needs and problems so that science and technological knowledge, ethics and morals, politics and administration, business and trade development generated in higher education institutions is best utilized in fulfilling public demand and resolving their problems.

University extension represents attempts to extend educational opportunities to those who were unable to attend higher learning institutions and to render specialized educational services to different sections of society. The UGC policy statement (1982) divides extension activities into two broad categories, extension services to schools and colleges. The University should work with the colleges, which, in turn, work with the secondary, and elementary schools in their neighbourhood and help improve standards by in-service teacher education, sharing facilities, student enrichment programme and talent discovery. The development of Research and Development programme for the education system is also a special responsibility of the universities.

In the higher education system, the functions assigned are based on production and sharing of knowledge within the system, increased access to theoretical knowledge and much less testing of their socio-economic viability. If knowledge sharing has to be broad based and the knowledge generated has to be tested, extension must be considered a major approach to accomplish the objectives.

**CONCLUSION**

The NSS is aimed at offering opportunities to the students to expand valuable practical experience in society and to break the walls that divided the institutions of higher learning from the common people that the students are moulded better citizens. After a thorough analysis of the extension dimension of higher education, it is well established that as a single and all India level agency, the NSS has been contributing significantly in making higher education at the doorsteps of the common people. Thus, NSS is actively engaged in the process of national development facilitating benefits of higher education to the less advantaged citizens of the country. In the above circumstances, NSS is discharging yeoman service to fill the wide gap of education. Thus, NSS can be considered as a gap filling mechanism of higher education intending the integrated development of the country. Therefore, the NSS is to be promoted by the Government and the public.

# REFERENCES:


- *UGC on NSS*, Ministry of Human Resource Development, New Delhi, 2002.
- *Campus to Community, Twenty Five Years of NSS*, Government of India, New Delhi.1994.
- Reghu V., *The Concept of Extention and its Application in the University Education System*, Vikas Publishing House New Delhi 1998.
- Supe, S.V., *An Introduction to Extention Education,* Oxford and IBM, Bomby, 1983.

**IMPACT FACTOR:4.197(IIJIF)** **ISSN: 2454-5503**

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

**VOL. 6** **ISSUE 5** **SEPTEMBER - OCTOBER 2020**

A Bimonthly Peer Reviewed International Journal

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies

*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

***Co- editors***
Dr. Sadhana Agrawal (Gwalior)
Pandurang Barkale (Mumbai)
Dashrath Kamble (Kalyan)
Bharat Gugane (Nashik)

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor**: 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor:*
**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal**, Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr. Dashrath Kamble**, Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr. Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded
**Dr Rajiv Kumar,**
Associate Professor, Dept. of English, S.K.M University, Dumka, Jharkhand
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Dr Ramkishan Bhise,** Assistant Professor, SIES Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| **Subscription Rates** | |
|---|---|
| | Annual membership (Individual) Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

# CONTENTS


1. Parsi Theatre: Torch Bearer of Nationalism during Freedom Struggle of India
**Dr. Ghanshyam Beniwal** 04
2. Bellary Raghava-The Legendary Indian Dramatist
**Dr. K. Hanumantha Rao** 07
3. Samuel Beckett- Theatre of the Absurd: A Study
**Dr.Chandrashekhar Bapurao Kanase** 09
4. Ethical Researches undertaken on 'Traditional Dance and E- learning' (to help the present situation of Covid-19)
**Dr.Chethana Radhakrishna.P.M.** 14
5. Understanding Dramatic Content is an Art
**Dr. Birju Shyam** 17
6. Konnakkol: Rhythm cognition through Vocal Percussion in South Indian Karnatic Music
**Mannarkoil J Balaji** 22
7. Usage of metronome in Abyasa gana of Carnatic music
**Dr. B. Radha** 28
8. Tradition of Masks in Indian folk theatre
**Dr. Anjna Goswami** 31
9. The Trinty Of Kuchipudi Dance
**Dr. Anith Hodlur** 34
10. Maryada Puroshottam Ram: Role play in the stories of Kathak and its presentations
**Dr.Ruma Shil** 36
11. Dance Choreography:A Study Based On Mohiniyattam
**Akhila G Krishnan** 39
12. From Ritual Performance to Competition Item: Perils of a Tradition in Transition
**Dr. Joly Puthussery & Ashok Oliyakkal** 44
13. Growth of Bharatanatyam during the Anti-Nautch movement of Colonial Era, through the famous Gurus & their Banis.
**Dr.K.Kumar** 48
14. Performing Arts – An encounter with devotion
**Dr. N. Bhairavi & Dr. S. Radhakrishanan** 50
15. Theatre the domain of Humanities
**Dr. Bh. Padmapriya** 52
16. Body Movement & Voice Speech
**Dr. B. Pillappa** 55
17. Kuchipudi Bhagavatas, Melattur Bhagavatas Presentation Methods: A Comparative Review
**Ratnashree Sudhakar** 59
18. Islam and Terrorism in post 9/11 literature: Focusing on Mohsin Hamid's *The Reluctant Fundamentalist*
19. **Ms. Yogita Vijay Kulkarni** 61
20. भूगोल विषय के सन्दर्भ में साहचर्य अधिगम की सार्थकता एवं उसका छात्रों की अवधारणा पर प्रभाव का अध्ययन
**डॉ0 प्रकाश चन्द्र निषाद** 65
२१. दलित कथा: स्त्री जीवनाचा प्रवास
**प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ** 68

**20**

# दलित कथाः स्त्री जीवनाचा प्रवास

**प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ**
म. शि. प्र. मंडळ संचलित,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
किल्ले धारुर, जि. बीड. भ्रमणध्वनी ९९६०१४२१५५

**१. प्रास्ताविकः**मराठी साहित्यात ग्रामीण, कामगार, बाल, प्रादेशिक, स्त्रीवादी साहित्य असे साहित्य प्रवाह विकसीत होत असतानाच दलित साहित्याचा प्रवाहही १९६० नंतर खऱ्या अर्थाने विकसित होताना दिसतो. या दलित साहित्याच्या प्रवाहाने सर्वच साहित्य प्रवाहाना नवे तेज, झळाळी, नाविन्य आणि क्रांतित्वाची चेतना दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा या मूलमंत्राने, बाबासाहेबांचा विचार ही दलित साहित्याची प्रेरणा ठरली. हजारो वर्षांपासून गुलामीत, अत्याचाराने पिचलेला दलित समाजाला आत्मभान आले. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव झाली. त्यामुळे पारंपरिक समाजव्यवस्थेला नकार आणि एका नव्या समताधिष्ठित समाजव्यवस्थेचा स्वीकार करताना हा समाज दिसतो. विद्रोह आणि नकार हा दलित साहित्याचा स्थायीभावच बनला. यातून दलित साहित्यिकांनी सर्वच साहित्य प्रकार हाताळले. पारंपरिक साहित्याची आशय आणि अभिव्यक्ती त्याने बदलली. दलित काव्य, कादंबरी, नाटक, आत्मकथन याप्रमाणेच दलित कथाही तितकीच नावारुपाली आली आहे.

**२. दलित कथाः स्वरुपः**दलित साहित्यात सर्वात लोकप्रिय साहित्य प्रकार म्हणून दलित कवितेकडे पाहिले जाते. आपली वेदना जोरकसपणे हृदयापर्यंत पोहोचविण्याची ताकद या साहित्य प्रकारात असल्याकारणाने दलित कविंनी काव्य हा साहित्य प्रकार हाताळला आहे. त्याचप्रमाणे एकच आशय केंद्राला वेगवेगळे आयाम, कमी व्यक्तिरेखा, प्रसंग, संवादातील काव्यमयता व सामर्थ्यशाली आशय यामुळे दलित कथेनेही आपला एक स्वतंत्र ठसा, वेगळी स्वतंत्र ओळख दलित साहित्यात निर्माण केली आहे.

प्रारंभीच्या काळात काही दलितेतर लेखकांनी दलित जीवनावर कथालेखन केलेले दिसते. यात श्री. म. माटे, व्यंकटेश माडगुळकर, साने गुरुजी, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, चारुता सागर यांचा उल्लेख करता येईल.

क्रांतिसुर्य डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने दलित समाज बदलत होता. जीवनाच्या सर्वच अंगात परिवर्तन होत होते. त्याचे आंबेडकरी विचारांचे पडसाद दलित कवितेत दिसत होते. डॉ. आंबेडकरांच्या जीवन कार्याबरोबरच दलित कथेची निर्मिती होत होती. ना. रा. शेंडे, नारायण शिवजनकर, यादव भिकाजी गांगुर्डे, हिंदू गोविंद बनसोडे, तुकाराम अंबादास पुरोहीत या लेखकांनी दलित जीवनातील दुःख, वेदना चित्रित करण्याचा व दुःखाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. पुढे ही दलित कथा अधिकच बहरास आली. यात शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे,बाबुराव बागुल यांच्या पासून तर आजच्या तरुण दलित कथाकारांनी दलित कथेची एक समृद्ध परंपरा निर्माण केली आहे.

दलित साहित्यातील वेदना, विद्रोह, आत्मशोध, नकार, आत्मभान, विज्ञाननिष्ठा, आत्मजाणीव, मानवतावाद, लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता, समूहनिष्ठा-सामाजिकता, विषताधिष्ठित समाजरचनेचा विरोध आणि एका नव्या समताधिष्ठित समाजरचनेचा स्वीकार इ. हीच तत्वे दलित कथेमध्येही दिसून येतात.

हजारो वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने वंचीत , मागास, शोषित पिडीत, नाडला व गाडला गेलेला, माणूस म्हणून ज्याचे अस्तित्वच समाजाने नाकारले असा दलित समाज होय. अशा दलित शोषितांची जीवन जाणीव चित्रित करणाऱ्या कथांना दलित कथा म्हणता येईल. दारिद्र्य, उपासमार, भूक, अन्याय, अत्याचार, शोषण, अमानुष वागणूक, पोटासाठी वनवन, लुबाडणूक, उपभोग्य वस्तू म्हणजे दलित स्त्री, गावकुसाबाहेरच्या जीवनाचे दर्शन दलित कथेत होताना दिसते.

प्रारंभीच्या काळात जनता आणि प्रबुद्ध भारत या साप्ताहिकातून प्रसिद्ध होणाऱ्या दलित कथा सद्यस्थितीतीत नियतकालिके, मासिके व पुस्तकरुपाने प्रकाशित होत आहेत. दलित जीवनातील नानाविध विषयाची व्याप्ती असणाऱ्या दलित कथेचा प्रवास एक समृद्धतेकडे होताना दिसतो.

**३. दलित कथेतील स्त्री जीवनः** दलित कथाकारांनी दलित जीवनातील विविध विषय, आशयाचे चित्रण केलेले आहे. दलित स्त्री ही दलितापेक्षाही दलित आहे. धर्म व जातीचा श्रेष्ठ-कनिष्ठता, धर्माच्या नावावरून होणारी लुबाडणूक, अडवणूक, स्त्री-पुरुष विषमता, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विषमता, सावकार जमीनदारांचा माजोरीपणा, भूक, दारिद्र्य, दुःख, व्यथा-वेदना, दारुड्या नवऱ्याचा त्रास, पोटासाठी करावे लागणारे विविध व्यवसाय, स्त्रियांवरील बंधने इ. अशा बहुविध विषयाचे चित्रण दलित कथेने आतापर्यंत केलेले आहे. या सर्वच विषयांमध्ये दलित स्त्री या ना त्या कारणाने सफर होताना दिसते.

दैनंदिन जीवन जगताना दलित स्त्री विविध भूमिकेतून वावरताना दिसते. मुलगी, पत्नी, माता याबरोबरच नवरा व उच्चवर्णीयांच्या छळाला बळी पडणारी, प्रसंगी अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारी, कुटुंबाचा गाडा ओढणारी, कुटुंब प्रमुख, डॉ. आंबेडकरांचे विचार अंगिकारणारी, शिक्षणासाठी धडपडणारी, संघर्ष, क्रांतिकारक, परिवर्तनशिल, आधुनिकता व जागतिकीकरणाला सामोरी जाणारी, काळानुरूप बदलणारी ही दलित स्त्री समाजातील इतर स्त्रियांना प्रेरणादायी व नवी दिशा देणाऱ्याच आहेत.

**३.१. अण्णाभाऊ साठे:** अण्णाभाऊ साठे यांनी एकापेक्षा एक दमदार कथालेखन केले. 'खुळवाडी', 'बरबाद्या कंजारी', 'आबी', 'भानामती', 'कृष्णाकाठच्यो कथा', 'ठासलेल्या बंदूका', 'गुऱ्हाळ', 'निखारा', 'नवती', 'जिवंत काडतूस', 'राम रावण युद्ध', 'रानवेली', 'भूताचा मळा', 'फरारी', 'पिसाळलेला माणूस', 'चिरागनगराची भूतं', 'लाडी', 'अमृत'इ. त्यांचे गाजलेले कथासंग्रह होत. अण्णाभाऊंच्या कथेचे सामर्थ्य नोंदवताना डॉ. बाबुराव गुरव म्हणतात,"समाजजीवनातल्या उपेक्षितांचे रसस्थीत जीवन अण्णाभाऊंनी बोलके केले. माकडाच्या पातळीवर असलेल्या लोकांना साहित्यामध्ये माणसांच्या बैठकीवर आणून बसविले. अण्णाभाऊंची मराठी साहित्य क्षेत्रातील दलित साहित्याचा विकास म्हणून सर्वात मोठी कामगिरी होय."[१] त्यांचे हे मत रास्तच म्हणता येईल.

भारतीय समाजव्यवस्थेत दलित स्त्रिया सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, इत्यादी दृष्टींनी नाडलेल्या, शोषित, पीडित असलेल्या, प्रसंगी पारंपरिक समाजव्यवस्था नाकारणाऱ्या, डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या, स्वाभिमानी, पोटाला अन्न, कपडा, आणि निवारा या गरजा पूर्ण करण्यासाठी दिवसरात्र राबणाऱ्या, वेश्यावृत्ती असणाऱ्या, काही चंचल स्वभावाच्या, अठरापगड जाती-जमातीतील स्त्रिया अण्णाभाऊंच्या कथेच्या विषय झाल्या आहेत. आबी, लाडी, मिरा, सोनी, रूपा अशा अनेक स्त्रिया वाचकांच्या लक्षात राहतात. म्हणून डॉ. प्रकाश खरात लिहितात, 'या त्यांच्या स्त्रीदर्शनाने किंवा व्यक्तीदर्शनाने मराठी कथासृष्टीत नवी सांस्कृतिक वसाहतच निर्माण केली आहे.'[२] खऱ्या अर्थान वास्तववादी स्त्री जीवनदर्शन अण्णाभाऊंच्या कथांमधून घडते.

**३.१.१. निल्ली:** 'बरबाद्या कंजारी' या कथेतील बरबाद्याची मुलगी 'निल्ली' मोठी गुणी मुलगी उपवर झाल्यावर आपल्या कंजारीभाट जातीतील मुलाला तो देतो. कालांतराने मुलगा आजारी पडून मरतो. निल्ली विधवा होते. कालांतराने निल्ली हैदऱ्याबरोबर पळून जाते, म्हणून बरबाद्याला जातपंचायत वाळीत टाकतात. जातपंचायत विरूद्ध बरबाद्या असा संघर्ष होतो. बरबाद्याला आपल्या मुलीची बाजू बरोबर आहे, असे त्याला वाटते.

**३.१.२. गीता:** 'डोळं' या कथेतील 'गीता' निर्मळ, पवित्र सुंदर स्त्री आहे. जन्मतःच मिळालेले सुंदर डोळे हेच तिचे जीवन उद्धवस्त होण्यास कारणीभूत ठरतात. 'वहिणी तुमचे डोळे फार सुंदर आहेत, मी तुमच्या डोळ्यावर फारच खुश आहे.' अशा म्हणणाऱ्या दिराला गीता म्हणते, 'मी तुमच्या भावाची बायको आहे आपल्या नात्याचं भान ठेवा.' संवाद चालू असता तिचा नवरा येतो, त्याचा संशय वाढतो. याचा परिणाम म्हणून ती डोळ्यांचे नुकसान करुन घेते. स्वतःची अब्रु महत्वाची हेच यावरून दिसून येते.

३.१.३. **चिमा:** 'वळण' या कथेतील 'चिमा' महारीन इतर महारांनी रेड्याचे मास खाणे सोडून दिले तरी आपल्या जुन्या वळणाप्रमाणे चिमा म्हतारी रेड्याचे मास खाणे सुरूच ठेवते. चिमा पारंपरिकतेला कशी चिकटून आहे. जुन्या नव्याचा संघर्ष अण्णाभाऊंनी वास्तवपूर्ण रेखाटला आहे.

३.१.४. **फुला:** 'निखारा' या कथेतील 'फुला' ही गरीब डंगाऱ्याची दुर्दैवी, दरिद्री, सुंदर मुलगी फुलाच्या दारिद्र्यामुळे ती शेवटी ती वनवासी बनते. फुलाच्या सौंदर्यावर भाळलेला आणि विठोबाच्या दारिद्र्याचा फायदा घेणारा पाटलांचा गुंड्या तिच्यावर कशी वाईट नजर ठेवता याचे चित्रण या कथेत केले आहे.

एकूणच, अण्णाभाऊंच्या कथेतील 'स्त्री' विलक्षण विचार करणारी, खानदानी, शील सांभाळणारी, पवित्र मनाची, जिवाला जीव देणारी आहे. तसेच 'लाडी' कथासंग्रहातील चंदा, बिलवरी, राधा कृष्णा या धाडसी स्त्रिया आहेत. तर भुकेसाठी भांडणाऱ्या, जातीच्या स्वाभिमानापोटी वळण बदलणारी चिमा महारीण, नवऱ्यापेक्षा भोमक्या सारख्या अक्राळविक्राळ माणसाबरोबर संसार करणारी सुंद्री, आपल्या सौंदर्यानर जगाला भुरळ पाडणाऱ्या 'सुभद्रा' नी 'लिला' (प्रायश्चित - बरबाद्या कंजारी) सारख्या स्त्रिया आहेत. ''दारिद्र्यामुळे पोटासाठी भोगावे लागणारे दुःख हा साठ्यांच्या कथेचा स्थायीभाव आहे'[३] असे डॉ. छाया निकम लिहितात ते अगदी खरे आहे.

**३.२. शंकरराव खरात:** दलित साहित्याला दिशा देणारे एक विचारवंत म्हणून शंकरराव खरात यांचे नाव घेतले जाते. त्यांनी 'तडीपार', 'सांगावा', 'टिट्वीचा फेरा', 'सुटका', 'दौंडी', 'आडगावचं पाणी', आणि 'गावशीव' असे कथासंग्रह लिहिले आहेत. डॉ. प्रकाश कुंभार लिहितात, 'एका व्यापक अशा समाजशास्त्रीय भूमिकेतून ते जीवनाचा, दलित जीवनाचा आणि साहित्याचा विचार करतात. खरातांची कथा हा

दलित कथेच्या जडणघडणीच्या काळापासून तिच्या विकासाच्या वाटचालीतील एक माईल स्टोन ठरणारी आहे.'[४] खरातांच्या कथेत बारा बलुतेदारांपासून गावगाड्या बाहेर राहणाऱ्या भटक्या दुर्लक्षित ठरलेल्या स्त्रियांचे जीवन चित्रित केलेले आहे. म्हणून गंगाधर पानतावणे म्हणतात की, 'खरातांचे कथाविश्व म्हणजे दुर्लक्षित अनुभवांचे विश्व?'[५] ते अगदी खरे आहे.

तुलनात्मकदृष्ट्या इतर दलित कथेचा विचार करु पाहता शंकरराव खरातांच्या कथेतील स्त्रिया पुरूषांपेक्षा बंडखोर आणि विद्रोही आहेत. परंपरिक व्यवसाय त्या नाकारतात. या संदर्भात डॉ. प्रकाश कुंभार म्हणतात,'खरातांच्या कथेतील स्त्री पात्रे ही पुरुष पात्रांपेक्षा बंडखोर असलेली दिसून येतात. त्या परंपरेच्या व्यवसायाला नकार देतात. गावकीच्या कामाबद्दल आपला विद्रोह प्रकट करतात. त्यांना हे गुलामीचं जीवन नको असते म्हणून त्या नवऱ्याबरोबर संघर्ष करताना दिसतात. त्यामुळे खरातांच्या कथेतील स्त्रिया पुरुष पात्रापेक्षा प्रभावी वाटतात.'[६] बाबासाहेबांच्या विचाराने पेटून उठलेल्या काही स्त्रिया गावकीच्या कामाला नकार देतात. तर काही कथामध्ये लाचार, अगतिक, स्त्रियांचे जगही पहावयास मिळतै. यात वेश्याव्यवसाय करणाऱ्या, तमाशातील स्त्रिया, रूढी, परंपरेनुसार मुरळी, देवदासी, जोगतीण या नावाने देवीला सोडलेल्या, गरिबी, दारिद्र्य, यामुळे लाचारीनो पुरूषांच्या वासनेला बळी पडलेल्या इ. शंकरराव खरात यांनी केवळ कल्पनेने रंगवून कथा लिहिल्या नाहीत, तर वास्तवाचा अनुभवच त्यांनी घेतला आहे. या संदर्भात ते आपल्या आत्मचरित्रात लिहितात, 'मी मोकळेपणाने वेश्यांच्या आळीत वस्तीत जात होतो. त्याचवेळी चारशे वेश्याच्या मुलाखतीही घेतल्या होत्या. त्यातील शंभर वेश्याच्या मुलाखती तर अतिदुर्मिळ होत्या. वेश्यांना कशा भयानक जीवनातून जावे लागते. याची त्यात हृदयद्रावक, हृदयभेदक अस्वस्थ करणारी माहिती होती.'[७]

काही प्रातिनिधिक स्त्री व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील-

**३.२. १. इंद्रा:** 'कोल्हाटी' कथेतील इंद्रा ही सुंद्राची मुलगी असून दैवाला कौल लावून धंद्याला लावते. अण्णा नावाच्या प्रतिष्ठित व्यक्तीकडू.न इंद्राला दिवस जातात. सुंद्राला पैसा आणि अण्णाला इंद्रा, असे ते समीकरण जमते. पण इंद्राला मात्र मातृप्रेमाचे वेड लागते. ती या मुलाला जन्म देऊ इच्छिते. इंद्राला दिवस गेल्याची वार्ता सगळ्या गावात पसरते. पंचायत इंद्राच्या आई-वडीलांना वाळीत टाकण्याचा निणग्य देतात. पण, आम्ही पोरीला सोडू पण भावकी सोडणार नाही असे ते सांगतात. तिच्या मुलाचा सांभाळ गुणवंत मास्तर करतो. संवेदना नसलेला समाज, आईवडीलांचा स्वाथीपणा व कपटी अण्णा यामुळे इंद्राची झालेली घुसमट या कथेत दिसते.

**३.२. २. चंद्रा:** 'आयना' कथेतील चंद्रा मुरळीची कथा ही इंद्रासारखी अस्वस्थ करणारी आहे. तिला आपली दोन रूपे दिसतात. एक ऐन तारूण्याने मुसमुसलेली, दागिन्याने मढलेली सुंदर चंद्रा, तर दुसरी अंगावर चिंध्या असलेली तोंडावर सुरकूत्या पडलेली निस्तेज चेहऱ्याची चंद्रा अशी दयनीय परिस्थिती चंद्राच्या रूपाने खरातांनी साकारली.

**३.२. ३. लक्षी:** 'धोंड्या बेरडं' कथेतील लक्षी ही धोंड्या बेरडाची बायको आहे. लक्षी संसाराचा विचार करणारी, नवऱ्याला साथ देणारी चित्रित केली.

**३.२.४. धुरपा:** 'डाव' कथेतील धुरपा ही ऐन दुष्काळातही आपल्या पडीक जमीनीच्या आधारे संसार सावते आणि प्रसंगी आपल्या नवऱ्यालाही धीर देते अशी ही धुरपा लक्षी सारखी संसाराला हातभार लावण्यासाठी धडपते.

**३.२.५. सारजा:** 'नवस' कथेतील 'सारजा' ही स्त्री. 'देवी माता! पोटपाणी पिकूं दी व माज्या लेकरा बाळांवर तुजी सावली असू दी. ''मी म्होरल्या साली तुज्या म्होरं कोंबड कापीन अन् तुज्या दारात चार पै-पावण्याची पंगत घालीनं.'' असा नवस तात्यानं मरीआईला केला होता आणि तो नवस फेडण्यासाठी तात्या नाईक पाटलाचं कोंबड चोरून आणतो. या कथेतून अंधश्रद्धेपोटी 'स्त्री' वाटेल ते करायला कशी तयार होते याचे चित्र या कथेत आले आहे.

त्याप्रमाणे 'सांगावा' या कथेतील 'साऊबाई' रामा महाराची पत्नी असून पांरपरिक रूढी, परंपरेला केला जाणारा विरोध आणि पोटापाण्याची चिंता यात चित्रित केली आहे. 'भानगड' या कथेतील गुणाबाईची पोरगी कलावती मास्तराबरोबर पळून जाते. आपली अब्रु गेली म्हणून जीवाचे बरे-वाईट करून घेते. गुणाबाई स्वाभिमानी वृत्तीची, शीलाला महत्व देणारी आहे. 'जोगतीण' या कथेतील 'शीला' ही रूढी, परंपरेने ग्रासलेल्या समाजाला बळी पडलेली, शिकलेली, सुसंस्कृत शीलाची व्यथा आहे. 'लागीर' या कथेतील 'तानी' ही

अंधश्रद्धेचा बळी ठरलेली आहे. 'वासना' या कथेतील 'अंजू' ही विधवा मोळ्या विकून मुलांना जगवित असते आणि देवळासमोर झाडलोट करून आपण व मुलांना शिळेपाके खाते. पण सवर्ण भटांच्या वासनेची शिकार होते. मंदिरात प्रवेश न देणारा पुजारी दलित स्त्रिला भोगतो. अशी अस्वस्थ करणारी ही व्यक्तिरेखा आहे. 'धुराळा' या कथेतील पोटाची भूक भागविण्यासाठी जिवाचं रान करणारी स्त्री गिरजा. 'ओळख' कथेतील 'बाई' आपल्या नवऱ्याला झालेला रोग बरा होण्यासाठी महादेवाला नवस करते. 'टँऽ टँऽऽ' कथेतील असहाय्य विधवेची झालेली फसवेगिरी. 'बेलदार' या कथेतील 'धुरपा' ही खंडा बेलदार याची बायको धुरपा मुक्या प्राण्यावर दारिद्र्यातही प्रेम करते. 'डोंबारी' या कथेतील 'चिमाची बायको' मुलगा, मुलगी पोटासाठी परंपरेचा डोंबाऱ्याचा खेळ करतात. 'रोजगार' कथेतील 'गिरीजा' ही असहाय्य झालेली नवऱ्याच्या पश्चात मुलांचे पोट भरण्यासाठी धडपड करते. 'काळ' या कथेतील धुरपा, 'सुटका' या कथेतील गणा हमालाची बायको, 'पालखीचं दर्शन' या कथेतील सुंद्रा, 'बाभळीचे काटे' या कथेतील नामाची बायको, 'जे का रंजले गांजले' या कथेतील सोना इ. अशा दलित जीवनातील समस्या, जाती जमातीतील स्त्रियांचे दर्शन शंकरराव खरातांच्या कथांतून घडते. म्हणूनच भालचंद्र फडके लिहितात, "या तऱ्हेच्या कथा वाचू लागलो की, वाटते स्वातंत्र्य आले तरी काही मूठभर सुखात, संपत्तीत, लोळत आहे आणि बहुसंख्य गोरगरीब तसेच अज्ञानात होरपळत आहेत."[८]

**३.३. बाबुराव बागुल:** बाबुराव बागुलांनी 'जेव्हा मी जात चोरली' व 'मरण स्वस्त होत आहे' हे त्यांचे कथासंग्रह होत. त्यांच्या कथांमधून स्त्रीची विविध रूपांचे चित्रण आलेले आहे. हे स्त्रीदर्शन स्वतंत्र भारतातील शोषण व्यवस्थेतील स्त्रियांचे आहे. 'त्यांच्या कथेतील स्त्रिया काहीतरी जीवन मूल्ये घेऊन जगत असताना दिसतात. '[९] असें डॉ. छाया निकम म्हणतात. बागुलांच्या कथेत अनेकविध प्रकारच्या स्त्री व्यक्तिरेखा आहेत. म्हणून डॉ. प्रकाश खरात लिहितात, 'त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखा एकूणच मराठी कथासृष्टीत निरनिराळ्या ठरल्या आहेत.'[१०] हे खरे आहे. त्यांच्या कथेतील आशयसूत्र काल्पनिक नसून वास्ववादी आहे.आपण कथालेखनाकडे कसे वळलो याविषयी ते म्हणतात, 'मला येणारे अनुभव केवढे दाहक, केवढे थरारक आणि दुभंगून टाकणारे होते ह्या अनुभवांची अंतःकरणात होणारी निर्मिती मात्र एखादे सूत्र, एखादी भावना, राग, दुःख, खिन्नता, निराशा अथवा वासना, प्रेम होत असे. बहुधा त्या सर्व भावना शेवटी करुणा, प्रेम अथवा काव्य, संवाद, स्वगतात आकारत...मलाही आत चाललेली अनुभवातली आगडोंब विझवून टाकणारी त्रुटित निर्मिती नको होती. मी ठरवून टाकले, आता विचार कथेत करायचा.. .. . .मनातल्या मनात कथा जमू लागल्या.. .. आणि कथांचा समुद्र खेड्यापाड्य ातून, माणसामाण्सांकडून माझ्याकडे धावू लागला.' [११] आपल्याला जन्मामुळे जात मिळाली, तरी आपण सर्व जाती-जमाती आणि सर्व धर्मांचा झालो आहे, तेच माझ्या कथेचे विषय होत, अशी एक व्यापक मानवतावादी भूमिका बाबुराव बागुलांनी घेतलेली दिसते.

**३.३.१ बानू:** 'काळोखाचे कैदी' कथेतील बानू ही अस्पृश्य समाजातील एका गरीबाची मुलगी आहे. खंडोबाच्या नवसामुळे झाली म्हणून तिचे नाव 'बानू' ठेवले. नवसाप्रमाणे तिला मुरळी म्हणून सोडले. त्यातून तिच्या वाट्याला दुःख आणि अवहेलनाच आली.

**३.३.२ गिरीजा:** 'वाटेवरची' कथेतील गिरीजा गरिबीमुळे शरीर विक्रय धंदा करणाऱ्या स्त्रीची करुण कहाणी आहे.

**३.३.३ सावित्री:** 'पेसूक' कथेतील सावित्री ची करूण कहाणी आहे. शेकडो एकर जमीन असलेल्या नपुसक जयदेवाला मुलगा होत नाही म्हणून पाच लग्ने करतो मात्र मूल होत नसल्यामुळे सुंदर अशा सावित्रीशी लग्न करतो. पतीच्या इच्छेखातर दुसऱ्याशी संबंध ठेवून जयदेवला मूल देते. मात्र ही गोष्ट गावभर पसरताच जयदेव तिचा अनन्वीत छळ करतो. ती पुरूषवृत्तीचा खात्मा करण्याची 'पेसूक' बनते. असे असल्यावरही ती जयदेवच्या मृत्यूनंतर सती जाते. अशाप्रकारे स्त्रीवरील अन्याय, अत्याचाराचे चित्र प्रस्तुत व्यक्तिरेखेवरुन दिसते.

**३.३.४ वंचाळा:** 'लुटालुट' कथेतील वंचाळाच्या रुपाने एका वेश्यांचे दैन्य दर्शविणारी पोटासाठी धंद्यास मजबुर करणारी ही व्यक्तिरेखा आहे. यावर भालचंद्र फडके लिहितात, ''बागुलांच्या कथेतून साकार होणारे जग पांढरपेशा वाचकांना भयभयीत करणारे आहे.''[१२]

**३.३.५ भागू कोळीण:** 'भूक' कथेतील भागू कोळीण ही विधवा गरीबीतही मुलांसाठी संसाराची उमेद घेऊन जगणारी स्त्री आहे. भयानक भूकेचा प्रश्न किती रूप धारण करतो याचे चित्र म्हणजे भागू कोळीण होय.

**३.३.६. पांडूची आई:** 'आई' कथेतील पांडूची आई या विधवा स्त्रीच्या मानसिक स्थितीचे दर्शन घडते. या कथेच्या संदर्भात गंगाधर पानतवणे यांनाही , 'आई ही व्यक्तीरेखा बागुलांनी तटस्थपणे रेखाटली आहे. ही कथा वाचकाला अस्वस्थ' करणारी आहे असे वाटते.

**३.३.७. जानकी:** 'सुड' मधील जानकी ही एका मुरळीची मुलगी असून दिसायला सुंदर आहे. जानकी वयात आल्यापासून तिच्यावर लैंगिक अत्याचार होतात. त्यामुळे जानकीला आपल्या स्त्री-देहाचाच द्वेष वाटू लागतो ती म्हणते, ''या दुःखातून, स्त्री देहातून, पापातून आपली कधीच सुटका होणार नाही? मरेपर्यंत आपण अशी योग्य स्त्रीच राहू? अनेकांची कामी नजर आपल्याला अशीच नागवी करीत राहिल? त्यापैक्षा उरात जांबिया खुपसून मेलेले काय वाईट?'' शेवटी तिला अलख-निरंजनाचा सहवासामुळे तिच्या वृत्तीत बदल होतो.

अशाप्रकारे बागुलांच्या कथेतील स्त्री पोटासाठी मजबूर झालेली, तिच्यातील करूणा, ममता, मुलांप्रतीप्रेम, सर्वणाचा अत्याचार सहन करणारी, तरीपण न डगमगणारी स्त्री बागुलांच्या कथेच्या विषय झालेली आहे. एकूणच बागुलांची कथा ही अनेक गुणसंपन्न आहे.

**३.४ बंधु माधव:** डॉ. आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेले नायक-नायिकांचे चित्रण बंधु माधव यांनी आपल्या कथांमधून केलेले आहे. विद्रोह आणि नकार हा त्यांच्या कथेचा मूळ गाभा आहे. म्हणून त्यांच्या कथांमधील स्त्री व्यक्तिरेखा स्मरणात राहतात.

**३.४.१. विठू महाराची बायको:**

'कपाळी लिवल्यालं कंदी पुसलं' या कथेतील ही एक स्वाभिमानी स्त्री. ती पारंपरिक समाजव्यस्थेला नकार देते. गावकी वतनाच्या ओझ्याखाली दबलेल्या आपल्या महादेव नावाच्या मुलाला आतापर्यंत मी रडले ते पुरे, तू रडू नकोस, बैत्याचा बैलासारखा जगू नकोस असे म्हणत ती डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा विचार त्याच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करते. ती म्हणते,' ...लिवनं शिक... आंबेडकरावानी मोठा हो आन धडक दे जोरान या जुलमी बतनावर....शिंग खुपस या बलुत्याच्या अन्यायी पोटात नि काढ त्येंची आतडी पार बाहीर. कर त्येंचा लोळा गोळा ..... चेंदामेंदा....त्याशिवाय हे म्हाराच्या कपाळी लिवल्यालं भोगकंदी पुसलच जाणार न्हायीत . ...' लाखो वर्षांपासून ज्या समाजव्यवस्थेने अन्याय केला, तीच व्यवस्था उध्वस्त करण्याची भाषा ही स्त्री करते.

**३.४.२. मोगरी:** बनगाव ही अशीच एक बंधु माधवांची गाजलेली कथा. या कथेत मोतीराम चांभार हा भारत-चीन युद्दात वीरमरण प्राप्त मिळते. मोगरा या मोतीरामच्या पत्नीचा वीरपत्नी म्हणून बाजीराव तिचा सत्कार करतो. सत्काराच्या रात्री दारुच्या नशेत मोगरीच्या घरी जाऊन तिच्या अब्रु घेण्याचा प्रयत्न करतो. तिने चोरी केली म्हणून बाजीरावचे समर्थक दुसऱ्या दिवशी विधवा मोगरीची विवस्त्र करुन गावात धिंड काढतात. गावकरी मात्र हा सारा प्रकार उघडया डोळयांनी निर्लज्यपणे पाहातात. एक जुलमी व्यवस्थेचे. दलित स्त्रीवरील अन्याय अत्याचाराचे आणि त्याला विरोध करणाऱ्या स्त्रीचे दर्शन प्रस्तुत कथेतून होते.

त्याचप्रमाणे महार जल्माची चित्तरकथामधील येलाबाई, सारं आभाळ फाटलय या कथेतील आई गावकीच्या कामाविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न करते.

एकूणच, बंधु माधव यांच्या कथेतील स्त्रिया ह्या पारंपरिक समाजव्यवस्थेला नकार देणाऱ्या, त्याविरुद्ध विद्रोह करणाऱ्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या दिसून येतात.

**३.५. दया पवार:** दया पवाराच्या बलुतं हे आत्मकथन प्रसिद्धीच्या ज्या उंचीवर पोहोचले, त्या उंचीपर्यंत त्यांच्या विटाळ हा कथासंग्रह पोहोचला नाही. मात्र त्यांच्या कथेतील जिवंत स्त्री व्यक्तिरेखांमुळे हा कथासंग्रह तितकाच स्मरणात राहतो.

**३.५.१. लता:** शंकर कांबळे या सैनिकाची लता नावाची मुलगी जयभीम हायस्कूलमध्ये शिक्षण घेते. तासाचे नाव करुन लता बोलावून सय्यम इब्राहीम नावाचा शिक्षक तिच्यावर बलात्कार करतो. त्याची प्रतिक्रिया म्हणून दलित युवक मोर्चा काढून शाळा बंद करतात. मात्र यात संस्थेची व समाजाची अब्रु गेली असे काही दलित नेत्यांना वाटते. अन्याय करणारा जातीने मुस्लीम असल्यामुळे त्याचे कोणीच काही करणार नाही, मुलीला न्याय मिळणार नाही, असे लोंकांना वाटते. लता कोणताच पर्याय नसल्यामुळे ती अब्रु लुटणाऱ्या सय्य्म इब्राहीमशी विवाह करते.

अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्या व समाजव्यवस्थेला बळी पडणाऱ्या स्त्रियांची प्रतिनिधी म्हणून लता या व्यक्तिरेखेकडे पाहाता येईल.

**३.५२. दीदी:** 'यह तो बाजार है, अगर यहाँ कोई भी अठ्ठणी देगा तो हमे इज्जत करनी होती है पेट की खातीर यह सब होतो हे.' असे म्हणणारी दीदी ही पोटासाठी देह विक्रय करते. त्यामुळे साहेब, दीदी और गुलाम या कथेतील ही व्यक्तिरेखा पोटासाठी माणसाला कोणत्या स्तराला जावे लागते, याचेच दर्शन ही स्त्री व्यक्तिरेखा घडविते.

**३.५३. सयबाय:** ससाणा या कथेतील पारंपरिक मूल्यांना जपणारी सयबाय ही म्हातारी स्त्री आहे.

**३.५४. पवारची आई:** विटाळ या क्थेतील ही व्यक्तिरेखा. दिवाळीची भेट म्हणून फराळाचे ताट पवारची आई देशमुख बाईला देते, पण ती ते ताट परत करते. तिला अस्पृश्यतेची हीन वागणूक मिळते. तेव्हा ती आपल्या मुलाच्या गळयात पडून खूप रडते. आपल्यावरील अन्यायाची तिला जाणीव होते, तिचे आत्मभान जागृत होते. ती म्हणते, 'आपण या देशात का बरे जल्माला आलो. त्यापेक्षा बर्फाळ बश टुंड्रा प्रदेशात का

नाही जन्मलो. तिथ विटाळ नसेल' ही अन्यायाच्या जाणीवेची पातळी सर्वच दलित समाजाची प्रातिनिधीकच म्हणावी लागेल.

दया पवारांच्या विटाळ या कथासग्रहात विविधांगी स्त्रियांचे दर्शन घडते.

**३.६. शरणकुमार लिंबाळेः** आत्मकथन आणि काव्य लेखनाप्रमाणेच शरणकुमार लिंबाळे यांचे रथचक्र आणि दलित ब्राम्हण हे दलित कथासंग्रह गाजले आहेत. त्यांच्या या दोन्ही कथासंग्रहात सवर्ण आणि दलित स्त्री जीवनाचे विविध पदर चित्रित केलेले आहेत.

**३.६.१. सुनिताः** निळे झेंडे या कथेतील सुनिता ही सवर्ण व्यक्तिरेखा आहे. गावातील उपसरपंच तिचे वडील असलेल्या या मुलीवर नायक प्रेम करतो. कॉलेजमधील या प्रेम प्रकरणाची चर्चा गावात होते. नायक तिच्या घरी जाऊन लग्नाची मागणी घालतो. एक दलित तरुणाची ही हिम्मतीचे पर्यवसान म्हणून त्याचे घरदार जाळले जाते, त्यातच त्याचे दोन भाऊही मृत्यू पावतात. सुनिताला बेदम मारले जाते. पोलिस चौकशी होते. या प्रेमात नायकाच्या जीवनाची राखरागोंळी होते. असे असले तरी नायक तिला शांतपणे बोलण्याचा प्रयत्न करतो, पण यात आपला कोणताही संबंध नाही, असे म्हणत ती झालेल्या प्रकारापासून अलिप्त होते. या नायिकेच्या माध्यमातून सवर्ण-दलित असा संघर्ष दिसून येतो. एखाद्या चित्रपटाच्या कथेलाही लाजवेल असाच आशय प्रस्तुत कथेचा आहे.

**३.६.२. रंजना, भागिरथी आणि आईः** 'युद्ध' या कथेतील सेवानिवृत्त फौजी भगवान याची पत्नी रंजना, बहीण भागीरथी आणि आई अशा त्रिविध स्त्री व्यक्तिरेखांची विण प्रस्तुत कथेत पहावयास मिळते. देशमुखाच्या वाडयावर आई-वडीलांनी जोहार घालून काम करणे भगवानला पसंत नसते. त्यांनी गावकीची कामे सोडावी, सन्मानाने जगावं, असे त्याला वाटते. तसेच त्याची बहीण रंजना देशमुखांच्या घरी काम करताना देशमुखांच्या मुलाकडून रंजना गरोदर राहते. भगवान झालेल्या प्रकराबददल त्यांना जाब विचारतो. तिला देशमुखांची सून म्हणून घ्या म्हणतो. मात्र या गोष्टीला सर्वांचा विरोध होतो. गर्भ पाडणे वा वाढ होऊ देणे, फार तर तिला गावाबाहेर रखेल म्हणून ठेवणे इथपर्यंत त्यांची चर्चा होते. एक हक्काची मालमत्ता म्हणून दलित स्त्रीकडे पाहण्याचा सवर्णांचा दृष्टिकोन प्रस्तुत कथेतून दिसून येतो.

**३.६.३. रत्नाः** प्रस्तुत कथेत नायक आणि रत्ना यांची प्रेम कहाणी म्हणजे प्रस्तुत रत्ना ही दलित कथा होय. मिलिटरीत असणाऱ्या एका फौजी मुलगी रत्ना व नायक लहानपणासून एकत्र राहतात. मोठेपणी एकमेंकावर जीवओवाळून प्रेम करतात. मात्र गरीब नायकाची आई या प्रकराचा खूप घाबरताना दिसते.

त्याचप्रमाणे दलित ब्राम्हण या कथेतील लेखकाची सवर्ण पत्नी, काळोख गर्भ कथेतील पाटलाची लग्न झालेली वर्षा. पायरी कथेतील मुख्यापकाच्या वासनेला बळी पडलेली जया. धडका कथेतील धडाकेबाज सुभद्रा या आणि अपर्णा, सुवर्णा जातीयता पाळणारी वाणीन म्हातारी, सुजाता, निलू, रजनी, सुनिता, सोनी, सीमा व माधवी इ. या सर्व सवर्ण आणि दलित स्त्रिया आई, बहिण, प्रेयसी, दलित-सवर्ण संघर्ष अशा विविधांगी नात्याची वीण शरणकुमार लिंबाळे यांच्या कथांमध्ये दिसून येतात.

**३.७. उत्तम कांबळेः** रंग माणसाचे, कावळे आणि माणसे, कथा माणसांच्या, न दिसणारी लढाई आणि परत्या या कथासंग्रहामधून उत्तम कांबळे यांनी मानवी मनाचा शोध घेताना विविध विषय आणि विविध प्रकारच्या स्त्री व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.

**३.७.१. केराबाईः** 'बेलदार' या कथेतील काही अन्नधान्य नसल्याने आणि पाऊस पडत नसल्याने हवालदिल होते. मुले व नवरा यांना आपण काही खाऊ घालू शकत नाही, या भावनेने ती खचल्यासारखी होते. द्रारिद्रय व उपासमारीत जीवन जगणाऱ्या स्त्रिचे दर्शन प्रस्तुत कथेतून घडते.

**३.७.२. सुलाः** 'देवाची बाई' या कथेतील एक सुंदर, कोणालाही वेड लावेल अशी ही व्यक्तिरेखा. आपली आजी व आई यांच्या मृत्यूनंतर ती जोगवा मागते. त्या प्रसंगी तरुणांपासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत तिच्याकडे वासनाधुंद नजरेने बघतात. प्रतिकार करुन ती संबंधीताना समजावण्याचा प्रयत्न करते. देवाची बाई असली तरी लोक आपल्याकडे वाकडया नजरेनेच बघतात. परडी हातात असताना आडदांड माने तिची अब्रु घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा मात्र ती रागाने हातातली परडी फेकून देते. एक आत्मजाणीव झालेली स्त्री या रुपाने सुलाचा उल्लेख करता येईल.

**३.७.३. फुला**: 'परीक्षा' या कथेतील ही एक जोगतीण. गावातील निवडणूकीत निवडून येते. मात्र तहसिलदारने फुला ही स्त्री नसून पुरुष आहे, असे जाहीर करेपर्यंत तिने गाव सोडून दिलेले असते. एका जोगतिणीचा प्रवास या कथेत दिसून येतो.

**३.७.४. कैद्याची आईः** 'आंधळे प्रेम' या कथेत मुलावर संस्कार करण्यास असमर्थ आणि अति लाड याचा परिणाम म्हणून मुलगा कैदी असणाऱ्या आईचे चित्रण आलेले आहे.

उत्तम कांबळे यांच्या कथांमध्ये जोगतीण, कष्टकरी, पतीच्या सहमतीने व्यवसाय करणाऱ्या, पोटासाठी धडपड करणाऱ्या या स्त्रिया माणूस म्हणून जगण्यासाठी संघर्ष करतात. " ..भाकरीसाठी व्याकूळ झाल्या तरी स्वाभिमान आसणाऱ्या, स्वत्व जपणाऱ्या या स्त्रिया आहेत. माणूस म्हणून जगण्याची कमालीची ऊर्जा आणि उर्मी त्यांच्यात आहे**...."**[१३] या स्त्रिया सद्यस्थितीतील दलित स्त्रियांना प्रेरणादायी ठरणाऱ्यांच आहेत.

**३.८. प्रा. केशव मेश्रामः** प्रा. केशव मेश्राम यांनी खरवड, धगाडा, मरणमाळा, आमने सामने, कोळिष्टके, खांडववन, चिखलचोथा, आसूडवळअसे एकूण आठ कथासंग्रह लिहिले. त्यांच्या कथांमधूनही नानाविध प्रकारच्या स्त्रियांची दर्शने घडतात. काही प्रातिनिधीक स्त्री व्यक्तिरेखा पाहाता येतील.

**३.८.१ जाईः** 'भरताड' कथेतील जाई मामांकडे गेलेली असते. दिपकच्या वासनेची शिकार झालेल्या जाईचा प्रवास पार वेशागृहा पर्यंत होताना दिसतो.

**३.८.२. उलपी:** 'नुसत्या' या कथेतील उलपी मोलमजूरी व कष्ट करण्याऱ्या स्त्रीचे प्रतिनिधीत्व करते.

**३.८.३. पारु:** धारावीच्या भंगारनगरमध्ये राहणाऱ्या पारु व जनी या दोघी बहिणी होत. झोपडपट्टीतील इप्परभाईच्या अत्याचाराला पारु बळी पडते. निराधार असणाऱ्या या दोघं बहिणी शेवटी राहत्या ठिकाणाहून निघून कशा निघून जातात, याचे चित्र या कथेत आले आहे.

तसेच 'नदी' या कथेतील कौसाबाई ही संसारात लक्ष घालून आपल्या नवऱ्याला मदत करते. 'मोजमाप' या कथेतील नमाबाई गरीबीत मुलांसाठी आपल्या दारुड्या नवऱ्यांचा संसार करणाऱ्या एका कर्तबगार स्त्रीचे चित्रण आले आहे. 'गाळसाळ' कथेतील मैना ही आपली मोठी बहिण एका शेठबरोबर पळून गेली, तशीच ती बापाच्या वयापेक्षा ही मोठ्या असणाऱ्या माणसाला नादी लावते. अनेक पुरुषांची साथसंगत करणारी एक मुक्त जीवन जगणारी स्त्री आहे. गोष्ट काय होते बघा यातील कमळा ही सख्या भावामुळेच तिच्या जीवनाची फरफट होताना दिसते. 'पडजड'मधील जया, भरतीमधील पुजारीण आंबसतांबूस ऊब मधील देह विक्रय करणारी इमली, पाठपुरावा मधील नवरा मुसलमानाला विकली जाणारी सुलकी इ. या आणि अशा बहुविध आयाम असणाऱ्या अनेक स्त्रिया प्रा. केशव मेश्राम यांच्या कथांमध्ये पहावयास मिळतात.

**३.९. उर्मिला पवार:** नव्या उमेदीची दलित लेखिका म्हणून उर्मिला पवार यांचे नाव घेतले जाते. 'सहावे बोट' आणि ' चौथी भिंत' हे त्यांचे कथासंग्रह खूप गाजले. त्यांच्या या कथासंग्रहामधील कथांमध्येही विविध प्रकारच्या स्त्री व्यक्ती मनाचा वेध लेखिकेने घेण्याचा प्रत्यत्न केलेला दिसून येतो.

ज्योती ही 'शल्या' या कथेची नायिका आहे. पाच मुली असल्यामुळे कुटुंबातील लोकांना तिला मुलगा व्हावा म्हणून तिच्यामागे सारखी कूरकूर सुरु असायची. म्हणून तील दवाखान्यात नर्सला लाच देऊन कुमारी मातेला मुलगी देऊन तिचा मुलगा घेते. मात्र कुमारी माता त्या आपल्या मुलीला मारुन टाकेल, म्हणून तिचे मातृत्व उफाळून येते.

'सहावं बोट' या कथेतील स्नेहा या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून मूल न होणाऱ्या स्त्रीचे दु:ख दाखविले आहे. विवाहबाहय संबंधातून येणाऱ्या मातृत्वाचा स्वीकार करणारी पारु ही न्याय कथेत पहावयास मिळते. आपल्या पतीने दुसरी पत्नी केली म्हणून दु:ख न करता ती त्याला कोर्टाची पायरी दाखविते. अन्याय, अत्याचाराविरुद्ध आत्मभान आलेली विनोदिनी ही हातचा एक या कथेत चित्रित झालेली आहे. 'कवच' या कथेतील इंदिरा ही खेडवळ व अशिक्षित असली तरी तिच्याकडे वासनेने पाहणाऱ्यांना जशास तसे उत्तर देऊन अन्यायाचा प्रतिकार करते. तसेच नलिनी (वेगळी), कोरेसाहेबाची बायको(प्रबोधन) अशा अनेक स्त्रिया वाचकांच्या चीर स्मरणात राहतात.

**३.१०. मिनाक्षी मून:** मिनाक्षी मून यांच्या 'मेल्टी गर्ल्स' या कथासंग्रहातील स्त्रिया पुरूषप्रधान व्यवस्थेला विरोध करणाऱ्या आहेत. प्रसंगी धाडसी निर्णय घेऊन बंड आणि संघर्षशिल व्यक्तिमत्वाच्या आहेत. त्यांच्या 'सगुणा' या कथेतील सगुणा ही पारंपरिक पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला विरोध करते. 'अपराजिता' कथेतील कामिनी ही नवरा तिला सोडून दुसऱ्या स्त्रीबरोबर राहतो याचे दु:ख न करता ती नवऱ्या सोडून स्वत:च्या पायावर उभी राहण्याचा प्रयत्न करते.

**३.११. अनिता पगारे:** अनिता पगारे यांच्या 'वस्तीवरची पोर' यामधील स्त्रिया प्राप्त परिस्थितीशी संघर्ष करताना दिसतात.

**३.१२. नलिनी भोसेकर:** यांच्या 'हिरकणी आणि वेदना' या कथांमधील नायिकाही पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला विरोध करणऱ्या आहेत.

**१३. आशालता कांबळे:** यांच्या 'रमाबाई', 'स्वयंसिद्धा', 'संघर्ष' या कथांमील नायिका या कर्तृत्ववान आहेत. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विरोधाबरोबरच पांढरपेशी प्रवृत्तीलाही विरोध करणाऱ्या आहेत.

**१४. के. ओ. गिऱ्हे:** के. ओ. गिऱ्हे यांच्या 'दोरीवरचं काळीज' या कथासंग्रहात वेगळ्यावेगळ्या जाती जमातींच्या स्त्रियांचे दर्शन घडते. त्यानुषगांने त्या त्या जाती जमातीचे रीतीरीवाज, प्रथा व परंपरांचेही सांस्कृतिक जीवनाचेही दर्शन घडते.

मंदा ही 'मंदा' कथेतील पारधी जमातीतील नायिका. पतीने गावातील शेतकऱ्याच्या शेजारी शेती घेतली म्हणून काही गावगुंडांनी तिचा पती गावी गेलेला पाहून मंदावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. पण ती स्वत:ची सुटका करुन संघटनेच्या मदतीने पोलिस केस करुन न्याय मिळवणारी ही धाडसी स्त्री चित्रित केलेला आहे.

गोधा ही ' घडाघागर' या कथेतील नायिका गोपाळ जातीतील असून तिच्या रुपाने त्या जातीतील स्त्रीचे दुय्यम स्थान लक्षात येते. जातपंचायत, प्रथा यांच्या चित्रणाबरोबरच पुरुषत्व नसणाऱ्या स्त्रीची होणारी घुसमटीचे दर्शन घडते.

सारजा ही 'दोरीवरचं काळीज' या डोंबारी जमातीतील नायिका. स्वत:चे मूल दोरीवरुन पडले तरी कसरतीचे खेळ करावे लागतात. पोटासाठी दाही दिशा भटकंती करावी लागते. पत्नी, आई अशा भूमिकेतून सारजाचे दर्शन घडते.

**३.१५. मधुकर बडवणे:** मधुकर बडवणे यांच्या 'बिऱ्हाड' आणि 'कोंडवाडा' या कथासंग्रहातील कथांमध्ये दलित स्त्री जीवनाचे चित्रण आलेले आहे.तारुण्य ओसरल्यानंतर म्हातारपणी कोणीच कोणाचं नसते, ही एका नर्तकीची व्यथा लेखक कुसुमी या नायिकेच्या माध्यमातून मांडतात. विधवा अणि एका अभागी आईची दुर्दैवी कहाणी अनंताच्या आईच्या माध्यमातून 'सौदा' कथेत पहावयास मिळते. 'कायापालट' या कथेतील पाटलाची जिजी मूलबाळ होत नाही म्हणून माहेरी येते. माहेरी त्यांचा गडी भिमा याच्याशी लगट होते. यातून स्त्री भावनेचा वेदना टिपण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. प्रसुतीच्या वेदनेचे चित्रण कमळीच्या माध्यमातून 'इटाळ' या कथेत आले आहे. 'वादंग' या कथेत धुरपा आपल्या नवऱ्याला साथ देताना दिसते. 'कोंडी' कथेत वैदू जातीतील कोंडीचे अन्नासाठी कावळे आणि कुत्र्यांबरोबर झटपट होताना दिसते. त्याचप्रमाणे 'सुर्योदय', 'रंगलेले हात', 'जागरण' आणि 'दुरावा' या कथांमधील स्त्री जीवनाचे विविध पदर लेखकाने चित्रित केलेले आहेत.

**३.१६. अशोक उन्हाळे** यांच्या 'मेंढरं' या कथेत गडीकाम करणाऱ्या बाजीरावची पत्नी हिरकणीवर सावकार बलात्कार करतो. म्हणून फाशी घेऊन जीवनयात्रा संपवते. इज्जत महत्वाची हेच हिरकणी दाखवून देते.

**३.१७. श्याम माने** यांच्या 'उपेक्षिता' या कथासंग्रहातील राधा ही 'वेडी' या कथेत पहावयास मिळते. नवरा मेला म्हणून गणपत पाटलावर विश्वास ठेवते. पण शेवटी त्याच्याकडून विश्वासघात होतो. एक फसलेली स्त्रिचे चित्र आपल्यासमोर येते. वेश्या व्यवसायात गुंतून पडलेल्या स्त्रीची व्यथा 'देवी' या कथेत देवी ही स्त्री मांडते. जन्मदाता आपल्या मुलीला पाचशे रुपयांना विकून वेश्या व्यवसात ढकलतो, याचे चित्र 'जानकी' कथेतील जानकीच्या रुपाने येते. 'उपेक्षिता' कथेतील शांताचा फक्त भोग्य वस्तू म्हणून डॉक्टर पाहतो. 'भ्रष्ट' कथेतील नर्सची नोकरी करणारी मुलगी जगण्यासाठी संघर्ष करते. वेश्या व्यवसाय, त्यात अडकलेल्या स्त्रिया, त्यांची घुसमट, त्यांचा जीवनाचा उत्तरार्ध याचे भयानक रुप श्याम माने यांच्या कथांमध्ये दिसून येते.

**३.१८. अर्जुन डांगळे** यांच्या ही 'बांधावरची माणसं' या कथासंग्रहात दलित जीवनाचे अनेक कंगोरे चित्रित झालेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार अनेक कथांमधून पहावयास मिळतो. त्यांच्या 'गारदी', 'साहेब', 'अंतहीन', 'पांढऱ्या पायाची' 'यादवी', 'व्यवस्था', 'प्रमोशन', 'ही बांधावरची माणसं', ' घुसमट' या कथांमधून दलित स्त्री जीवनाचे चित्रण केलेले दिसून येते. मिसेस पगारे (घुसमट), गिरजा (पांढऱ्या पायाची), गोजूबाई (अंतहीन) इ. या दलित स्त्रिया लक्षणीय आहेत.

**३.१९. उत्तम बंडू तुपे** यांचा 'माती आणि माणसं' हा ग्रामीण दलित जीवनाचे दर्शन घडविणारी कथासंग्रह. 'शिसारी' कथेतील मातृत्वाची चाहूल लागणारी वेणू अनेक भावनिक ताणतणावात जगताना दिसते. 'वनवा' कथेतील सखुची सोडचिठ्ठी होऊन दुसरे लग्न होते, परंतु तिला मनासारखे जीवन जगता येत नाही. 'जग' या कथेत राधाच्या रुपाने देवदासीच्या जीवनाचे चित्रण येते. तसेच जाई, यल्लम्मा, भागी व कलावती या स्त्रियांचे जीवनही तितकेच भयानक दिसून येते.

**३.२० योगीराज वाघमोरे:** योगीराज वाघमोर यांचा 'उद्रेक', 'बेगड', 'गुडदाणी', ' होरपळ' व 'बहिष्कार' आंबेडकरी जाणीव व्यक्त होताना दिसते. त्यांच्या कथांमध्येही ग्रामीण आणि शहरी जीवनातील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे मनाला चटका लावून जाणारी आहेत.

त्याचप्रमाणे **अर्जुन व्हटकर** यांच्या 'तुंबण' कथासंग्रहातील शिवबाई(तुंबण), फुलन (फासा), रुक्मिणी (दवंडी), आनसा (दसरा) या स्त्रियांच्या माध्यमातून ग्रामीण दलित स्त्री जीवनाचे दर्शन घडते. शंकर भोरे यांच्या 'अश्रूधारा' या कथासंग्रहातील नगमा (अश्रूधारा) ही व्यक्तिरेखा लक्षात राहते. **दादासाहेब मोरे** यांच्या विमुक्त कथेची नायिका लच्छी, श्रीपती भिवाजी कांबळे यांचा 'नीलक्रांती', योगेंद्र मेश्राम यांच्या 'रक्ताळलेली लक्तरे', 'जगण्याचा प्रश्न', भीमसेन देठे यांच्या 'गिऱ्हाण', 'रिडल्स', 'तुफानातील दिवे', **प्रकाश मोगले** यांच्या 'दिशा', 'अंगुलीमाला', रवीचंद्र हडसणकर यांचा 'दावण', 'दरी' व सरणझळा', , **बळवंत कांबळे** यांचा 'गावकळा' इ. असे अनेक दमदार दलित कथा लेखकांनी दलित जीवनातील स्त्री जीवनाचा प्रवास विविधांगी, विविध रुपाने चित्रित केलेला आहे.

## ४. निष्कर्ष:

१. मराठी कथेपेक्षा दलित कथा आशय आणि अभिव्यक्ती याबाबतील वेगळी ठरली. जे विषय मराठी कथेचे कधीच झाले नाहीत, असे विषय दलित कथेचे झाले आहेत. दलित कथाकारांनी अशा दुर्लक्षित विषयांना साहित्याची पातळी प्राप्त करुन दिली.

२. दलित कथा ही कधीच मनोरंजनाच्या हेतूने लिहिली गेली नाही, आत्मभान, आत्मशोध, सामाजिक बांधिलकी, वेदना, विद्रोह, नकार, माणूसकी आणि आंबेडकरी विचार या व्यापक हेतूने दलित कथेची निर्मिती झाली.

३. दलित कथा खऱ्या अर्थाने नावारुपाला आणण्यात अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात व बाबुराव बागुल यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

४. समाजजीवनातील उपेक्षितांचे जीवन दलित कथेने वास्तव पद्धतीने जगासमोर आणले. त्यामुळे अनेकांना या कथा अतिरंजीत स्वरुपाच्या आहेत, असा भ्रामक समजही निर्माण झाला.

५. सामाजिक व्यवस्थेत ज्याला माणूस म्हणून नाकारले होते. असा 'ब्रोकन मॅन' हा या दलित कथेचा नायक झाला.

६. अण्णाभाऊ साठे यांच्या कथालेखनावर समाजवादाचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्या कथांप्रमाणेच शंकरराव खरात, बाबुराव बागुल यांनी उपेक्षित जाती-जमातींचे चित्रण आपल्या कथांमध्ये केलेले आहे.

७. आई, बहीण, पत्नी, मुलगी, प्रेयसी इ. नाते जपणारी स्त्री दलित कथेमध्ये दिसून येते.

७. दलित कथेमध्ये दलित स्त्रीची विविध रुपे व भूमिका पहावयास मिळते. पारंपरिक रुढी, प्रथा, परंपरा, अन्याय, अत्याचाराला बळी पडणारी, दारिद्र्य आणि अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या, शोषित, विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेला, गावकी आणि इतर अन्यायमूलक कामाला विरोध करणारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचाराने पेटून उठलेली, नवऱ्याच्या अन्याय सहन करणारी, पोटासाठी देह विक्रय करणारी, देवाचे नावाने सोडून दिलेली, कौटुंबिक जिव्हाळा असलेल्या, जिद्दी, पावित्र्य शिल जपणाऱ्या, प्रेमळ, मायाळू, कष्टाळू, वेगवेगळ्या व्यवसाय करणाऱ्या, स्वाभिमानी, संघर्षशिल प्रवृत्तीच्या स्त्रिया आहेत.

८. दलित कथेमध्ये विविध स्तरांमधील स्त्रियांची चित्रणे आलेली आहेत. गरीब, मध्यमवर्गीय, श्रीमंत, व्यावसायिक, श्रमिक-कामगार इ. तसेच ग्रामीण, प्रादेशिक व शहरी भागातील स्त्री जीवनाची चित्रे आलेली आहेत.

९. दलित कथेतील स्त्री जीवन हे पारंपरिक मराठी कथेतील स्त्रीजीवनापेक्षा अगदी भिन्न आणि वास्तवतावादी आहे.

## ५. संदर्भः


| | | |
|---|---|---|
| १. प्रा. अरविंद वामन कुलकर्णी | : | 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वि.आ. १९९७ पृ. ६९. |
| २. डॉ. प्रकाश खरात | : | 'दलित कथाः उगम आणि विकास', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२, पृ. ६४. |
| ३. डॉ. छाया निकम | : | 'दलित कथा:निर्मिती आणि समिक्षा,', सुविद्या प्रकाशन, पुणे प्र.आ. २००६, पृ. २४. |
| ४. डॉ. प्रकाश कुंभार | : | 'दलित साहित्यः काही विचार काही दिशा', कैलाश पब्लीकेशन्स, औरंगाबाद प्र.आ. २००२, पृ. १०९. |
| ५. डॉ. प्रकाश कुंभार | : | तत्रैव पृ. १०९. |
| ६. डॉ. प्रकाश कुंभार | : | दलित कथा साहित्य, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, १९९२, पृ.१२१ |
| ७. शंकरराव खरात | : | 'तराळ-अंतराळ', मेहता प्रकाशन, पुणे प्र.आ. १९८२, पृ.३७. |
| ८. प्रा. भालचंद्र फडके | : | 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०००, पृ. १९१. |
| ९. डॉ. छाया निकम | : | 'दलित कथा:निर्मिती आणि समिक्षा,', सुविद्या प्रकाशन, पुणे प्र.आ. २००६, पृ. ९७. |
| १०. डॉ. प्रकाश खरात | : | तत्रैव, पृ. ९७. |
| ११. बाबुराव बागुल | : | स्वगत, जेव्हा मी जात चोरली होती, अभिनव प्रकाशन, मुंबई १४, द्वि. आ. १९७६, पृ. १३१ ते १३३ |
| १२. प्रा. भालचंद्र फडके | : | तत्रैव, पृ.१९८ |
| १३. डॉ. प्रल्हाद लुलेकर | : | निवडक उत्तम कांबळे, (संपा.), प्रस्तावना, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१०, पृ. २५ |


⌘⌘⌘⌘⌘

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## August Special Issue II




ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Prin.Dr.Shivdas Shirsath

**RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC**

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**

***Prin. Dr. Shivdas Shirsath***
*M. S. P. Mandal's,*
***Arts, Commerce and Science College,***
***Kille Dharur, Dist. Beed 431124 Maharashtra***

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

# जागतिकीकरण आणि आदिवासी बोली

प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ,
प्राचार्य तथा सिनेट सदस्य
म. शि. प्र. मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, धारूर
drszshirsath@gmail.com

**1. प्रास्ताविक :**

भारतात प्राचीन काळापासून 'वसुधैव कुटुम्बकम', 'विश्व ग्राम'ची संकल्पना मांडण्यात आलेली आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी'तील मानव्याची वैश्विकतेची ही कल्पना अधिक मार्मिकपणे मांडले आहे. माणसामाणसातील वैरभाव, राग, लोभ, द्वेष व मत्सर नष्ट व्हावेत, या विश्वात प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे मिळो असे म्हणत, 'हे विश्वची माझे घर' याची ही उदात्त संकल्पना मांडून जातात. संत ज्ञानेश्वरांचा हा विचार जागतिकीकरणाच्या संकल्पनेशी तसा खूपच जवळचा वाटतो. जागतिकीकरणात राष्ट्रा राष्ट्राच्या सीमा नष्ट होतात. राष्ट्र एका विशिष्ट हेतूने जागतिकीकरणाच्या साखळीत जोडले जातात. हीच व्यापक भूमिका 'ऋग्वेद' आणि संतांच्या विचारातून व्यक्त होताना दिसते. वैश्विकतेचा हा विचार या भारत भूमीतच होता, मात्र आज या वैश्विकला विविध आयाम दिसतात.

आज जागतिकीकरणाने सर्व विश्व व्यापले आहे साधारणतः १९९० च्या नंतर आर्थिक व्यवहारात खाउजा संस्कृती आली खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण या तीन संकल्पनांनी मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडून आणलेत जागतिकीकरण ही संकल्पना मुख्यत्वे आर्थिक व्यवहाराशी संबंधित असली तरी त्याचा प्रभाव जीवनाच्या प्रत्येक अंगावर होत आहे

जगात अनेक आदिवासी समूह आहेत. भारतात प्रामुख्याने ओरिसा, राजस्थान, मिझोराम, अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांमध्ये प्रामुख्याने आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. गोरो, खांशी, कोळी, भिल्ल, मीना, ओरॉंव, गोंड या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रात शासनाने 47 अनुसूचित जमातींची यादी प्रसिद्ध केलेली आहे. या जमातींच्या अनेक पोटजमाती, उपजमाती आहेत. प्रत्येकाची स्वतंत्र बोली आहे. महाराष्ट्रातील 47 आदिवासी जमातीच्या 74 बोली बोलल्या जातात. त्यात प्रामुख्याने गोंडी, भिल्ली, मावची, पावरा, धनका, तडवी, महादेव कोळी, मल्हार कोळी, कातकरी, कोकणी, ढोरी (टोकरे कोळी), कोरकू, कोलामी, खारिया, ठाकरी, पारधी, परधानी, पावरी, माडिया, मुंडारी, संथाली, सावरा, वगैरे. यांतील बहुतेकांना लिपी नाही, आदिवासी समूहांकडून त्या फक्त बोलल्या जातात. काही आदिवासी भाषांना लिपी आहे. उदाहरणार्थ गोंडी बोली. आज जागतिकीकरणाच्या परिणाम या आदिवासी बोलींवरही होत आहे. नेमका कोणता व कसा परिणाम होत आहे, याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन लेखात अभिप्रेत आहे.

**2. जागतिकीकरणाची संकल्पना व स्वरूपः**

जगतिकीकरणाची संकल्पना विषद करण्याचा अनेक लेखक, विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ व समीक्षकांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी त्यांनी मांडलेले विचार व व्याख्या खालीलप्रमाणे-

1. श्रवणकुमार सिंग- "जगातील सर्वच राष्ट्रांची एकच एक बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे व भांडवलाचे सहजतेने परिचलन करणे म्हणजे जागतिकीकरण होय."

2. डॉ. सी. रंगराज यांच्या मते, ''माहिती संकल्पना, तंत्रज्ञान, वस्तू, सेवा, भांडवल, वित्त आणि लोक यांच्या विविध देशांतून होणाऱ्या परिचलनातून अर्थव्यवस्थांचे व समाजांचे एकात्मीकरण; (Integration) करणे म्हणजे जागतिकीकरण होय."[1]

3. रूसी मोदी यांच्या मते, "मुक्त स्पर्धा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर करून उत्पादन वाढविणे आणि संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करून वस्तुंची व सेवांची विक्री करणे म्हणजे जागतिकीकरण होय."[2]

4. "जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रांत होत राहणारे रूपांतर होय."[3]

उपरिनिर्दिष्ट विविध व्याख्या व मतमतांतरे यांच्यातून जागतिकीकरणाची तंतोतंत अशी कोणतीही व्याख्या केलेली नाही. काही विचारवंतांनी जागतिकीकरणाच्या लक्षणांचा उल्लेख केला आहे, तर काहींनी स्वरूप व्याप्ती तर काहीनी सर्वसमावेशक व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. साम्राज्यवादी विचार प्रवाहातून उगम पावलेला विचार म्हणून जागतिकीकरण याकडे पाहता येईल. जगातील सर्वच राष्ट्र या जागतिकीकरणाच्या प्रवाहात आलेले आहेत. जग हे एक खेडे आहे, गाव आहे, की ज्याला सीमाच नाही. मुक्त व्यापार व मुक्त बाजारपेठ हा जागतिकीकरणाचा महत्त्वाचा कणा आहे. यामुळे राष्ट्रा-राष्ट्रात जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली. जग हे एकात्म स्वरूपाचे वाटू लागले. इंटरनेट, सॅटॅलाइट, इंस्टाग्राम, फेसबुक यासारख्या माध्यमातून जगात कुठेही क्षणात पोहोचता येते. माहिती घेता येते. सीमा विरहित जग असे स्वरूप या जागतिकीकरणाने निर्माण केले आहे.

माल, सेवा, भांडवल व तंत्रज्ञान याची मोठ्या प्रमाणावर आदान-प्रदान होते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला विचारवंत वेगवेगळ्या अंगाने पाहताना दिसतात. औद्योगिकीकरणात व्यवसायात जागतिकीकरण ही बाब कंपन्यांच्या विशिष्ट धोरणांची निगडित आहे. त्या उत्पादन आणि मार्केटिंग तत्त्वांचा प्रामुख्याने विचार केलेला असतो. त्यांच्या लेखी जग ही एक मुक्त बाजारपेठ असते. अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून जागतिकीकरण हे व्यापारातील वाढ तंत्रज्ञान श्रम आणि सेवा भांडवल यांच्याशी संबंधित आहे. समाज वैज्ञानिकांच्या दृष्टिकोनातून जागतिकीकरण नवीन वर्तन परिवर्तनाची परिस्थिती आहे. सामाजिक सांस्कृतिक बदल आहे. राजकीय विचारवंत काळाच्या दृष्टीने वैशीकरण हे समाजाचे वैश्विककरण आहे, तर घा भाषा शास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून हा अपरिहार्य भाषिक बदल हे भाषेचे वैश्वीकरण भाषा नष्टप्राय होणार असल्याचे ते सांगतात. परकीय संस्कृतीच्या अंगीकारणामुळे स्वसंस्कृतीपासून अलिप्तता, भाषेपासूनची अलिप्तता दिसून येते. जगाबरोबर माणूसच ग्लोबल झाला आहे, असे या संदर्भात म्हणता येईल.

जागतिकीकरण ही जरी आर्थिक बाबींशी संबंधित असली, तरी जीवन्नाच्या सर्वच क्षेत्रावर त्याचा दुरगामी परिणाम झाल्याचे दिसते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक ,ऐतिहासिक व शैक्षणिक अशा सर्व क्षेत्राशी जागतिकीकरणाची नाळ जोडली गेली आहे. इतकी व्यापकता जागतिकीकरणाच्या संकल्पनेत आहे. आज प्रत्येक देश जागतिकीकरणाच्या बाहुत आलासारखा आहे.

सन 1985 मध्ये जिओ डेल यांनी प्रथम जागतिकीकरण हा शब्द वापरला. सन 1985 मध्ये थिओडोर लेव्होट यांनी प्रथम जागतिकीकरण हा शब्द वापरला. जगातील 136 राष्ट्रांनी 1 जानेवारी 1993 रोजी संबंध जगाच्या डंकेल प्रस्तावानुसार गॅट (GATT जनरल अग्रीमेंट ऑन टेरिफ अँड ट्रेड) पूर्ण करारावर सह्या केल्या. त्यापासून पुढे जागतिकीकरणाला अधिक गती मिळाली. उदारीकरण व खाजगीकरणामुळे जागतिकिकरणाला गती मिळाली. उदारीकरण व खाजगीकरण हे जागतिकीकरणाचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

संपूर्ण जगाला बॉर्डरलेस करणे व मुक्त व्यापार व आर्थिक क्रिया करणे. हे बहुराष्ट्रीय कंपन्यांना व अमेरिकेसारख्या देशाच्या हिताचेच होते. 'बळी तो कान पिळी' हे सूत्र यामागे होते.

भारतात 'जागतिकीकरण' ही संकल्पना जवळपास दोन दशकानंतर प्रचलित झाली. यासंबंधी डॉ. विजय खेर लिहितात, "1780 मध्ये

जेरनि बेनधान यांनी प्रथमच आंतरराष्ट्रीय (International) या शब्दाचा वापर केला. तोपर्यंत हा शब्द प्रचलित नव्हता. दोन दशकानंतर आंतरराष्ट्रीय शब्दाचे महत्व हे जागतिकीकरणास पूरक ठरले व 1980 नंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिकीकरणाचा वापर सर्व स्तरावर विशेष म्हणजे समाजशास्त्र पत्रकार व इतर निर्णय देणारे घटक या शब्दांचा वापर सर्वजण करू लागले. कालांतराने तो राजकीय वातावरणात घोंघावू लागला. 1980 नंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिकीकरणाचा वापर सर्व स्तरावर होवू लागला. 1944 मध्ये जागतिकीकरण हा शब्द पहिल्यांदा डिक्शनरीमध्ये वापरण्यात आला."[4] आज जागतिकीकरण हा शब्द सर्रास वापरला जातो. ती एक परिचित संज्ञा झाली आहे. त्याचा बरा-वाईट परिणाम माणसाच्या जीवनशैलीवर होत आहे. जागतिकीकरण संपूर्ण पण विश्वाला व्यापणारे आहे. मनुष्य जीवनाप्रमाणे जागतिकीकरणाचे स्वरूप बदलत आहे, तसेच जागतिकीकरणामुळे मनुष्याचे जीवन बदलत आहे, असे चक्र सुरू झाले आहे.

खाजगीकरण व उदारीकरणाच्या वाटचालीत भारत कधी मागे सरकला नाही. पी. व्ही. नरसिंह राव, डॉ. मनमोहन सिंग, अटल बिहारी वाजपेयी यांनी भारताची आर्थिक घडी बसवण्याचा चांगला प्रयत्न केला. विघमान पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आर्थिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात इतर अनेक देशाशी सामंजस्य करार करून विकास साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. श्री नरेंद्र मोदींनी आतापर्यंत जवळपास 15 सरकारी क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुली केले आहेत.

### 3. आदिवासी बोली :

जगात वेगवेगळ्या आदिवासी जमाती आहेत. त्यांच्या जगभर वेगवेगळ्या आदिवासी बोली भाषा बोलल्या जातात. भारतात आदिवासींचे प्रमाण खूप मोठे आहे. मणिपूर, ओरिसा, छत्तीसगड, आसाम, झारखंड, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू या राज्यांमध्ये वेगवेगळे आदिवासी जमाती वास्तव्य करतात.

महाराष्ट्रातही वेगवेगळ्या आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. शासनाने महाराष्ट्रात प्रमुख 47 आदिवासी जमातींची घटनात्मक घोषणा केलेली आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातींच्या 74 बोलीभाषा बोलल्या जातात. यात भिल्ल, गोंड या जमातींमध्ये ब-याच उपजमातीं आहेत. काही उपजमातींच्या बोलीभाषा स्वतंत्र आहेत. ठाणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, नगर, पुणे या जिल्ह्यांमध्ये आदिवासींचे वास्तव्य अधिक आहे. महाराष्ट्रात कोकणी, भिल्ली, ठाकरी, वारली, पावरी, मावची, कोलामी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोरी किंवा अहिराणी, माडिया, कोरकू, भाषा अनेक बोलीभाषा बोलल्या जातात.

या आदिवासी भाषांना लिपी नाही, त्या फक्त मौखिक आहेत. महाराष्ट्रात गोंडी आणि भिल्ली बोली बोलणा-यांचे प्रमाण जास्त आहे. गोंडीला लिपी असल्याचे संशोधक मानतात, तसे पुरावेही दिले जातात. तर जर्मन भाषाशास्त्रज्ञ जूल ब्लॉच यांनी गोंडी बोलीची आंतरराष्ट्रीयता शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे, तर कॉल्डवेल यांनी गोंडी ही एकमेव प्राचीन भाषा असल्याचे म्हटले आहे. या आदिवासी बोलींना लिपी नसली तरी आज त्यातील लोकसाहित्य व वाङमयाला देवनागरी लिपीत अभिव्यक्त होत आहेत. अनेक बोलीभाषांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आदिवासी साहित्य प्रसिद्ध होत आहे. देवनागरी लिपीचा वापर करून या आदिवासी बोलींना शब्दबद्ध करीत आहेत.

### 3.1 आदिवासी बोली भाषेचे स्वरूप:

आदिवासी बोली ही प्राचीन बोलीभाषा आहे. जमातपरत्वे प्रत्येक बोली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्या स्वतंत्र बोली आहेत. जाततीकीकरणाच्या प्रभावाने यातील ब-याचशा बोली मृतप्राय: झाल्या आहेत, तर काही बोली नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी बोलींवर गुजराती, मराठी, हिंदी, तेलुगू या प्रमुख भाषांचा प्रभाव आहे. त्यामुळे त्या त्या बोलीच्या भाषिक लघुक्षेत्राच्या शब्दभांडारात नवीन शब्दांची भर पडलेली दिसते.

बोली ही दर दहा कोसांवर बदलते. उच्चार, शब्दसंग्रह, आघात, बोलण्याची ढब व वाक्प्रचार यात बदल होत असतात. स्थानिक व

प्रादेशिक भाषांचा परिणामही बोलींवर झालेला आहे. यासंदर्भात अरूण जखडे म्हणतात, "दहा कोसांवर भाषा बदलते, असे आपण म्हणतो, पण केवळ भाषाच बदलते असे नाही, तेथील दगड, डोंगर, माळ, जमीन, हवा, पाणी, पिके, अन्न व धान्याच्या चवी ह्या सगळ्यात काही वेगळेपण दिसत असते. त्याचा परिणाम भाषेवर नकळत होत असतो."[5] त्याचप्रमाणे एकाच जमातीची वस्ती वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात वास्तव्यास असेल तर त्या-त्या प्रदेशांचा, तेथील भाषांचा परिणाम बोलीवर होतो. त्यामुळे त्या बोलीचे उच्चारण, तिचे भाषिक लघुक्षेत्र व शैली बदलते. म्हणून अरूण जखडे म्हणतात,"एकच बोलीसुद्धा विविध भागात विविध प्रकारे प्रकट होते. पश्चिम महाराष्ट्रातील पारधी समाजाची भाषा व नांदेड जिल्ह्यातील पारधी समाजाची भाषा यांत फरक आहे. विदर्भातील काही आदिवासी पट्ट्यातही पारधी भाषा अतिशय कमी प्रमाणात असली तरी पश्चिम महाराष्ट्रातील पारधी समाजापेक्षा वेगळी आढळते."[6] त्यामुळे एक जमात आणि तिची एकच समान बोली असा अट्टाहास अभ्यासकांनी सोडून दिला पाहिजे, बोलीतील हा भाषिक बदल अभ्यासकांनी मोकळ्या मनाने स्वीकारला पाहिजे.

सर जी. ए. ग्रियर्सन यांनी सन 1890 मध्ये भारतातील भाषांची पाहणी केली. 'Lingustic Survey of India' या विशाल ग्रंथाची निर्मिती केली. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी भारतातील 179 भाषा व 544 बोलीभाषा सांगितल्या आहेत. 179 भाषांपौकी 116 भाषा या आदिवासी जमातींच्या बोलीभाषा आहेत. सर जी. ए. ग्रियर्सन यांनी खालीलप्रमाणे 4 भाषा कुटुंबे सांगितलेली आहेत.

'1. ऑस्ट्रीक भाषा कुटुंब, 2. तिबेटी चिनी भाषा-कुटुंब, 3. द्रविडी भाषा कुटुंब : 1. संपन्न द्रविडी भाषा : यात तामीळ, मल्यालम, कन्नड व तेलगू 2. असंपन्न द्रविडी भाषा : यात तुलू, कुर्गी, तोडा, गोंडी, कुई, उरॉंव, माल्टो, ब्रह्मी

4. इंडो - युरोपियन भाषा कुटुंब : जगात या गटातील भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. या गटातील भाषेच्या शाखा म्हणजे केटिक, जर्मेनिक, इटालिक, इंडो-पोर्तुगीज, ग्रीक, हिटिटि, टोखेरियन, अल्बेनियम, लेट्टो-स्लाविक, आर्मेनियम व आर्यन इत्यादी. यामध्ये भिल्ल, वारली, ठाकर इत्यादी जमातींचा समावेश होतो. महाराष्ट्रातील बहुतेक आदिवासी जमाती इंडो-युरोपियन गटातील भाषा बोलताना दिसतात. याचे कारण म्हणजे या भाषा "कुटुंबातील बहुतेक भाषा संपन्न आहेत. या भाषांचा प्रभाव हळूहळू सर्व भाषांवर पडत आहे. आदिवासी जमाती मध्ये या भाषा बोलल्या जातात याचे हेच कारण आहे."[7] तसेच प्रा. डॉ. गणेश देवी यांनीही भारतातील आदिवासी बोली भाषेचा सर्वेक्षणाचा राबविलेला प्रकल्प कौतुकास्पद आहे. महाराष्ट्रातील आदिवासी प्रामुख्याने द्रविडियन भाषा कुटुंब आणि इंडो-युरोपियन भाषा कुटुंबातील भाषा बोलतात.

या आदिवासी बोली मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुस-या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. गोंडी, कोलामी, कोरकू, मन्नेरवारलू या द्रविडीयन भाषा गटातील बोली आहेत. साधारणत: इंडो-आर्यन व द्रविडीयन भाषाकुलातील आदिवासी बोली आहेत. मावची, मथवाडी, गोंडी, माडिया, कोरकू, कोल, परधान, तडवी, पारधी, यासारख्या बोली मराठी भाषेला समजत नाहीत. कोळी महादेव, मल्हार कोळी बोली, कातकरी बोली, भिल्ली, ठाकरी, कोकणी, वारली इत्यादी बोली या मराठीच्या जवळचे आहेत. मल्हार व महादेव कोळी हे तर मराठी बोली बोलतात. उच्चारण्याच्या ढबीमुळे तिचे वेगळेपण जाणवते.

आदिवासींचे धार्मिक जीवन आणि बोली यांचा घनिष्ठ संबंध आहे. धार्मिक जीवनातील आचरण अन् अभिव्यक्ती बोलीत होते. विधी गीतेही बोलतच आहेत. आदिवासी विविध देवदेवतांची आचरण, पूजन, भगताचे विधी, डाक वाज़वणारे डांके आणि त्यांच्या गीतांचे आविष्करण बोलीतच होते. त्यामुळे बोलीची परंपरा आपोआप जपली जाते.

आदिवासीच्या बोलीतून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचे दर्शन घडते. बोली हा संस्कृतीचाच एक भाग आहे. बोलीतून संस्कृतीचे दर्शन संस्कृतीचे वहन, संवर्धन व अभिव्यक्ती होते. बोलीच्या मौखिक परंपरेमुळे लोकसाहित्याचा प्रवाह आतागायत सुरू राहिला आहे. मंत्रोपचार, पूजा विधी गीते, उत्सव गीते, पुजाविधी गीते, विधिनाट्य, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे व कोडी यातून लोकगीते आणि लोकनृत्याचा उगम झाला. आदिवासींच्या लोकसाहित्यात बोलीमुळे एक प्रकारची नैसर्गिकतां व स्वाभाविकतां निर्माण झालेली आहे. त्यांच्या लोकसाहित्यात

कथात्मकता, नाट्यमयता, सूर, ताल, लय, नादमयता, विषय आणि बोलीचे वैविध्य, धर्म भावनेशीची संलग्नता व संस्कृतीचे दर्शन यामुळे या लोकसाहित्याचे वैभव संपन्न झाले आहे.

मावची सारख्या काही आदिवासी जमातींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यामुळे त्यांचे श्रद्धाविश्व बदलले आहे. भगवान येशू आणि त्यासंबंधीचे उल्लेख मावचींच्या लोकसाहित्यात येतात.

जागतिकीकरण आज या आदिवासींच्या निवासापर्यंत येऊन पोहोचले आहे. या जागतिकीकरणाच्या अनेक बोलीभाषांवर परिणाम होत आहेत. बोली जागतिकीकरणात किती तग धरेल हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कालौघात एकेकाळी ज्ञानभाषा असणारी संस्कृत आज मृत भाषेत जमा झाली आहे. तसेच आज आदिवासी बोलींचा -हास होत आहे, तर काहींचे अस्तित्व काही शब्दातूनच जाणवते, तर काही मृतप्राय झाल्या आहेत. अशा या बोलीभाषांचे संवर्धन होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

जागतिकीकरणाचा परिणाम आदिवासी बोलीवर होत असला तरी आज कित्येक लिपीबद्ध होत आहेत. ऑडिओ-व्हिडिओ ध्वनीमुद्रित होत आहेत, ही आनंदाची गोष्ट म्हणावी लागेल. यानिमित्ताने बोलीचे संवर्धन व जपवणूक होईल हे निश्चित आहे.

### 3.2 बोली आणि साहित्य:

महाराष्ट्रात आदिवासींच्या वेगवेगळ्या बोली बोलल्या जातात. बोली हे त्यांच्या दैनंदिन व्यवहारात संवादाचे माध्यम आहे. बोली संस्कृतीचा एक अभिन्न भाग असून संस्कृतीचे वहनही करते. बोलींचे शब्दभांडार, तिचे लघु क्षेत्र, बोलीची शैली, उच्चारण, मिथ्थक, भाषिक आणि वाङ्मयीन सौंदर्याबाबत बोली समृद्ध आहेत. बोलीचे शब्दवैभव, अर्थवैभव साहित्यकृतीत आविष्कृत झाले पाहिजे. म्हणून डॉ. रावसाहेब कसबे यांनी आदिवासींच्या विविध बोलीभाषेत "वाङ्मय निर्माण झाले पाहिजे."[8] असे आव्हान त्यांनी दुसरे आदिवासी साहित्य संमेलन, वणी येथे केले आहे. आज कमी-अधिक सर्वच आदिवासी जमातीतील लेखक बोलीभाषेत लेखन करीत आहेत. अनेक साहित्यकृती बोलीभाषेत झाल्या आहेत. त्या मराठीसह बोलीत आहेत. अपवाद वगळता अजूनही पाहिजे तेवढे निखळ साहित्य फारसे बोलीभाषेत निर्माण झालेले नाही. म्हणूनच,

"कोरडे जे शेत आहे, ओलीत झाले पाहिजे

मुक्या जिवांचे दुःख या बोलीत आले पाहिजे"[9] म्हणजे साहित्यात बोलीचा एक जिवंतपणा येईल. साहित्य अधिक बहारदार आणि भाषिक सौंदर्याने संपृक्त होईल.

भुजंग मेश्राम, विनायक तुमराम, वाहरू सोनवणे, वामन शेडमाके, बाबाराव मडावी , चामुलाल राठवा, उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, कुसुम आत्राम, विनोद कुमरे, अशोक कोळी, संजय लोहकरे, नजुबाई गावित, मधुकर वाकोडे, गोदावरी पस्ळेकर, वसंत कनाके अशा अनेक साहित्यिकांनी अनेक कथा, कविता व कादंब-या प्रसिद्ध केल्या आहेत. 'जागल्या' सारखे अशोक कोळी यांचे नाटक प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडविते.

### 4. जागतिकीकरणाचा बोलींवरील परिणाम:

जागतिकीकरणाचे चांगले-वाईट परिणाम संपूर्ण जगावर होत आहेत. हे थांबविणे आता कोणाच्या हाती नाही, हे तितकेच वास्तव सत्य आहे. तेव्हा या जागतिकीकरणाचा आदिवासी बोलींवर कोणता? व कसा? परिणाम होत आहे, हे अभ्यासणे संयुक्तिक ठरेल.

### 4.1 लोकगीते व लोकनृत्य :

"जागतिकीकरणामुळे जग ज्या पद्धतीनं बदलतंय त्यामुळे जागतिकीकरणाच्या संपूर्ण जाळ्यापासून पृथ्वीचा कोणताही कोपरा सुटलेला नाही. त्यामुळे ग्रामीण जीवन, ग्रामीण विकास, ग्रामीण क्षेत्र आणि नागरी क्षेत्र यातली जी तफावत आहे ती असली तरी दोन्हीतलं अंतर कमी झालं आहे. अंतर कोणतं कमी झालंय? संपर्क, व्यापाराचे व्यवहार, माणसांची ये-जा आणि या जागतिकीकरणानं लोकांच्या जीवनावर परिणाम होणं या

दृष्टीनं ग्रामीण क्षेत्राचा भाग शहरापासून, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या प्रवाहापासून लांब राहिलेला नाही.''[10] जागतिक पातळीवरही सहज संवाद साधता येतो. संगणक, इंटरनेट, मेल, व्हाट्सअॅप, इंस्टाग्राम, फेसबुक, टेलिग्राम, मेसेंजर, ट्विटर, मोबाईल इत्यादी. यावर सहज आणि क्षणात संवाद साधता येतो. आज बऱ्याच आदिवासी जमातीची त्या त्या बोली भाषेतील सामाजिक, सांस्कृतिक माहिती, लोकगीते व लोकनृत्य इंटरनेटवर, युट्युबवर उपलब्ध आहेत. या प्रसारमाध्यमांमुळे लोकगीते व लोकनृत्य यांना जगात प्रसिद्धी मिळत आहे. हा जागतिकीकरणाचा चांगला परिणाम आहे.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे व्हॉइस रेकॉर्डर, व्हिडिओ शूटिंग मोबाईल द्वारे सहज करता येते. युट्युब, फेसबुक, टिक टोक, आणि व्हाट्सअॅपवर अपलोड करून प्रसिद्ध करता येतात. अनेक म्युझिक कंपन्यांनी आदिवासी बोलीतील लोकगीते व लोकनृत्याच्या कॅसेट्स काढलेल्या आहेत. त्यामुळे त्या-त्या आदिवासी बोलीचे नमुने, लोकगीते संग्रहित होत आहेत. हा जागतिकीकरणाचा इष्ट परिणाम म्हणता येईल.

जागतिकीकरणाने लोकगीताची गानसरणी बदली आहे. आदिवासी लोकगीते ही कोणीही एका व्यक्तीने गायची नसतात. ती सामूहिक पद्धतीने गायिली जातात. आदिवासी लोकगीताचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. कारण लोकगीतात समूह मानस असते. समाजाचा तो सामूहिक आविष्कार असतो. पण अलीकडच्या प्रसिद्ध झालेल्या ब-याच कॅसेटसमध्ये एकच व्यक्ती गाताना दिसते. उदाहरणार्थ 'मामा तुनी पोर अशी पली गई र', मंबई गऊ मी दिल्ली गऊ', 'केसावर फुगे', 'प्यार करनी ये राणी मला प्यार करनी ये', 'हात मासे बाटली डोळ्या मा पानी', 'डोंगर हिरवागार', भिलिन कोन गावनी' व 'मना डोंग-या देव' इत्यादी. अशा अनेक बोलीतील पारंपरिक लोकगीतांसाठी मांदळ, टिंगरी, ढोल, तारफा, कडी, ढोलकी असे साहित्य वापरले जाते. अशा वाद्यांच्या सहाय्याने ही लोकगीते गायली जातात. मात्र अलीकडे या लोकगीतांमध्ये बँड, डीजे, कॅशियो, माइक यासारखी आधुनिक साधने वापरली जातात. त्यामुळे पारंपरिक काही वाद्य इतिहास जमा होण्याची वेळ आली आहे. हा जागतिकीकरणाचा अनिष्ट परिणाम म्हणता येईल.

"वारली आदिवासी जमातीत पूर्वी ढवलेरी गाणी म्हणून लग्न लावीत असत, परंतु ही प्रथा हल्ली मागे पडत चालली आहे."[11] डॉ. गोविंद गारे पुढे म्हणतात, "सुशिक्षित आदिवासींना नाच गाण्याची लाज वाटू लागली आहे. आदिवासी आता आधुनिकतेच्या जवळ येत चालला आहे. ढोल किंवा झांगळी वाद्याच्या तालावर म्हटली जाणारी गाणी, हल्ली आधुनिक पद्धतीची वाटतात. जुनी गाणी लोपत आहेत."[12]

कारण आजच्या परिस्थितीत विचार करता गेल्या पन्नास वर्षांत अनेक स्थित्यंतरे घडली. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील सर्व संदर्भ बदलले. नव्या शोधाचा, तंत्रविज्ञानाचा, जागतिकीकरणाचा प्रभाव टाळणे शक्य नाही. अर्थात टाळायचे म्हटले तरी ते कोणाच्या हाती नाही. परिवर्तन अपरिहार्य आहे. याचा परिणाम समाजजीवनावर झालेला आहे. लोकसाहित्यही याच्यातून सुटले नाही. हा जागतिकीकरणाचा प्रभाव अधिक मजबूत करण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे.

शिक्षण, शासकीय सोयी, सवलती, सुविधा, माहिती तंत्रविज्ञानाचा वाढता प्रसार, दूरदर्शन, विविध वाहिन्या, सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून होणारी देवाणघेवाण या सर्वांच्या परिणामातून आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक अभिसरण होत आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्याकडे पाहत आहेत. आदिवासी समूह विकासाच्या मुख्य प्रवाहात येत आहे. आनंदाची गोष्ट असून जागतिकीकरणाचा **इष्ट परिणाम** असला तरी सामाजिक, सांस्कृतिक लोकधन लोप पावत आहे. लोकतत्वे, लोकरूढी व परंपरा यांचे संवर्धन व जपवणूक कशी करावी हा एक वेगळा प्रश्न, एक वेगळी समस्या निर्माण झालेली आहे. जुन्या आणि नवीन पिढीचा एक सांस्कृतिक सामाजिक संघर्ष निर्माण झाला आहे. एक नवीन लोकसंस्कृती निर्माण होऊ पाहत आहे. सीताराम ठाकरे म्हणतात, "आज आंध जमातीचे लोकवाङ्मय लोप पावत चालेले आहे. तसेच प्रयोगाच्या रूपाने सादर होणाऱ्या लोककलेत बदल होत आहेत. काही बदलामुळे हे सकारात्मक आहेत तर काही बदलामुळे आंध जमातीच्या प्राचीन संस्कृतीला तडा जात आहे.जसे **लोककलांच्या सादरीकरणात लाउडस्पीकर, पडदे, स्टेज स्वरूपाचा रंगमंच व आशायानुरूप पात्रांचे पोशाख याला महत्व येत आहे.** रंगमंचावर सादर होणाऱ्या संवादामध्ये **मराठी, हिंदी, इग्रजी भाषेचा प्रभाव पडत आहे**. पौराणिक कथांबरोबर

सामजिक, राजकीय, शैक्षणिक विषयांचा समावेश होत आहे. लिखित नाटके वर्तमानकाळातील समस्यांचा वेध घेऊन भाष्य करीत आहेत.

**लोकगीते लोककथा लोकनृत्य म्हणी वाक्प्रचार यासारख्या वरती हिंदी आणि इंग्रजी सारख्या भाषांचा प्रभाव पडत आहे.**

दारिद्र्य, गरीब व पोटाचा प्रश्न याचा फायदा ख्रिश्चन मिशनऱ्यांनी घेतला आहे. तो प्रलोभनाच्या जोरावर आज नंदुरबार जिल्ह्यातील मावची व भिल्लांमध्ये धर्मांतराचे प्रमाण बरेच दिसून येते. मावची जमातीची बरीच गावे ही ख्रिश्चन धर्म स्वीकारलेली आहेत. त्या मावची जमातीचे श्रद्धास्थान, भावविश्व, लोकतत्त्वे, बोली यामध्ये आज अनेक बदल झालेले आहेत. मावचीच्या लोकगीतांची जागा आज येशूच्या गाण्यांनी घेतली आहे. ख्रिश्चन धर्माचरण करताना दिसतात. जुन्या अंधश्रद्धांवर शिक्षित मुले विश्वास ठेवत नाही. एक प्रकारचे एक नवे भाव व श्रद्धाविश्व निर्माण झाले आहे. लोकसाहित्याकडे दुर्लक्ष होत असून **बोलीभाषेत ख्रिश्चन धर्म विषयक नवीन शब्द आले आहेत**. या धर्मांतरित व अधर्मांतरित यांच्यामध्ये एक प्रकारचा संघर्ष निर्माण झाला आहे. नाही म्हटले तरी धर्मांतरामुळे हा बदल होणे अपरिहार्य आहे.

जागतिकीकरणामुळे माणसे एकमेकांपासून दूर गेले. "संगणकाने जगाला जवळ केले, परंतु माणसाला मात्र दूर फेकले आहे. मूळ भारतीय माणसाचं जगणं, त्याची लाईफ लाईन आता डेड झालीय. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेकारीचे प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, जगण्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत."[13] असे डॉ. बबन भाग्यवंत म्हणतात त्यात तथ्य वाटते. जागतिकीकरणाच्या इष्ट-अनिष्ट परिणांमाविषयी डॉ. रमेश वरखडे म्हणतात, "जागतिकीकरणामुळे लोकजीवनातील विविधता संपेल आणि नागरिकरणामुळे संस्कृतीचे सपाटीकरण होईल ही भीती व्यक्त केली जाते. काही प्रमाणात ते खरेही आहे. आपली लोकगीते, लोकनृत्ये, लावण्या, पोवाडे, तमाशा ह्या रंगमंचीय आविष्कारांना घरघर लागली आहे. डिस्को डान्सचा जमाना आला आहे. पाहता हे खरे आहे. रंजन उदबोधनाची साधने बदलली आहेत, पण तरीही कॅसेटस आणि आयपॉडमधून मराठी लोकगीते ऐकणारा वर्ग वाढला आहे. बोलीभाषेचा ढंग दूरचित्रवाणीच्या पडद्यावर दिमाखाने मिरवतो आहे."[14] अर्थात जागतिकीकरणामुळे समाजावर बरे-वाईट परिणाम होत आहेत.

### 4.2 बोलींवरील परिणाम:

भारत व महाराष्ट्रात 225 आदिवासी बोली पैकी 150 बोली बोलल्या जातात. या बोलींना लिपी नाही व मौखिक परंपरेनेच एका पिढीकडून दुस-या पिढीकडे हस्तांतरित होत असते. भाषा आणि संस्कृतीचा अन्योन्यश्रयी संबंध आहे. जागतिकीकरणाच्या परिणामामुळे **आदिवासी बोली नष्ट होण्याच्या मार्गावर** आहेत.

सुशिक्षित आदिवासी आपली मुले सेमी इंग्लिश वा इंग्लिश मिडियममध्ये शिक्षणासाठी टाकत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला ज्या भाषेची आवश्यकता आहेत ची जागतिक भाषा म्हणून मान्यता पावत आहे त्या इंग्रजीचा प्रसार या शैक्षणिक संस्था करतात

जागतिकीकरणात इंग्रजी भाषेला प्राधान्य दिले आहे. इंग्रजी भाषा म्हणजे जागतिकीकरणाचे एक प्रभावी हत्यार आहे. इंग्रजी आज जागतिक भाषा झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे सर्व व्यवहार इंग्रजीतून चालतात. आर्थिक, सामाजिक, राजकीय व भौतिक गोष्टींची उलाढाल, संवादाचे माध्यम म्हणून इंग्रजीचाच वापर होतो. श्रीमंत देशाची भाषा म्हणून तिला मानाचे स्थान आहे. ती भांडवलदार व जगाची भाषा म्हणून मान्यता पावली आहे. जेते किंवा धनकोची भाषा म्हणून जगातील मागास व विकसनशील देशांना इंग्रजीचे अनुकरण, वापर करावा लागतो. **त्यामुळे कोणी नाही म्हटले तरी इंग्रजीचा प्रभाव रोखता येणार नाही. अशा जगद्व्याप्त जगमान्यता असलेल्या इंग्रजीच्या पुढे आदिवासी बोली कशा तग धरतील? कसा संघर्ष करतील? हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.**

इंग्रजीच्या प्रभावामुळे जगातील अनेक बोली सलाईनवर आहेत. त्या त्या बोलीभाषेत त्या त्या जमातीची संस्कृती, इतिहास, तत्वज्ञान, आचार-आचरण व नैतिक मूल्य सामावलेले असतात. पण बोलीच जेव्हा शक्तिविहीन होत असतील, तर तिच्यातील तत्वे आपोआप शक्तिहीन वा

मृतप्राय होत असतात.

सोयीस्करपणे इंग्रजीचा प्रसार आणि प्रचार होत आहे. त्यामुळे आदिवासी बोलीचे स्वरूप, तिची व्यवस्था, एकूणच बोलीचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे.

अनेक आई-वडिलांना इंग्रजी 'ढ'चा 'डी'सुद्धा कळत नाही. आपल्या मुलांनाही फाडफाड इंग्रजी बोलता यावं, या भाबड्या आशेमुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपली मुलं ते घालतात. मुलांना 'आई-बाबा' म्हणण्या ऐवजी 'मम्मी-पप्पा' म्हटलं की त्यांचा आनंद गगनात मावत नाही. अशी अवस्था आज ग्रामीण भागांमध्ये दिसते. सुशिक्षित आदिवासींमध्ये हीच प्रवृत्ती दिसून येते.

इयत्ता बालवाडी ते विद्यापीठिय शिक्षणाचे माध्यम हे इंग्रजी होत आहे. इंग्रजी ही जागतिक मान्यता पावलेली जागतिकीकरणाची ग्लोबल लँग्वेज आहे. हे आपण अभ्यासले. इंग्रजीतील बरेच शब्द आदिवासी बोलींमध्ये सतत वापरले जातात. उदा. रिक्शा, टेप, कार, मोबाईल, माईक, मोटार, सायकल, हॅंडल,चैन, ब्रेक, बॅग, बॅड, बॅट, बस, रेल्वे, टेबल, कार्बन, सिग्नल, वायर, ट्यूब, बल्ब, कॅमेरा, कॅसेट, कॅश, एम्पटी, गॅलरी, कलर, फोटो, बॉब, फाईल, मिसाईल, लाईट, मशिन, फ्यूज, सेल, इंजिन, बॅटरी, पेन, फोन, पॅट, शर्ट, कोट, टाय, बूट, सूट, हॅट, हॉटेल, प्लॅटफॉर्म, रिबन, बॉलपेन, पेपरवेट, रिम इत्यादी.

आपण इंग्रजी शब्द बोलतो, याची जाणीवही बोली बोलणा-याला होत नाही. इतके ते शब्द अंगवळणी पडले आहेत. साधारणत: आदिवासी बोलींवर मराठी, हिंदी, इंग्रजी, राजस्थानी, गुजराती व तेलगू या भाषांचा प्रभाव त्या त्या स्थानिक आदिवासी जमातींच्या बोलींवर झालेला आहे. प्रामुख्याने इंग्रजी-हिंदी यांच्या दडपणामुळे आज ब-याच बोली मृतप्राय: अवस्थेला आलेल्या आहेत. या संदर्भात डॉ. किशोर सानप म्हणतात "...भारतातच जवळपास १६५० भाषा बोलल्या जातात. ह्याशिवाय आदिवासींच्याही स्वतंत्र भाषा आहेत. भाषेची लिखित परंपरा ही केवळ नागरी भाषांमध्येच आढळते. जगातल्या अनेक आदिवासी भाषांना आजही लिपी उपलब्ध नाही. अनेक आदिवासी भाषा आता जगातूनच नष्ट होत चालल्या आहेत. केवळ आदिवासी भाषाच नष्ट होतात किंवा केवळ बोली भाषाच नष्ट होतात असे नाही, तर जगात मुख्य प्रवाहात असलेल्याही बोली आणि भाषा हळूहळू कोणत्या ना कोणत्या दडपणामुळे नष्ट होऊ पाहत आहेत."[15]

विकिपीडियात नोंदविल्याप्रमाणे जगातील 75% पत्रे, तारा व संदेश, एकूण नभोवाणी कार्यक्रमांपैकी 60% कार्यक्रम आणि इंटरनेटवरील देवाण-घेवाण जवळपास 90 % यातील देवाण-घेवाण सर्व इंग्रजीतच होतात. याचा परिणाम हा बोली भाषांवर झाल्याशिवाय राहत नाही. इंग्रजीच्या या प्रभावाने जगातील एकही बोली सुटलेली नाही.

आदिवासी बोलीवर इंग्रजीच्या आक्रमणाप्रमाणे हिंदीचे आक्रमण थोपविणे कठीण झाले आहे. विविध वृत्तवाहिन्या, चित्रपट, मालिका, दूरदर्शन, आकाशवाणी व वर्तमानपत्रे सतत हिंदीचा पाठपुरावा करीत आहेत.

या **आदिवासी बोलीवर इंग्रजी, हिंदी, तेलगू, मराठी, कन्नड या भाषांचा प्रामुख्याने प्रभाव पडत आहे**.

महाराष्ट्रातील काही आदिवासी जमातीच्या बोली या मराठी आहेत, तर काही आदिवासी बोली मराठीला जवळच्या आहेत. महादेव कोळी, मल्हार कोळी यांची मराठी बोली, वारली, ठाकरी, कोकणी, बरडे भिल्लांची भिल्ली, टोकरे कोळींची ढोरी किंवा अहिराणी, कातकरी इत्यादी बोली मराठीला जवळच्या आहेत. कोकणी बोलीविषयी डॉ.गोविंद गारे लिहितात, "कोकणी बोली ही कोकणात जमातींची भाषा, परंतु हल्ली ती ऐकावयास मिळत नाही त्यांच्यापैकी बरेच जण आपसांत व इतरांबरोबर मराठी बोलतात"[16]

### 4.3 संपर्क:

जागतिकीकरणाच्या काळात दळण-वळणाची साधने खूप निर्माण झाली आहेत. कामधंदा, बाजारहाट, शिक्षण, व्यापार व नोकरीच्या निमित्ताने आदिवासी लोकांचा संपर्क बाह्य, प्रगत समाजाशी येत आहे. त्याचाही परिणाम आदिवासी बोलींवर होत आहे. म्हणून पुष्पा गावित

म्हणतात, "अलीकडे शिक्षण, आरोग्य, नोकरी, व्यवसाय इ. निमित्ताने गावांमध्ये वस्त्या / पाड्यांमध्ये अनेक जातिजमातींचा वावर वाढला असल्याचे आढळते. त्यामुळे हळूहळू या भाषांमधील शब्दांचे आदान - प्रदान होऊन भाषेचे स्वरूप बदलू लागले आहे. नोकरी करणारी सुसंस्कृत अशी पुढची पिढी मोठ्या शहरांमध्ये स्थिरावू लागल्याने भाषा टिकवणे हळूहळू अवघड होणार आहे. लोकगीतांच्या ध्वनिफिती उपलब्ध होऊ लागल्या आहेत."[17] जागतिकीकरणाच्या संपर्कामुळे भाषेची देवाण-घेवाण होत आहे. नवीन शब्दांची भर बोलीत पडत आहे. त्यामुळे मूळ बोलीचे रूप बदलत आहे. जागतिकीकरणाच्या या प्रभावामुळे अनेक बोली मृतप्राय: होण्याच्या मार्गावर आहेत, तर काही बोलींचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

शासनाने यात वेळीच लक्ष घालण्याची गरज आहे. शालेय पाठ्यपुस्तकांची निर्मिती बोलीत व्हायला हवी. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून सर्वांनीच बोलीभाषेचा जागर जागवायला हवा.

### 5. निष्कर्ष:

जागतिकीकरणाने सर्व जग व्यापलेले आहे. मुक्त स्पर्धा, आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर करून उत्पादनात वाढ, संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ, व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रांत आदान-प्रदान केली जाते. इंटरनेट, सॅटॅलाइट, इंस्टाग्राम, फेसबुक, मेल, व्हाट्सअप, मोबाईल या सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

महाराष्ट्रात शासनाने प्रमुख 47 आदिवासी जमातींची घटनात्मक घोषणा केलेली आहे. त्यांच्या अनेक उपजमाती व पोटजमाती आहेत. त्यांच्या 74 बोलीभाषा बोलल्या जातात. कोकणी, भिल्ली, ठाकरी, वारली, पावरी, मावची, कोलामी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोरी किंवा अहिराणी, माडिया, कोरकू, पारधी, कातकरी, कोरकू, धनका, तडवी, खारिया, परधानी, माडिया, मुंडारी, संथाली, सावरा अशा अनेक बोलीभाषा बोलल्या जातात. या बोलींना लिपी नाही, त्या मौखिक आहेत. फक्त गोंडीला लिपी असल्याचे संशोधक मानतात.

इंग्रजी ही जागतिक भाषा म्हणून मान्यता पावली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे सर्व व्यवहार इंग्रजीतून चालतात. आर्थिक, सामाजिक, राजकीय व भौतिक गोष्टींची उलाढाल, संवादाचे माध्यम म्हणून इंग्रजीचाच वापर होतो. तिचा परिणाम आदिवासींच्या बोलीवर झाला आहे. त्यामुळे अनेक इंग्रजी शब्द आदिवासी बोलींमध्ये दिसून येतात. त्यामुळे अनेक इंग्रजी शब्द आदिवासी बोलींमध्ये दिसून येतात. त्याचबरोबर लोककथा, म्हणी, वाक्प्रचार यासारख्या वरती हिंदी आणि इंग्रजी सारख्या भाषांचा प्रभाव पडत आहे.

विविध वृत्तवाहिन्या, चित्रपट, मालिका, दूरदर्शन, आकाशवाणी व वर्तमानपत्रे सतत हिंदीचा पाठपुरावा करीत आहेत.

प्रसारमाध्यमांमुळे लोकगीते आणि लोकनृत्याला जगात प्रसिद्धी मिळाली. जागतिकीकरणाने लोकगीतांची गानसरणी बदली आहे. पारंपरिक वाद्यांऐवजी आधुनिक, इलेक्ट्रोनिक वाद्यांचा वापर लोकगीत व लोकनृत्य सादर करताना केला जातो. त्यामुळे काही पारंपरिक वाद्य नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

संपर्कामुळे भाषेची आदान-प्रदान होत आहे. त्यामुळे मूळ बोलीचे स्वरूप बदलत आहे. जागतिकीकरणाच्या या प्रभावामुळे अनेक बोली मृतप्राय: होण्याच्या मार्गावर आहेत, तर काही बोलींचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

### 5. संदर्भ:


१. ॲड. योगेश भाले, जागतिकीकरण: भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्र.आ. 2008, पृ. 46 वरून उद्धृत

२. प्रा. अशोक पळवेकर/सौ. उर्मिला चौहान, राज्यशास्त्र, नायरचा लेख, फडके प्रकाशन, कोल्हापूर प्र.आ. 2006, पृ. 164 वरून उद्धृत

३. सि.प. खरे, जागतिकीकरण: समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे, द्वि.आ. 2008, पृ.10

४. डॉ. विजय खेर, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, जगन कराड, डायमंड प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७, पृ. ३४

५. अरुण जखडे, संपादकीय, भाषांचे लोकसर्वेक्षण, (संपा.) पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१३, पृ. 52

६. तत्रैव, पृ. ५२

७. प्रा. गुरुनाथ नाडगोंडे, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ. आ. २००३, पृ. ३४०

८. विनायक तुमराम, आदिवासी साहित्य: दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2012, पृ. 14

९. कैलास सार्वेकर, बोली समाज: साहित्य आणि संस्कृती, प्र. आ. 2010,, प्रतिभास प्रकाशन औरंगाबाद पृ. 5 वरून उद्धृत

१०. विलास रणसुभे (संपा.), होय ! पर्यायी जग शक्य आहे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती-सप्टें २००६, वंदना सोनावळकर यांच्या लेखातून उद्धृत, पृ.१०९

११. गोविंद गारे, महाराष्ट्र आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ. आ. २०१२, पृ. 17

१२. तत्रैव, पृ. 17

१३. डॉ. बबन भाग्यवंत, जागतिकीकरण आणि मराठी भाषा संपादक डॉ. सूर्यकांत अजमेरा/ प्रा. विनोद उर्पवट, अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती 2011 प. 37

१४. डॉ. रमेश वरखडे, संपा. डा. जयद्रथ जाधव, जागतिकीकरण आणि आणि मराठी भाषा: आव्हाने आणि उपाय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ २०११, पृ 86

१५. किशोर सानप, जागतिकीकरण आणि आणि मराठी भाषा: आव्हाने आणि उपाय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०११, पृ. 117

१६. गोविंद गारे,, महाराष्ट्रातील आदिवासी जमात, उ. नि., पृ. 111

१७. पुष्पा गावित, भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, उ. नि., पृ. ४४४

◈◈◈

IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL.6 | ISSUE 6 | NOVEMBER- DECEMBER 2020

*Editor in Chief*
**Dr Kalyan Gangarde**

Scanned with CamScanner

5.

# आठवणींचे पक्षी: एक सामर्थ्यशाली साहित्यकृती

- प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ,
म. शि. प्र. मंडळ संचालित,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारूर, जि. बीड. महाराष्ट्र

**१. प्रास्ताविक:**

दलित साहित्याचा प्रवाह 1960 च्या आसपास उदयास आला. त्यात कथा, कविता या साहित्य प्रकारांच्या पाठोपाठ आत्मकथन या साहित्यप्रकारानेही गरुड झेप घेतल्याची दिसून येते. 'आयुष्यात जे भोगलं, जगलं, अनुभवलं, तेच लिहिलं', या भूमिकेतून दलित आत्मकथनकारांनी आत्मकथनांची मांडणी केली. क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा आणि परिणाम या साहित्य प्रकारात ठळकपणे दिसून येतो. प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुद्ध चीड, संताप, वेदना व विद्रोह या आत्मकथनामध्ये प्रकटतो. मनात खदखदणारा नकार- विद्रोह तितक्याच जोरकसपणे या आत्मकथनात मध्ये चित्रित झाला आहे. ' आठवणींचे पक्षी' हे प्र. ई. सोनकांबळे यांच्या आत्मकथनाने दलित आत्मकथनाला एक वेगळी दिशा दिली. लेखक दलित समाजात जन्मले, त्यामुळे तत्कालीन सामाजिक परिस्थितीतून ज्या दिव्यमधून, यातनांमधून दलित समाजाला जावे लागत होते; त्याचे चित्र लेखकाच्या रुपाने आले आहे. बालपणापासून ते लेखक प्राध्यापक होईपर्यंतचा प्रवास या आत्मकथनात चित्रित झाला आहे. आत्मकथनातील चित्रित झालेली सामाजिक विषमता, अस्पृश्यतेचा दाहक अनुभव, भुकेची आग, भयानक सामाजिक वास्तव, लेखकाचा जीवनवादी दृष्टिकोन, लेखकाचे संयमीत, प्रामाणिक व चिंतनशील व्यक्तिमत्व, निवेदनातली सहजता आणि बोलीभाषेचा वापर यामुळे 'आठवर्णीचे पक्षी' दलित आत्मकथनांच्या मांदियाळीत एक मैलाचा दगड म्हणून दिशादर्शक ठरले आहे.

**2. आठवणींचे पक्षी: स्वरूप:**

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात वेगवेगळे स्वतंत्र 28 लेख आहेत. ते ललित लेखासारखे आहेत. प्रस्तुत आत्मकथनात प्रामुख्याने आठवणी आल्या आहेत. मराठवाड्यातील महारी बोलीभाषा वापरल्यामुळे. या आत्मकथनाला ललित गद्याचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. या ललित लेखांचा एक नवाच आकृतिबंध निर्माण झाला; तो म्हणजेच 'आठवणींचे पक्षी' होय. यासाठी जीवनानुगामी लेखनरिती लेखकाने स्वीकारली आहे. लेखक लिहितात, "खूप दिवस मनाच्या कोपऱ्यात दडून राहिलेल्या अनेक सुखद-दुःखद आठवणी या 'आठवणींचे पक्षी' या रूपाने बाहेर आल्या. लोकांच्या खूप जवळ गेल्या. काहींनी त्यांना जरा दूर केले नव्हे, तेव्हा ते जरा दबकत राहिले. पण अनेकांनी खुप विचारपूस केली. 'आठवणींचे पक्षी'ने माणसांशी संबंध जोडला, कारण ते माणसांची संगत करणंच त्यांना आवडतं."[1] मानवता आणि जीवनवादाचा पुरस्कार लेखकाने केला आहे.

**3. आशयातून उलघडणारे लेखकाचे व्यक्तिमत्व:**

साहित्य आणि समाजाचा अत्यंत निकटचा संबंध आहे. साहित्य हा जीवनाचा आरसा असतो. तसेच लेखक ज्या समाजात जन्म घेतो, त्या समाजाचे बरे-वाईट संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतात. एकाच समाजात जन्म घेणाऱ्या वेगवेगळ्या जाती जमातीतील साहित्यकार यांच्या साहित्यकृती मध्ये फरक पडताना दिसतो. दलित आत्मकथनांमधून लेखकाची स्वतःची जडणघडण दिसते. लेखकाने पहिले भोगले केलेल्या स्व इतरसी संघर्ष, त्याचा स्वतःचा आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, त्याने केलेले आत्मपरीक्षण या आत्मकथन मध्ये दिसून येते. प्रस्थापित समाज व्यवस्थेत त्याची होणारी उपेक्षा, या विशाल सामाजिक संरचनेचा त्याच्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम, त्याचे होरपडून निघालेले व्यक्तित्व या आत्मकथनात मधून प्रकट झाले आहे.



Scanned with CamScanner

म्हणून डॉ. भालचंद्र फडके यांनी दलित आत्मकथनांना "दुःखाच्या अभंग गाथा"[3] असे म्हटले आहे. यात येणाऱ्या लेखकाचे चित्र हे प्रातिनिधिक- व्यक्तिगत जाणीव या स्वरूपाचे आहे. 'आठवणींच्या पक्षी'मध्येही लेखकाने घेतलेला आत्मशोध, जीवनाचा आलेख ठसठशीतपणे पाहावयास मिळतो.

प्रस्तुत आत्मकथनात प्र. ई. सोनकांबळे एक सोशिक, संयमी, निर्मळ, प्रामाणिक व्यक्तिरेखा साकारताना दिसतात. मराठवाड्यातील उदगीरमधील एका लहानशा सुल्लाळी नावाच्या खेड्यात लेखकाचा जन्म झाला. लेखकाचे आई-वडील लहानपणीच मृत्यू पावल्यामुळे त्यांच्या वाट्याला भयावह यातना व दुःख आले. लेखकाला दोन बहिणी, अक्का ही त्यांची मोठी बहीण. आई-वडिलांच्या मृत्युनंतर तीच लेखकाला घरी घेऊन गेली. तिची आर्थिक परिस्तिथी अत्यंत हलाखीची होती. नवरा आळशी आणि बिनकामाचा होता. आई -वडील गेलेला 'परदिसा' प्रल्हाद पुढे त्याच्या वाट्याला सतत कष्ट आले. त्यामुळे तो पडेल ते काम अक्काच्या घरी करायचा. यासंदर्भात ते लिहितात," काई काई रानातून आणून बामनाच्या, पाटलाच्या वाड्यात देयाचोव. के जे देतील ते शिळेपाके घेऊन लेकरा बरोबर मुचू मुचू खाऊन गळागळा जास्त पाणी पिऊन पोट भरून घ्यायचो" (पृ. 26 )अक्काच्या नवराने सांगितलेला लिंबाचा पाला आणणे, बिदवा गोळा करणे अशी अनेक कष्टाची कामे लेखक करतो. चुकी झाल्यावर बहिणीचे " निस्पुरी भाड्या मायबाप गिळला आता मला गिळाय बसलाय"(पृ.21) आपल्या चेरा या गावी ती त्याला सरकारी शाळेत टाकते.

कष्टाची कामे करत असतानाच त्याच्या बाल मनाला अनेक गोष्टी जाणवतात. त्याच्या व्यक्तिमत्त्वातला प्रामाणिकपणा वाचकाला जागोजागी प्रत्ययास येतो. त्याकाळात केला जाणारा भेदभाव, जाती जातीतला भेदभाव, शोषण, काम करूनही दिली जाणारी हीन वागणूक लेखक आत्मकथनात टिपतो. हे आत्मकथन म्हणजे वास्तवाचा एक निखारा आहे. महाराष्ट्रातील महार मांग समाज एकेकाळी मेलेल्या प्राण्याचे मांस खात होता, हे लेखक मोठ्या धाडसाने सहज नमूद करतो. या खाण्यामागील त्याची कारणमीमांसाही देतो. भुकेच्या आगीतून माणसाला हे सर्व कराव लागतं याचे भान लेखकाला आहे. लेखकाची आई प्रल्हादला लहानपणीच पंढरपूरला घेऊन गेल्यामुळे प्रल्हाद स्वतः मेलेल्या जनावरांचे मांस खात नाही. मात्र जेव्हा मांस वाटप होई, तेव्हा अक्का त्याला घेण्यास पाठवायची. तेथील प्रसंगही लेखक संवेदनशीलपणे टिपताना दिसतात. एक एका मांसाच्या तुकड्यावरून होणारी भांडणे, कुत्र्याचे धावुन येणे, हाणामारी याचे ऑखो देखे चित्र लेखकाने रेखाटले आहे. घरात मांस असले म्हणजे प्रल्हाद चक्क रोटी व कांदा खाऊन दिवस काढत असे. कधीकधी चिंचोक्या खाऊन दिवस काढायचा. स्वतः मांस खात नसला तरी कधीकधी प्रल्हाद अक्कासाठी मांस शिजवून ठेवायचा. अनेक कामे अक्काला मदत व्हावी म्हणून लेखक करत असे.

माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वर्तन करावे. अन्याय, अत्याचाराविरुद्ध पेटून उठावे, शिका, संघर्ष करा, संघटीत व्हा. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूलमंत्र पुढे प्रल्हाद आपल्या आचरणात आणतो शिक्षणाचा ध्यास धरतो. मात्र तूर्तास त्याच्यासमोर अंधार होता. भीमराव बापू पाटील सारख्या माणसांनी प्रथमतः प्रल्हादला माणूसपणाची जाणीव करून दिली. "तुबी माणूस व्हईस"(पृ. 32) तेच त्याला 'परलू महाराज' म्हणून संबोधत.

बाई ही प्रल्हाद ची दुसरी बहीण. जगळपुरला राहत असे. अक्काचा नवरा धोंडीबा जेव्हा तिला मारत असे, तेव्हा प्रल्हाद बाईच्या गावी जाई. मात्र तिच्या नवऱ्याच्या- किसन दाजीच्या भीतीपायी प्रल्हाद देवळात थांबत असे. बाई नवऱ्याचा डोळा चुकून प्रल्हादला भेटत असे. आक्का, बाई यांच्या रूपाने तत्कालीन दलित स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव वाचकाला यातून होते. चेरा या गावी फक्त चौथीपर्यंतची शाळा होती. तेथील शिक्षकांनी प्रल्हाद चा शिक्षणाचा खर्च उचलण्याचे आश्वासन दिले. हडोळतीच्या शाळेत विनायक गुरुजींनी त्याचे नाव घातले. विनू मास्तरांचे पाठवळ प्रल्हादला मिळाले. गुरुजींच्या पाठबळामुळे तो मराठी शाळेत चमकला. आपल्याला आई-वडील नाहीत, आपण दुसऱ्यावर अवलंबून आहोत याची जाणीव त्याला सतत होत असे. असाह्य परिस्थितीची जाणीव लेखकाला होताना दिसते.



Scanned with CamScanner

चेरा ते हाडोळती शाळेत रोज पायी जात असे. त्याला ढोर समाजाचा केरबा नावाचा मित्र होता. बाभळीची साल विकून पैसे कमावता येतील हा विचार केरबा मुळे शक्य झाला. केरबाच्या घरी कातडी कमावण्याचे काम केले जाई. कातड्याचा किळसवाणा वास येत असे. खाण्याच्या वासाने लेखक तेथे जात असे. बाभळीची साल विकण्याबरोबरच पोटाची खळगी भरण्यासाठी मुद्दीच्या दिवशी हागणदारीच्या भागात फिरून हाडे गोळा करून त्याची विक्री करून पैसे मिळवायचे. हाडे गोळा करणे आणि त्याची विक्री करणे हा 'सेल्फ एम्प्लॉयमेंट'चा धंदा आहे, असे लेखकाला वाटते. मात्र हे सर्व करताना आपल्याला मास्तरांनी पाहिले तर काय म्हणतील, याची भीतीही प्रल्हादच्या मनात येते.

लेखकाने शिक्षणासाठी खूप हाल-अपेष्टा भोगलेल्या आहेत. शाळेत जेवणाचा डबा नसणे, शिळी पाकी भाकरी संडासच्या मागे बसून खाणे, डबा नसल्यास आजूबाजूच्या शेतात जाऊन जमिनीतून शेंगा उखरून खाणे असे नानाविध उद्योग त्याला करावे लागले. केरबा प्रमाणेच कुंभार समाजातील धर्मा हा त्याचा मित्र होता. त्यानेही त्याला मदत केली आहे. कोणतेही काम कमी प्रतीचे नाही यावर लेखकाचा विश्वास होता.

भुकेची आग हा या आत्मकथनाचा महत्त्वाचा कणा आहे, नव्हे तो एक या आत्मकथनाचा विशेष असा पैलू आहे. लेखकाने भुकेपणाने अनेक किळसवाणी कामे केली आहेत. गंगाबाईच्या वाचलात असलेले सडलेले कुत्रे लागते (पृ. 63-64) आणि मिळालेली चतकोर भाकर संडासच्या मागे बसून खातो(पृ. 66). मुस्लिम मित्राच्या घरी सुंताच्या कार्यक्रमाला जातो, तेव्हा तेही त्याला वेगळाच अनुभव येतो. एका महारोगी असलेल्या बाईच्या घरच्या भांड्यात त्याला जेवण वाढले जाते. (पृ. 65) तसेच शेतात एकदा कुत्र्याच्या तोंडी पदार्थ दिसतो कुत्रा चावत नाही असे त्याला लोक म्हणतात. म्हणून तो कुत्र्याच्या दिशेने दगड फेकतो. कुत्रा अंगावर धावून येतो घेतो, शिकारच्या नादात आपणच शिकार झालो असे लेखकाला वाटते.

पोटासाठी वेगवेगळया प्रकारची कामे लेखकांनी केलेली आहेत निंदणी खुरपणी, शेण काढणे, कापूस वेचणी, उंट सांभाळत मेलेल्या ढोराचा पाय धरत, शेंगा वेचत, दुकान सारवत, आंबे टाकीत, धसकट वेचीत पळसाच्या पत्रावळया लावीत, लाकडे फोडीत, वेसकरी रोजनामा सही करून आणत, मढ्याची बातमी देत, बोळाई आणाया जात, असे करत दिवस जात होते. लहान बहीण बाई तिच्या घरीही तिच्या नवऱ्याची गुलामगिरी करावी लागली. यासंदर्भात लेखक लिहितात "मी होतो ना हुकुमाचा ताबेदार, जणू काय वतनदार बलुतेदार. त्याला सारेच हक्क. फक्त हक्क नाही, नाही होय म्हणायचा. दाजी दुसऱ्याचा गुलाम तर मी त्याचा पर्यायाने मी गुलामाचा गुलाम".(पृ. 78). अशी त्याची अवस्था होत असे.

शिक्षणासाठी पुढे लेखक लातूर येथे येतो. एका बोर्डिंगमध्ये त्याला प्रवेश मिळतो. येथेही त्याला वेगळीच वागणूक मिळते. स्वयंपाक करणाऱ्या बायांना मदत केल्यामुळे त्या बाया त्याच्यावर माया करतात. एकच ड्रेस असल्यामुळे कधीकधी ओल्या कपड्यांनीच त्याला शाळेत जावे लागते, त्यापायी त्याला आजारही होतात. कावीळ, खरुज हे आजार तर त्याच्या वाटयालाच पुजलेले आहेत की काय असे वाटते.

अस्पृश्यतेचा दाहक अनुभव प्रल्हादाच्या वाट्याला भरभरून आलेला आहे. अस्पृश्यतेच्या नांग्या त्याला खूप डसलेल्या आहेत. उदाहरणार्थ चेलम्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रसंग, गावात भाकरी मागताना 'जोहार मायबाप जोहार' असे म्हणत. उदाहरणार्थ, चिखल तुडवताना पुष्पाबाई ला झालेला स्पर्श (पृ. 64). पाचवीच्या वर्गात असताना मुले विटाळ म्हणायचे (पृ. 76), असे एक ना दोन अनेक प्रसंग त्याच्या जीवनात येऊन जातात. शाळेत टेंगळे मास्तरांनी आपले अनुभव डायरीत लिहायला सांगितल्यामुळे प्रल्हादचे जीवन कळते तेव्हापासून ते त्याच्यावर चांगलीच दया करत. अशाही परिस्थितीत प्रल्हाद इंग्रजीत चांगले मार्क मिळवून सेकंड क्लासमध्ये मॅट्रिक पास होतो.

प्रल्हाद पुढे उच्च शिक्षणासाठी औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात एम ए करिता प्रवेश घेतो. प्राचार्य वानखडे सरांशी त्याचा परिचय होतो. एम ए इंग्रजी होऊन पुढे एल बी ही करतो. आंबेडकर महाविद्यालयात नोकरी लागते. प्राध्यापक, उपप्राचार्य ते

प्राचार्य पदापर्यंतचा प्रवास लेखक टिपतात. नोकरीनंतर पत्नी, मुलगी आणि ते गावी येतात. पण तेव्हाही महाराचा पोरगा म्हणून उंटवाले नकार देतात (पृ. 125) जात त्यांचा पाठलाग करत असते. मित्राच्या घरी गेल्यावरही विचित्र वागणूक मिळते, एका प्लास्टिकच्या ग्लासात चहा घ्यावा लागतो (पृ. 131). त्याचा परिणाम लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला आहे. पण तरीही त्याचे व्यक्तिमत्व विद्रोही नाही. एक प्रकारचा संयम, सोशिकता त्यांच्या व्यक्तिरेखेत आहे. आपल्या उपकार करते विषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे. मात्र हेटाळणी करणाऱ्यांविषयी विषयी त्यांनी प्रामाणिकपणे लिहिले आहे. त्यांच्याविषयी आक्रस्ताळेपणा वा कडवेपणा ते व्यक्त करीत नाही. म्हणून डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात,"जी माणसे एखाद्या प्रसंगी वाईट वागली त्यांनाही समजून घेऊन त्यांच्यातला चांगुलपणा शोधण्याचा प्रयत्न लेखक करीत असलेला दिसतो. या सर्व लेखनातून लेखकाचे एक निर्मळ, संयमी, सोशिक, व्यापक विचारांचे मन अभिव्यक्त झाले आहे"[3] म्हणण्यात तथ्य आहे. एक सोशिक, संयमित आणि चिंतनशील व्यक्तिरेखा असलेल्या माणसाला शेवटपर्यंत जात कशी चिकटलेली असते, याचा प्रत्यय हे आत्मकथन शेवटपर्यंत देत राहते.

**4. दलित्वामुळे होणारी उपेक्षा आणि अन्याय , अत्याचाराचे स्वरूप:**

अस्पृश्यता ही समाज व्यवस्थेचे एक प्रमुख लक्षण आहे .भारतातील फार मोठा जनसमह 'बहिष्कृत' मानला गेला आहे. कारण चातुर्वर्ण्य पद्धतीने त्यांचा स्पर्शच अमंगल मानलेला आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून दलितांवर अन्याय, अत्याचार केले जातात, त्यांची उपेक्षा केली जाते. दलितांचे माणूस असणेच यामुळे नाकारले जाते. शाळेसारख्या पवित्र ठिकाणी ही अस्पश्यता पाळली जाते. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांवर ह्या अस्पृश्यतेचा परिणाम झालेला आहे .इथे केवळ माणूस जन्मामुळेच अस्पृश्य मानला जातो.

'आठवर्णींचे पक्षी'मधील दलितांच्या वाट्याला दलित्वामुळे अनेक वेळा जाणिवपूर्वक अन्याय, अत्याचार केले जातात. दलित म्हणून उपेक्षा केली जाते. लेखकांच्या वाट्याला तर ही अवहेलना पदोपदी आलेली दिसते. शिक्षण घेत असतांना शिक्षक अस्पृश्यता पाळत, लांबून छडी मारत.( १५५ ) शाळेत दलित विद्यार्थ्यांना वेगळे बसवत.( ११५ ). हडोळतीला शिकता बरोबरच विद्यार्थ्यांचीही प्रल्हादशी उपेक्षा करते. (पृ. ७६) कॉलेजमध्ये असतांना लेखक एका ब्राह्मण मास्तराबरोबर हुरडा खाण्यास जातात, पण तेथील सर्वांबरोबर घोंगडीवर बसल्यामुळे माळ्याला सोनकांबळ्यानी हुरडा खाल्लेले पटत नाही ते म्हणतात, "दिवाणजी साहेब, तुम्ही काहीही म्हणा, हा परल्या काई शिकला तर ऊतीम लोकांच्या वरं पंगतीला बसणं वर नाही. त्याला हे घातक हे कारण त्यानं आपल्या पायरीनेच वागावं ." ( पृ . ६४ ) एकदा चिखल, तुडवता - तुडवता कुंभारच्या लक्ष्मीबाई आणि पुष्पाबाईला प्रल्हादचा स्पर्श होतो .माराच्या भीतीने तो पळ काढतो. मुसलमानाच्या मुलांची सुंता करण्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रल्हाद जेवायला जातो .तिथे जेवणाचे ताट त्याच्यासाठी मद्दाम बाहेरून आणतात, तेही महारोग्याच्या घरून आणले जाते.( पृ . ६५ ) ज्याठिकाणी कुत्र्यांची गरेढोरे पाणी पितात तिथे प्रल्हाद घाबरतच पाणी पिऊ लागतो तर तिथेही त्याला धमकी मिळते (पृ. ९६) लेखक शिकून प्राध्यापक होतात तेव्हाही त्यांना जात कळसामेळ मरसागवीच्या पाटलाच्या आढतीवर कणी नीट बोलणासे झाले ( पृ. १२५ ). उटावरून प्रवास करताना जात कळल्यामळे बरोबर बडबड करणारा म्हातारा बोलेनासा होतो. ( पृ. १२७ / १२८) पाटलाच्या पुतळाबाईला घ्यायला गेले असतात. जेवण आणि पाणी वरून टाकले जाते. ( पृ . ११५ ) खेळणाचा दलित विद्यार्थ्यांना 'ह्याना त्या कारणावरुन खेळाडूच्या यादीतून कमकरण्यात येतासे" (पृ. १३८). उपप्राचार्य झालेल्या लेखकाचे १९७२ मध्ये कपडे शिवणारा शिंपी स्पर्श करीत नाही, हे सामाजिक जीवनवास्तव वाचकांना अस्वस्थ करते.



Scanned with CamScanner

**5. भूकेची आग:**

भूक ही दलितांच्या जीवनातील महत्त्वाची सामाजिक समस्या आहे. दलितांच्या बकाल जीवनात भूक ही केंद्रवर्ती असून अपमान, मारहाण, शिव्याशाप हे या केंद्राभोवती फिरत असतात. प्रत्येक सजीव प्राण्याची भूक ही प्राथमिक शारीरिक गरज असते. जीवशास्त्रीयदृष्ट्या हा घटक महत्त्वाचा असून माणूस नैसर्गिकरीत्या अन्नासाठी धडपडत असतो. दलित आत्मकथनांमध्ये "दलित जीवनातील दारिद्र्य भुकेचा प्रश्न ठळकपणे अधोरेखित करते. दारिद्र्य आणि भूक यांची अभद्र सांगड दलित जीवनाला होरपळून काढते"[4] विषमता हे भारतीय समाजरचेनेचे वैशिष्ट्ये आहे. गरीब - श्रीमंत ही दरी वाढतच आहे. समाजाच्या एका गटाच्या हाती सत्ता, संपत्ती आहे. तर दुसरा गट निराधार आहे. यातील काहींची तर ' ना घर ना गाव ' अशी अवस्था आहे. त्यांना कोरभर भाकरी आणि टीचभर पोटासाठी अहोरात्र श्रम करावे लागते. त्यांचे सारे जीवन ' भाकरीचा चंद्र ' शोधण्यातच जाते. त्यासाठीच त्यांना संघर्ष करावा लागतो. म्हणूनच डॉ . वासुदेव मुलाटे म्हणतात, "दलितांच्या अभावग्रस्त जीवनात भूकही रौद्र स्वरूपात आढळते. म्हणून दलित आत्मकथनांच्या मधूनही भुकेसाठी दलितांना कराव्या लागणाऱ्या जीवन संघर्षाची चित्रे मोठ्या प्रमाणात रेखाटलेली आढळतात . . . . पोटाच्या टीचभर खळगीसाठी माणसाला पशूपेक्षाही हीन पातळीवर येऊन जगावे लागते."[5] अस्पृश्यतेच्या प्रश्ना इतकाच हा भुकेचा प्रश्न भयानक स्वरूप घेऊन दलित आत्मकथनांमध्ये अभिव्यक्त होतो. दलितांची अशी पशूपेक्षाही हीन अवस्था हे जातीव्यवस्थेच फलित आहे. हे भुकेचे चित्रण प्रथम मराठी साहित्यात दलित आत्मकथनांनीच आणले. "दलित आत्मकथांतून व्यक्त होणाऱ्या भूकेच्या वेदनेचे दर्शन मराठी साहित्यात तरी प्रथमच घडत असावे."[6] डॉ. भालचंद्र फडके यांचे विचार या संदर्भात योग्य वाटतात. भुकेचा प्रश्न 'आठवणीचे पक्षी' आत्मकथनांमध्ये वास्तव जीवनवैशिष्ट्यांसह अभिव्यक्त होताना दिसतो.

या आत्मकथनात महार - मांगाच्या भुकेचे चित्रण आलेले आहे. भूक हा गरीबांच्या जीवनातला मोठा प्रश्न असतो .अन्नासाठी दलितांना आकाश पाताळ एक करावे लागते. लहानशा प्रल्हादला लहानपणापासूनच प्राप्त परिस्थितीशी संघर्ष करावा लागतो .मोठे जनावर मेल्यावर कुत्रे, गिधाडे प्रमाणे भांडणे करतात .मेल्या ढोराचे मांस खाऊन ( पृ . २७ , २८ ) भूकेचा प्रश्न सोडवतात. प्रल्हाद भीमराव बापूच्या शेतातही कामाला जाई. भुकेपायी हरडाखायचा आणि पाणी प्यायचा. त्यामुळे पोट दुखायचे कारण मधले दाणे इतके फुगायचे की ते " टचाटचा टोचल्यावाणी वाटायचं." ( पृ . ३२ ) कधी कधी भीमराव बापूंच्या घरून पोटासाठी शिळंपाकं अन्नही मिळे, हडोळतीच्या शाळेत असताना मधल्या सुट्टीत विद्यार्थी भाकरी खात. त्याचवेळेस प्रल्हादच्या पोटातही भूक असे. अशा वेळेस तो "चोरून हळूच शेंगा काढून नेलेल्या पाठीमागच्या मोकळ्या वावरात जायचो वखरुज लागलेली असून, पतपाणी असूनही रोटी नसल्यामुळे व पोटात भणभणखावखाव करतासल्यामुळं खापराबिपरानं नसता दगडाच्या चिपरुंगीनं रान उकरून मिळाल्या त्या शेंगा खातासे" ((पृ . ४६) याच भुकेपोटी चतकोर भाकरीसाठी गंगाबाईच्या वतलात मरून पडलेले कुत्रे ओढून फेकावे लागते. ते फेकूनही म्हातारीची सून डोळे मोडते. ( पृ . ६२ , ६३ ) मुसलमानांच्या ( गरवदीन ) सुंताच्या कार्यक्रमा (पृ. ६४, ६५) चतकोर भाकरीचा तुकडा तहसील कचेरीच्या मागील संडासाच्या पाठीमागे जाऊन खातो व परीक्षेला बसतो. (पृ. ६६) पोटासाठी वेगवेगळ्या हिरव्या भाज्या लागतात आणि पोट भरावे लागते. ( पृ . ७३) आणि आक्काच्या कुटुंबात राहणाऱ्या प्रल्हादने उपासमारीचे चित्रण रेखाटले आहे. " ती पोटातल्या पोटात थोड्याशा चिमूटभर पिठाकुठात फांदीच्या भाजी मुटकुळे करून देतासे व आंबाडीचा ठेसा मला आवडतो म्हणून लई ठेसा व थोडी भाकर देतासे "( पृ . ११३ ) बहिणीच्या घरी गोडधोड कधी होतच नाही. (पृ. ११३) हरिजन बोर्डिंगमध्ये असताना जेवण नक्की आणि तेही वेळेवर मिळतेच असे नव्हते. म्हणून प्रल्हाद शाळेमागच्या शेतात चोरून लपून तुरीच्या, मुगीच्या शेंगा, सजगुऱ्याचे कणसे, तोंडाने खाऊन पोट भरायचा. ( पृ. १४० ) वेसकरपाळीच्या भाकरी मागत. या पोटासाठी चाललेल्या धडपडी विषयी लेखक लिहितात, " असा हा प्रकार पाहून सारं काही पोटासाठी करण्याने मन कसे होत असेल ते दुसऱ्यानेच ठरवावे अगदी मन खिन्न होते व काहीच सुचत नाही." (पृ. ६१) असे दारिद्र्य उपासमार पाहून बाबुराव बागुलांसारखे कोणत्याही मानवी हृदय असलेल्या व्यक्तीच्या मनात प्रश्न उभे राहतील "या समाजाला हे अपरंपार दैन्य कोणी दिले? कितीही कष्ट केले तरी पोटभर अन्न मिळण्याची मारामार ही



Scanned with CamScanner

त्यांच्या कष्टांची किंमत कोणी ठेवली ? ही कधीच पुरी न झालेली भूक कोणी कायम ठेवली ? आणि त्यामुळेच माणसाचेच मोल कवडी किंमतीचे झाले हे अधमकृत्य कोणी केले?"[7] प्रस्थापित समाज व्यवस्था ही याला कारण आहे. त्या व्यवस्थेनेच दलितांची गोची केली. त्या व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी 'शिका, संघर्ष करा, संघटित व्हा' हा डॉ . आंबेडकरांनी सूचविलेला मार्गच खूप महत्त्वाचा वाटतो.

**6. दारिद्र्याची भीषणता:**

भारतीय समाजव्यवस्थेचे वैशिष्टये असे की , प्रत्येक जातीचा काही विशिष्ट असा व्यवसाय आहे. काही जातीची कामे ठरवून दिलेली आहेत. अर्थात तो ह्या समाजव्यवस्थेचा वर्णधर्म मानला जातो. 'आठवणींचे पक्षी' या प्रस्तुत आत्मकथनातही पोटासाठी दलित समाजाला वेगवेगळी कामे करावी लागताना दिसतात. वेसकरांची पाळी असली म्हणजे गावात भाकरी मागतात. प्रल्हादनेही वेसकर पाळीच्या भाकरी मागितल्या आहेत. दलित म्हणजे इतराच्या दृष्टीने हलक्या जातीचे म्हणून त्यांना व्यवसायही नाही. गावकीच्या कामाचा मोबदला तोही भाकरीच्या स्वरूपात मिळतो. उदरनिर्वाहासाठी अन्य व्यवसाय नाहीत, म्हणून वेगवेगळी कामे दलितांना करावी लागतात. लेखक लिहितात, "निदणं खुरपणाच्या मोसमात लई करून काही गडी व काही बाया मिळन बापणाचे गत्ते घेतासत व माणसं बाया बरोबरीनेच निंदीत असूनही माणसाला बाईच्या डबल दाणे देतासत व बायाला माणसाच्या निम्मेदाणे देतासत." (पृ. २४) शेतीची वेगवेगळी कामे आकाबरोबर प्रल्हादने कामे केलेली आहेत. "बिचारी अक्का मातर कधी शेण काढायची तर बिदवा भरायची. तर कधी माती कामाला तर कदी दसकटा पळाट्याला जायची काय तरी करून पोराबाळाचं पोट भरत व्हती." ( पृ. २६ ) लेखकांनी शेतीची, गवत कापणी, उंट राखण्याचे, शेण काढण्याचे, सडलेले कुत्रे ओढण्याचे, दुकाने सारवणे, आंबे विकणे, कापूस वेचणी, पळसाच्या पानाच्या पत्रावळ्या करणे, लाकूड फोडणे, वेसकरी रोज काम सही करून येणे, हाडे गोळा करणे अशीहीकामे करत लेखक प्राध्यापक व्यवसायापर्यंत मजल मारतो. एकंदरीत अठराविश्व दारिद्र्य हे दलितांच्या वाट्यालाच पुजलेले असते, त्यासाठी दलितांना वेगवेगळी कामे करावी लागतात.

**7. 'आठवणींचे पक्षी'मधील जीवनविषयक दृष्टिकोन:**

साहित्य आणि समाज यांचा संबंध परस्पुरानुबंधी आहे .समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटते .म्हणूनच ' Literature is mirror of life ' अशी विधाने समीक्षक करतात. प्रत्येक कलावंताची लेखन विषयक विशिष्ट अशी भूमिका, धारणा असते. त्याच्या लेखनामागे विशिष्ट असे तात्त्विक अधिष्ठान असते. त्या अधिष्ठानाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम त्याच्या साहित्यावर होत असतो. ही जीवनविषयक भूमिका वा धारणा म्हणजेच कलावंताचा जीवनविषयक दृष्टिकोन होय. दलित लेखकांचा दृष्टिकोन हा जीवनवादी आहे, हा दृष्टिकोन खूपच व्यापक स्वरूपाचा, परिवर्तनवादी, 'माणूस' हा या दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आहे. दलित जाणीव हाच दलित लेखकाचा जीवन दृष्टिकोन आहे . तीच सामाजिक जाणीव आहे. या जीवनवादी दृष्टिकोनात आंबेडकरी विचार हा प्रमुख आहे. काही समीक्षक ह्या विचारालाच दलित जीवन दृष्टिकोन म्हणून संबोधतात. श्री. शंकरराव खरात यांच्या मते, "दलित जाणिवांतून निर्माण झालेल्या दलित साहित्य कलाकृती सत्यार्थाने वास्तववादी व जीवनवादी आहेत . त्यात दास्यमुक्तीचा आंबेडकरी दृष्टिकोन आहे."[8] ही दलित जाणीव मानव मूल्याधिष्ठित आहे. डॉ. वासुदेव मुलाटेंच्या मताप्रमाणे " दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार होय. आशावादी दृष्टिकोन, दलित जीवनाची दु : खे तरलतेने टिपण्याची प्रवृत्ती तसेच सामाजिक बांधीलकीशी असणारे अतूट नाते म्हणजे दलित जाणीव . हीच दलित साहित्याचा मूलाधार आहे."[9]

दलित साहित्य समीक्षेत दलित जीवन दृष्टिकोनाला संवेदनशीलता, दलित मानसिकता, दलित जाणीव, सामाजिक जाणीव आणि सामाजिक बांधीलकीविषयक दृष्टिकोन अशा वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते . हा जीवन दृष्टिकोन माणूस मूल्यधिष्ठित आहे. माणसांचे ' माणूस ' म्हणून अवमूल्यन करणाऱ्या विरूद्ध विद्रोह, जात, वर्ण यामुळे निर्माण होणाऱ्या विषमता, अन्याय अत्याचाराला नकार, वेदना, क्रांती आणि आत्मभान या दृष्टिकोनात प्रकट होतात. माणसाचे ' माणूस ' म्हणून मूल्य जपणाऱ्या डॉ . बाबासाहेब



Scanned with CamScanner

आंबेडकरांचा विचार हा या साहित्याचा गाभा आहे . तसेच माणुसकीचा उद्घोष करणारे अनेक परिवर्तनवादी विचार या दृष्टिकोनाला जवळचे वाटतात, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता याचा पुरस्कार दलित जीवन विषयक दृष्टिकोनात अंतर्भूत आहेत. हाच दृष्टिकोन 'आठवणींचे पक्षी' आत्मकथनांचाही मूलाधार दिसून येतो .

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातही लेखकाच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे दर्शन घडते. माणूस, माणुसकी याचा वर्णव्यवस्थेत कसा बळी घेतला जातो .हेच 'आठवणींचे पक्षी' त सोनकांबळे सांगतात. पोटाच्या खळगीमुळे कोणताही धंदा करावा लागतो. याविषयी ते लिहितात, " कुठलाही धंदा हा कुण्या एका ठराविक माणसाचा नसतो . तो त्याला करावा लागतो त्याच्या गरजेमुळे . . . पोटाच्या खळगीमुळं . . . " ( पृ. ४ ) अस्पृश्यतेचा चिंतनाच्या पातळीवर उपहास करताना ते लिहिता , " काम मातीचे व माती कामाची कारणशेवटी माणूसही मातीच व मातीच माणूस व माणसापेक्षा श्रेष्ठ कारण मातीच जगवतेना साऱ्या प्राण्यांना , माणसांना आपले सारे कष्ट उपसून व स्वत : झिजून म्हणूनच ती काळी माती व तिच्या धनावर पोसले जाणारे आम्ही सारे तिचेच धन आरंभापासून ते शेवटपर्यं " ( पृ. ६१ ) असे असूनही कष्ट करणाऱ्याची कदर करायची नाह . . विचार करणाऱ्याला नक्कीच येणार कीव की काय वागतो हा माणूस शेवटी माणसाशीच म्हणू " (पृ. ६१) असा मानवतावादी विचार ते मांडतात. नवशिक्षण पद्धतीच्या नावाखाली वास्तवता डावलली जाते. जुन्यालाच नव पाणी दिलं जातं. नंतर ते ओरिजिनल ' कलर धारण करतं. "सद्या परिस्थितीत तर जिकडं तिकडं ' रॉक ॲण्ड रोल ' च चाललेला आहे नि हे पाहून विचार असणाऱ्याला व करणाऱ्याला खंत वाटल्याशिवाय राहणार नाही." ( पृ. १३७) असे लेखकांना वाटते. जीवनाविषयी विचार व्यक्त करताना ते लिहितात. "जीवन हा शब्द जिवाशी अत्यंत निकडीचा आहे. जिथं जीवन तिथं जीव आलाच नि जिथं जीव तिथं जीवन आलंच. जीवन म्हटले की जिवाचे वन मग ते कुणाला सुंदर तर कुणाला खडतर दिसते . . . जीवन या शब्दाचा अर्थ जगण्याशी व जीवन जगण्याशी लई करून निगडित असतो. नि त्यासाठी माणसाला जीवन जीवाणूला सारखी धडपड नि जिवाचे रान करावे लागते. जीवनाचा वेगवेगळ्या पातळीवर अर्थ लावतात. डॉ . आंबेडकरांच्या वैचारिक विचारांचा लेखावर परिणाम झालेला दिसतो. तसेच महात्मा फुले यांच्या वैचारिक विचारांचे प्रतिबिंब दिसते. " मानवमुक्तीला फुल्यांचे कार्य उपकारक झाले आहे. जात कोणतीही असली तरी आज ना उद्या सर्व मातीखालीच जातील. कोणी उच्च वा नीच नाही ." ( पृ. १२०) हा समतेचा विचार लेखक मांडतात. लातूरला आल्यावर बाबासाहेब त्यांना माहीत झाले व त्यांच्या कार्याविषयी जवळीक निर्माण होते. (पृ. १५७), १९३५ ची डॉ . बाबासाहेबांनी केलेली धर्मांतराची घोषणा (पृ. १७०) असे आंबेडकरांच्या विचारांचेप्रतिबिंब ठिकठिकाणी उमटलेले आहे. अर्थात जीवनवादी मूल्यांचाच पाठपुरावा हे आत्मकथन करते.

**8. 'आठवणींचे पक्षी' मधील निवेदन, भाषा आणि बोलीचे वैभव:**

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचे निवेदन प्रारंभी ग्रामीण - महारी बोलीत आलेले आहे लेखकाचे वय जसजसे वाढत गेले आहे व ग्रामीण भागांकडून शहरी भागांकडे झालेला लेखकाचा झालेला प्रवास त्यामुळे आत्मकथनाच्या उत्तरार्धाचे निवेदन काहीसे ग्रांथिक मराठीत आले आहे. आत्मकथनाच्या संदर्भात लेखक लिहितात, "आठवणींचे पक्षी' यात मी जीवनात आलेले लहानपणाचे अत्यंत भयानक व खडतर असे अनुभव नागडे उघडे चितारले आहेत. त्यात हातचे काही राखून ठेवलेले नाही."[10] अशी प्रांजळता आणि सहजता या निवेदनात आहे. "त्यांच्या निवेदनात एक लय, लकब आहे. जी प्रादेशिकतेची उमेदवारी करतेच. त्याचबरोबर कथन करणाऱ्याचा त्या काळातील भोळेपणा, वेंधळेपणा, निरागसपणा दाखविते. त्यांच्या कथनशैलीने त्या काळाचे त्या त्या स्थळाचे वास्तव स्पष्ट चित्र डोळ्यासमोर उभे राहते."[11] निवेदनाची गोष्टीवेल्हाळ पद्धत लक्षणीय आहे. या निवेदनात कोठेही आक्रस्ताळेपणा अभिनिवेश नाही. या निवेदन शैलीचे महत्त्व विशद करताना डॉ .प्रल्हाद जी. लुलेकर लिहितात, "आठवणींचे पक्षी हे आत्मकथन मोलाचे ठरण्याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी निवेदनशैली हे एक कारण आहे. लेखक आपल्या आठवणी अत्यंत निरागसपणे , अत्यंत ओघवत्या शैलीने सांगतात . त्यांची गोष्टीवेल्हाळ पद्धत रसिकाला भुरळ पाडणारी आहे. या शैलीमुळे या आत्मकथनाला विलक्षण प्रत्ययकारकता आली आहे. आत्मकथनाचाएक आकृतिबंधच यामुळे निर्मिला गेला आहे."[12] निवेदनाची लोककथात्मक पद्ध, तसेच तमाशा या



Scanned with CamScanner

लोककलेतील वगनाट्याची निवेदन पद्धती, त्यातील लयबद्धता, सहजता, प्रांजळता यामुळे 'आठवणींचे पक्षी ' ला एक वेगळे वाङमयीन परिमाण लाभले आहे .

'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथन विशेष स्मरणात राहते, ते त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीमुळे. आकर्षक, नावीन्यपूर्ण भाषाशैलीमुळे ते वाचकांच्या अंत:करणाचा ठाव घेते. अनुभवांतला प्रामाणिकपणा आणि सहजता आणि त्यासाठी वापरलेली खास उदगीर भागातील महारी बोलीमुळे या आत्मकथनांतील आठवणींना एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झालेले आहे. आत्मकथनाच्या प्रारंभी येणारी बोली शेवटी शेवटी प्रमाणभाषेकडे झुकताना दिसते उदा. " सांगायचं म्हणजे असं की मी न्हनग्यापणीच मायबाप गेल्यामुळे मोठ्या बहिणीकडे तिने आणले म्हणून रहात असे ....तिला मला पाहिल्यावर खूप वाईट वाटलं पण ती माझ्यावरचं तू पुस्तक का दिलास ' म्हणून तुटून पडली व म्हणाली, " निस्पुरी भाड्या मायबाप गिळला आता मला गिळाय बसलाय' (पृ. २१ ). " असे किती तरी प्रसंग नि किती तरी अशा आठवणी ज्यांनी माझ्या जीवनाला खरारस आणून दिला ते कदापि विसरणे शक्य नाही ." (पृ. १७६ ) अर्थात हा भाषिक बदल वयपरत्वे बदलणे स्वाभाविक आहे. बालपणापासून प्रौढत्वाकडे, तसेच ग्रामीण भागातून शहरी भागाकडे झालेला लेखकाचा प्रवास भाषिक बदलास कारणीभूत झालेला आहे. त्यामुळे "तिच्यातील भाबडे उद्गार कमी होऊन गंभीर होत गेलेली दिसते."[13] हे म्हणणे योग्य वाटते .घटना प्रसंगात जिवतपणा आणि प्रत्ययकारकता दिसून येते. उदा .गंगाबाईच्या वतलातले कुत्रे चतकोर भाकरीसाठी ओढण्याचा प्रसंग (पृ. ६२, ६३), वा कुत्र्याच्या तोंडून भाकरी सोडवताना स्वत : ची शिकार होण्याचा प्रसंग (पृ. ९२ ते ९४) इ. तसेच लेखक आपला अनुभव छोट्या छोट्या वाक्यांतून मांडतो. त्यात विरामचिन्हाचा वापर सहसा केलेला आढळत नाही. वाक्यरचना छोटी असल्यामुळे स्वाभाविक लय निर्माण होते. त्यामुळे याभाषेची तुलना लोकसाहित्याच्या भाषेशी विशेषत: लोककथेशी करता येण्याजोगी आहे. तसेच ही भाषा लीळाचरित्रातल्या भाषेचीही आठवण करून देते. अशी शैली वाचकाचे लक्ष वेधते. उदा."तसं म्हणे मुरदाड मी खात नव्हतो. कदीमदी हलाल मिळालं तर खात व्हतो ....अस व्हता व्हता थोडे दिवस गेल्यावर लागलो बर्हीण बोलायला." (पृ. २६ ) "एकदा लागला व्हता भीमराव बापूचा थळ मग मी लईच हौशीत व्हतो." " एकदा काय यालं तर दिलो चेर सोडून आलो जगलपूरला, दाजीनं दुकान करून देण्याचं ठरविलं. " ( पृ. ३३ ) यांसदर्भात डॉ .मा. का. कागणे लिहितात, " छोटी छोटी आशयघन वाक्ये, त्याची परिणामकारकता. अनलंकत साधी भाषा आणि वेधक कथनशैली ही लीळाचरित्राच्या भाषेची आठवण करून देणारी आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रभाव असलेली बोलीभाषा अस्पृश्यांच्या जीवनाशी निगडित आहे."[14] या म्हणण्यात बरेचसे तथ्य आहे . बालसुलभवृत्ती असलेल्या शैलीत एक प्रकारची पारदर्शकता आहे. उदा. हुरडा खायचा आग्रह धरतात. त्याविषयी ते लिहितात, "जरा का तेयनी लई खा खा म्हणून आळूलकी केली की खायाचो वगळागळा पाणी पियाचो. तर व्हायचं दुसरच. दाणे जे फुगाचे ते पोट घळघळ तर कधी घर घर करायचे. व टोचल्यावानी करायचं व लगेच भरारी लागायची. मग वाटायचं उगच खाले ईच्या मायला." (पृ. ३२) दलित जीवनातील सूक्ष्म बारकावे दर्शविणारे काही महारी बोलीतील शब्दही आले आहेत. उदा. 'निस्पुरी' , 'डापरलं ' , ' मुरदाड' 'हलाल' , 'हरीपी' , 'वगार' , 'सागुती ' , ब्याद' , 'चारटफिरट ' , ' जनावर ' , ' वाबांळ ' , ' पुराडी ' , ' डल्या ' , इत्यादी. भाषेत उस्मानाबाद - उदगीर या भागातील प्रादेशिक बोली भाषेचेही शब्द आलेले आहेत. उदा. 'गुत्ते ' , 'टाकळी' किंवा निळवा' किंवा 'बडी' , ' दुदगा ' , ' व्हळ ' (नाला ) , ' बेंदाड ' , ' अपरूक ' , ' खविस ' , ' बिदवा ' , ' येली ' ( ब्याळणे ) , ' हळजावं ' , ' चेंगट ' , ' वटरू पिटरू ' , ' परदिसा ' , ' लई ' , ' वंजळ ', ' चेलमा ' , ' धमदिशा ' , ' चिकूल ' , ' निवद ' , ' पोगाळून ' , ' घुकड पुकर्ड ' , ' कुपाटी ' , हिबाळला ' इ . या प्रादेशिक भाषेविषयी दया पवार लिहितात , " सोनकांबळे'यांच्या भाषेला मराठवाड्याच्या गावठी मातीचा स्पर्श झालेला आहे .ती भरजरी दिपवणारी नाही .पण अंत : करणाचा ठाव घेणारी आहे."[15] या प्रादेशिक बोलीमुळे एक वेगळेच परिमाण 'आठवणींचे पक्षी' लालाभले आहे. श्री. सोनकांबळे यांच्या भाषेवर उर्दूभाषेचाही परिणाम झालेला आहे. उदा. ' हुन्नेरी ' , ' फरार ' , ' हवस ' , ' रोट्या ' , ' बोटी ' , 'बेकार ' , ' हमेशा ' , ' तयकत्व ' , ' कुडता ' , ' सगीर ' , ' खानाखराब ' , ' कदर ' , ' लोटा ' , ' बेकाम ' , ' लेबास ' , ' शरीक ' इ . प्रस्तुत आत्मकथनात ' चुंबीत बसलो ' (पृ. ६५, 72,143 ) वाक्प्रयोग बऱ्याचदा येताना दिसतो . शब्दकोशात



Scanned with CamScanner

याचा अर्थ आह. ' नाइलाज होऊन ' किंवा ' झक मारीत करणे आपल्या वाट्याल्या आलेल्या प्रसंगाची अपरिहार्यता जेव्हा टाळता येत नाही. वास्तवतेला सामोरे जाताना हा शब्दप्रयोग लेखक वापरताना दिसतो.

'आठवणींचे पक्षी' तील शिव्यांमधून दलित मानसिकतेचे दर्शन घडते. उदा .' निसुरी ' , ' भाड्या ' , ' मायबाप गिळला , आता मला गिळाय बसलाय ' ( पृ . २१ ) , ' आर फुकटच्या तुझं जा करत करता येत भाड्यानं गोसायनं ' ( पृ . ६८ ) इ .' भाड्या ' ही शिवी जास्त प्रमाणात वापरली जाताना दिसते. यातून दलितांच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडते.

वाक्प्रचार, म्हणी, अलंकारिक वाक्यरचना व प्रतिमा यांचे एक वेगळेच सौंदर्य 'आठवणींचे पक्षी'ला लाभले आहे. 'आठवणींचे पक्षी' ची भाषाशैली लक्षणीय आहे. "सुटसुटीत व छोटे छोटे वाक्य, म्हणी, वाक्प्रचार, नादानुकारी शब्द आदींनी ही शैली नटलेली आहे. ही भाषा केवळ लेखकाची नसून याच्या प्रदेशाचीही ती भाषा आहे. साधी सोपी अन् सरळ शब्दांनी नटलेली त्यांची भाषा मराठी सारस्वताचं लेणं ठरावी अशी आहे."[16] प्रस्तुत शैली लक्षवेधी होण्याचे एक कारण म्हणजे त्यांनी केलेला अनन्य साधारण रूपिमांचा लक्षणीय उपयोग . उदा. ' कसार बिसार आली की तोंड वंगळ पडतंय' (पृ २८ ) 'जर कोणी कुणब्या-पिणळ्यांनी फायल तर उगीच बला येईल' (पृ. ९), 'असाच कसा बसा झालो मॅट्रिक पास' पृ. १०९), 'कपटापि फाटाची' (पृ. १०) इ. असे असले तरी प्रस्तुत आत्मकथनाच्या वाङ्मयीन गुणवत्तेत बाद आणणाऱ्या काही गोष्टी नमूद करता येतील. प्रसंग, घटनांची, वाक्यांची होणारी पुनरावृत्ती या आत्मकथनेत ठळकपणे दिसते.. "सोनकांबळे अस्पृश्य जीवनाचा अनुभव आपल्या बोलीभाषेत मोठ्या धिटाईने व मोकळेपणाने ' आठवणींचे पक्षी ' मध्ये सांगतात."[17] दया पवारांनाही " ....त्यांनी आपल्या लिखाणाचे माध्यम महारी भाषा ' निवडली आहे .......त्यांची भाषा सरळ काळजाचा ठाव घेते."[18] असे म्हटले आहे . दुसरे असे की , सगळ्याच आठवणी महारी बोलीत आल्या असत्या तर लेखकांचा बालपणापासून प्रौढत्वाकडे , ग्रामीण भागाकडून - शहरी भागाकडे झालेला प्रवास फारसा परिणामकारक झाला नसता. त्यामुळे वय, सभोवतालचे वातावरणानुसार महारी बोलीकडून प्रमाणभाषेकडे झालेला प्रवासात एक प्रकारची स्वाभाविकलय लेखकाने साधलेली आहेअसे म्हणता येईल. आत्मकथनाच्या कलात्मकतेसंबंधी डॉ. सदा कऱ्हाडे लिहितात, ' आठवणींचे पक्षी ' या दलित साहित्यकृतीत हा तटस्थपणा अलिप्तपणा निश्चितच जाणवतो. याही संदर्भात ही कलाकृता सांकेतिकतेतून मुक्त झाली आहे असे म्हणता येईल. या पुस्तकातील अनुभवांविषयाचा आवाका सीमित असला तरी दलित साहित्यातील गद्यलेखनाच्या कलात्मक प्रवत्तीचा प्रारंभ या कलाकृतीत जाणवतो असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाह."[19] तर श्री. बाबूराव बागुल लिहितात, " प्र .ई. यांचा पहिला लेख प्रकाशित झाला आणि अनेकांना वाटू लागले, मला तरी वाटते मराठी साहित्याला जीवनाभिमुख करणारा स्वदेशी करणारा युग समान करणारा असा समर्थ लेखक उदयाला आला."[20] एकूणच ग्रामीण - महारी बोली भाषा, निवेदनातली सहजता, निवेदकाचा तटस्थ, अलिप्तपणा, संयम, प्रामाणिकपणा, कुठेही प्रसंग भडक रंग देऊन नाट्यनिर्मिती व कलात्मक कृत्रिमतेपासून असलेली अलिप्तता, कुठेही भाष्य न करणे यामुळे या आठवणी पक्ष्यांसारख्या भरधावपणे वाचकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतात. हेच या साहित्यकृतीचे सामर्थ्य म्हणता येईल.

**9. समारोप:**

1. 'आठवणींचे पक्षी' दलित आणि एकूणच मराठी साहित्यातील मैलाचा दगड ठरला आहे. आत्मकथनाला लाभलेल्या साहित्यिक मूल्यामुळे त्यातील जीवनानुभव सामान्यपासून ते तत्त्वशोधन करणाऱ्यांपर्यंत सर्वांना अंतर्मुख करणारा आहे.

2. मराठी आणि दलित साहित्यात सामाजिक उपेक्षा व अस्पृश्यता सांगणारे आजवर अनेक आत्मचरित्र व आत्मकथने निर्माण झाली मात्र 'आठवणींचे पक्षी' दिशा वेगळी ठरली. समाजात जीवन जगताना आलेला अनुभवाचा विखार, समाजातील क्रूरता, खोटारडेपणा दांभिकता आणि सत्य उघडपणे मांडण्याची ताकद त्यात आहे.

3. आपल्याला आलेल्या अनुभवाचे भांडवल न करता थेट आणि सहजपणे आपला अनुभव मांडत गेले. तेही आपल्या मराठवाड्यातील उदगीर परिसरातील, सहजतेमुळे बोली भाषेचे सौंदर्य त्यात खुललेले दिसते. आपल्या बोलीभाषेत दुःखाचे झाड



Scanned with CamScanner

गदगदून हलवून सोडावे तशी आपली दाहक वेदना शांतपणे लेखक सांगतात. डॉ. आनंद यादव आपल्या एका मुलाखतीत म्हणतात, 'आठवणींचे पक्षी' सारखे सोनकांबळे यांचे साहित्य मला तर खास ग्रामीण साहित्यात वाटतं. कारण सोनकांबळे आपण अनुभवलेल्या जीवनाला कोणत्याही एका सामाजिकतेच्या भडक सुरांचा रंग न देता समग्रपणे सामोरे गेले आहेत. त्यामुळे त्या पुस्तकाचे साहित्यिक मूल्ये वाढलेले आहे. म्हणून समीक्षकांना एक सामर्थ्यशाली साहित्यकृती म्हणून 'आठवणींच्या पक्षी'ची नोंद करण्यास भाग पाडले.

4. एका दलिताच्या असह्य, दुःखी जीवनाचे चित्र संयमित, संवेदनशील, सोशिक, निर्मळ, प्रामाणिक आणि चिंतनशील व्यक्तिरेखेच्या माध्यमातून 'आठवणींचे पक्षी' काळजाचा ठाव घेतात. त्यामुळे हे एक यशश्वी आत्मकथन ठरले आहे.

**10. संदर्भ:**


1. सोनकांबळे प्र. ई., *'आठवणींचे पक्षी'*, तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने, चेतना प्रकाशन, औरंगाबाद, तृ. आ. १९८2, पृ. क्र. दिलेला नाही.
2. डॉ. भालचंद्र फडके, *अस्मितादर्श*, औरंगाबाद, १९७६, पृ. ८५
3. डॉ. वासुदेव मुलाटे, *'दलित आत्मकथन: संकल्पना व स्वरूप*, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९ पृ. ९३
4. डॉ. मनोहर जाधव, *'दलित स्त्रियांची आत्मकथने: स्वरूप आणि चिकित्सा'*, सुविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००१, पृ. ११०
5. डॉ. वासुदेव मुलाटे, *'दलित आत्मकथन: संकल्पना व स्वरूप*, उ. नि., पृ. 53
6. डॉ. भालचंद्र फडके, *अस्मितादर्श*, औरंगाबाद, 'दलितांची आत्मकथने: काही प्रश्न' हा लेख, दिवाळी अंक1983, पृ. क्र. ८8
7. श्री. बाबुराव बागुल, *'आठवणींचे पक्षी'*, प्रस्तावना, चेतना प्रकाशन, औरंगाबाद, तृ. आ. १९८2, पृ.16
8. श्री. शंकरराव खरात, *'दलित वाङ्मय: प्रेरणा आणि प्रवृत्ती'* इनामदार बंधू प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९७८ पृ. 1198
9. डॉ. वासुदेव मुलाटे, *'दलित आत्मकथन: संकल्पना व स्वरूप*, उ. नि., पृ. 1३
10. सोनकांबळे प्र. ई., *'आठवणींचे पक्षी'*, मनोगत, उ. नि., पृ. 8
11. वामन निंबाळकर, 'दलित साहित्य: स्वरूप आणि भूमिका', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, प्र. आ. 1986, पृ.108
12. डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर , 'वेदनांच्या प्रदेशात', कैलास पुब्लिकेशन, औरंगाबाद, प्र. आ. २०००, पृ. ९८, ९९
13. डॉ. वासुदेव मुलाटे, *'दलित आत्मकथन: संकल्पना व स्वरूप*, उ. नि., पृ. 94
14. डॉ .मा. का. कागणे, *अस्मितादर्श*, उ. नि., पृ. 75
15. दया पवार, केसरी, रविवार, दि. १५ फेब्रुवारी १९७९, पृ. 10
16. प्रा. कमलाकर कांबळे, *'दलित साहित्य: शोध आणि आस्वाद'*, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्र. आ. १९८५, पृ. २४-२५
17. श्री. शंकरराव खरात, *'आठवणींचे पक्षी'*, उ. नि., मलपृष्टवरील अभिप्राय.
18. दया पवार, *'प्रातिष्ठान'*, औरंगाबाद, जुलै १९६९
19. डॉ. सदा कऱ्हाडे, *दलित साहित्याच्या निमित्ताने*, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८२, पृ.७४
20. श्री. बाबुराव बागुल, दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान', बुध्दिष्ट प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९८१, पृ. १५९


❑❑❑



Scanned with CamScanner

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

# शाश्वत विकास ध्येये, जागतिकीकरण आणि आदिवासींच्या समस्या व उपाय

**प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ**
*म. शि. प्र. मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, जि. बीड महाराष्ट्र ४३११२४*
Email: drszshirsath@gmail.com

***Abstract* (गोषवारा )**
पृथ्वीवर उपलब्ध असलेली नैसर्गिक साधन संपत्ती निसर्गाने समान पध्दतीने ठेवलेली नाही. त्यामुळे पृथ्वीवरील काही भागात सुजलाम सुफलाम, तर काही भाग नैसर्गिक अडचणींनी ग्रस्त आहे. म्हणून संयुक्त राष्ट्र संघासारखा आंतराष्ट्रीय संस्थेने कल्याणकारी जगासाठी १७ शाश्वत विकास ध्येयांचा अजेंडा तयार करुन २०३० पर्यंत तो पूर्ण करण्याचे ठरले. जवळपास जगातील १९३ देशांनी शाश्वत विकास ध्येये स्वीकारली. जगातील इतर देशाप्रमाणे शाश्वत विकासाच्या ध्येयांची पूर्तता करण्यासाठी ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञान युक्त भूमिका भारतानेही स्वीकारली. जागतिकीकरणाचा परिणाम इतर आदिवासींप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासी जमातींवरही जागतिकीकरणाचा परिणाम झाला. त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या त्यांचा जीवनात निर्माण झाल्या आहेत. शासकीय धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास अनेक समस्यांचे निराकरण आपोआपच होईल.

**Keywords:** शाश्वत, जागतिकीकरण, आदिवासी, समस्या, उपाय

### १. प्रास्ताविक :

जगातील सर्वच कानाकोपऱ्यात कमी अधिक प्रमाणत आदिवासी समूदाय पहावयास मिळतात. सर्वसाधारापणे हे समूदाय घनदाट जंगल, डोंगर-दऱ्या, अतिदुर्गम प्रदेश, डोंगराळ प्रदेश, बेट आणि नदीच्या खोऱ्यात वास्तव्य करतांना आढळतात. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून ते अलिप्त असल्याचे दिसते. भारतीय समाजात देखील आदिवासी समूदाय देशाच्या चारही बाजूनी विखूरल्याचे आढळते. भारतात या आदिम लोकांना विविध नावांनी संबोधले जाते. जसे की जंगलात राहणारे म्हून 'जंगलराजे', प्रगत समाजाच्या तूलनेत मागासलेले असल्याने 'रानटी', तर पर्वतीय प्रदेशात राहणारे म्हणून 'गिरीजन'. अशा नानाविध नावाने ओळखले जात . आदिम समाजाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनी देखील वेगवेगळ्या उपाधींचा आधार घेऊन आदिवासींना संबोधले आहे. उदाहरणार्थ मार्टन, लॅस्सी, रिस्ले, एल्वीन, शुबर्ग, टॅलेंट, ठक्कर इत्यादींनी आदिमांना 'अतिप्राचीन' (Aboriginal) किंवा 'मुळचे रहिवासी' (Aborigines) म्हटले आहे. डॉ. धुर्ये यांनी तथाकथीत मूळचे रहिवासी (Socalled Aborigines) आणि मागासलेले हिंदू (Backward Hindus) असे म्हटले आहे, तर डॉ. हटन आदिम किंवा आदिवासी (Primitive Tribes) म्हणून उल्लेख करतात. भारतीय संविधानानुसार आदिवासींना अनुसूचित जमात (Scheduled Tribes) म्हटले आहे. जे डॉ. धुर्येना मान्य आहे. डॉ. दासांनी या लोकांचे वर्णन 'बुडत असलेली जमात' (Submerged Humanity) असे केलेले आहे. सामाजिक मानव शास्त्रज्ञांनी आदिम समुदयाचा वैज्ञानिकदृष्ट्या समग्र अभ्यास करून आदिम लोकांविषयी असलेले गैरसमज, भ्रम दूर करयाचा आटोकाट प्रयत्न केला आहे.

श्वाश्वत विकासाची ध्येये साध्य करताना जागतिकीकरण्याच्या तडाख्यातून जगातील सर्वच देशांना जावे लागत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील आदिवासींच्या जीवनात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

### २. श्वाश्वत विकास ध्येये म्हणजे काय ?

जगात नैसर्गिक साधन संपत्तीची उपलग्ब्धता असमान दिसून येते. तसेच देश, काल, प्रदेशपरत्वे आपल्याला विविधता दिसून येते. काही देश अतिश्रीमंत तर काही देशातील नागरिकांना एकवेळ जेवनाची भ्रांत अशी परिस्थिती आहे. म्हणून जगातील यूनोसारख्या संस्थेने सर्व जगाचा श्वाश्वत विकासाचा आराखडा तयार केला. तेच श्वाश्वत विकास ध्येये (S.D.G.) होत. या आंतरराष्ट्रीय भविष्यकालिन सहस्त्र (Million) विकासाची ध्येयांना(MDGs) साध्य करण्यासाठी सन २०१५ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. पुढे युनोमध्ये

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

असणाऱ्या १९३ सहभागी देशांनी श्वाश्वत विकास अजेंडा तयार करुन स्वीकारला. जून २०१२ मध्ये झालेल्या Rio+२० परिषदेनंतर जुलै २०१४ मध्ये १७ कलमी SDGs निर्मिती करण्यात आली, तेच श्वाश्वत विकास ध्येये होत. त्यानंतर २५ सप्टेंबर २०१५ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या श्वाश्वत विकास परिषदेनंतर जगातील जवळपास १९३ देशांनी श्वाश्वत विकास करण्यासाठी सन २०३० पर्यंत १७ श्वाश्वत विकास ध्येये स्वीकारली आहेत. ती खालील प्रमाणे -

०१. दारिद्र्य निर्मूलन
०२. भूक निर्मूलन
०३. चांगले आरोग्य
०४. दर्जेदार शिक्षण
०५. लैंगिक समानता
०६. शुध्द पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता
०७. नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त उर्जा
०८. चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र
०९. नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा
१०. असमानता कमी करणे
११. शाश्वत शहरे आणि समाज
१२. उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर
१३. हवामानाचा परिणाम
१४. शाश्वत महासागर
१५. जमिनीचा शाश्वत उपयोग
१६. शांतता आणि न्याय
१७. शाश्वत विकासासाठी भागीदारी

वरीलप्रमाणे शाश्वत विकासाची ध्येये असून सन २०३० पर्यंत जगातील सर्वसामान्य व्यक्तीसुध्दा कोणत्याही जीवनावश्यक गोष्टींपासून वंचित राहू नये, ही संयुक्त राष्ट्रसंघाची यामागील व्यापक भूमिका आहे.

शाश्वत विकासाची **व्याख्या** करण्याचाही प्रयत्न काही विचारवंतांनी केलेला आहे. त्यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**२.१. संयुक्त राष्ट्रसंघा**च्या Global Commission for the Environment and Development या विभागाने Equal Future या नावाने एक अहवाल प्रसिध्द केला. जो ब्रून्टलंड अहवाल म्हणून देखील प्रसिध्द आहे. या अहवालात दिलेली शाश्वत विकासाची व्याख्या सर्वाधिक मान्यताप्राप्त आहे. या अहवालानूसार " शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करतांना आपल्या पुढील पिढ्यांच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न येऊ देता साध्य केलेला विकास होय."[१]

**२.२. दीपक घैसास** यांच्यामते, " शाश्वत विकास म्हणजे समाजाच्या आजच्या गरजा पूर्ण करीत असतांना भविष्यातील पिढ्यांना त्याची किंमत मोजायला लागणार नाही असा विकास." पुढे ते लिहीतात, "शाश्वत विकास म्हणजे पृथ्वीवरील संसाधनांचा उपयोग करुन आपला विकास करतांना पुढील पिढ्यांच्या विकासासाठी संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे होय."[२]


उपरोक्त दोन्ही व्याख्या करुन शाश्वत विकासाच्या ध्येयाचे स्वरुप स्पष्ट होते. भारताच्या संदर्भात धर्म, जाती, पंथ, प्रदेश, लिंग व व्यवसाय इत्यादींबाबत भिन्नता आहे. गरीब-श्रीमंत ही सर्वात मोठी दरी दिसून येते. मानवाने आपल्या तंत्र-विज्ञानाच्या जोरावर निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे, नव्हे त्यात त्याला बऱ्यापैकी यशही मिळाले आहे. तसेच खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण इत्यादींच्या धोरणांमुळे नैसर्गिक व मानवनिर्मित साधनसंपत्तीत आमूलाग्र बदल होत आहेत.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

**३. आदिवासी जमातींच्या समस्या:**

भारतात अश्मयुगापासून आदिवासी जमातींचे वास्तव्य आढळून येते. डोंगरदऱ्या, नद्या, खोरे अशा निसर्गाच्या सानिध्यात या जमातींचे वास्तव्य असते. भारतात जवळपास ३५० आदिवासी जमाती आढळून येतात, तर महाराष्ट्रात महाराष्ट्र शासनाने ४७ आदिवासी जमाती अधिकृतरित्या जाहीर केलेल्या आहेत. यात प्रामुख्याने वारली, कातकरी, ठाकर, कोळी महादेव, कोकणा, टोकरे कोळी, कोळी मल्हार, भिल्ल, गोंड, केलाम, आंध, कोरकू या प्रमुख आदिवासी जमाती असून त्यांचे वास्तव्य प्रामुख्याने धुळे, जळगाव, ठाणे, मुंबई, कोकण, पुणे, अहमदनगर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ,औरंगाबाद, जालना, सोलापूर इत्यादी जिल्ह्यात सह्याद्री, सातपूडा, बालाघाट, मेळघाट आदी डोंगर रांगांमध्ये आढळून येतात.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भिल्ल, गोंड, कोळी महादेव, वारली, ठाकूर, कोकणा व गोंड यांची लोकसंख्या महाराष्ट्रात अधिक प्रमाणात आढळून येते. महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ८.८७ टक्के एवढी लोकसंख्या आदिवासी जमातींची होती. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ५.१ टक्के आदिवासी जमातींची लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. खालील नकाशात सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे.




आज वाढत्या औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे उपासमार, भूकबळी, प्रदूषण, मृदा व पाण्याचा भरमसाठ वापर, वाढत्या नागरिकीकरणामुळे होणारी वृक्षतोड, जंगलाचा ऱ्हास, इंधनाचा अनियंत्रित वापर अशा अनेक कारणांमुळे शाश्वत विकासाला खीळ बसत आहे. म्हणून आजच्या पिढीने भविष्यातील पुढच्या पिढीचा विचार करुन वापर करणे महत्वाचे आहे. त्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम व त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी शासन राज्यकर्त्यांबरोबरच समाजाचीही आहे.

महाराष्ट्राच्या संदर्भातील आदिवासी जमातींचा शाश्वत विकासध्येये साध्य करताना अनेक समस्या आढळून येतात. संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या १७ शाश्वत विकास ध्येयांपैकी प्रामुख्याने दारिद्र्य, भूक, आरोग्य शिक्षण, लैंगिक समानता, जमीन व न्याय ही शाश्वत विकासध्येये थेट आदिवासींच्या समस्यांवरच आधारित आहेत की काय असे वाटते. म्हणून आदिवासींच्या समस्यांचा वेध घेणे महत्वाचे ठरेल.

**३.१. दारिद्र्यः**

महाराष्ट्रातील बहुसंख्य आदिवासी जमाती दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात. दारिद्र्य रेषेची संकल्पना वेगवेगळ्या पद्धतींनी मांडली गेलेली असली तरी जागतिक बँकेने दारिद्र्य रेषेच्या व्याख्येनुसार, शहरी भागात दर मानशी आणि दरमहा १४१० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात. या व्याख्येच्या आधारे आदिवासी जमातींच्या दारिद्र्याचा विचार केला तर अजून जवळपास ६५ - ७० टक्के आदिवासी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतांना दिसून येतात. आदिवासींचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आणि माध्यम म्हणजे जंगल होय. जंगलातील कंदमुळे, लाकूडफाटा, गवताचे भारे इ. प्रामुख्याने त्यांचे जीवन आधारित आहे. शासनाने जंगलबंदी केल्यामुळे आदिवासींच्या जीवनावर कुऱ्हाड मारल्यासारखे झाले आहे. शेतात व अन्य ठिकाणी मजूरी करणे हा एकच पर्याय त्यांच्यासमोर असतो. वाढत्या विकासाबरोबरच वाढत्या महागाईने त्यांच्या दारिद्र्यात भरच टाकलेली दिसून येते. त्यामुळे त्यांच्या मूळ गरजाही पूर्ण करता येत नाहीत. "Absolute Poverty is the complete lack of means necessary to meet basic personal needs, such as, Food, clothing and shelter"[३]

महाराष्ट्रातील ७० टक्के †Ö×¤ü¾ÖÖÃÖß कुटुंबांकडे जमिनी नाहीत. दारिद्र्य ही एक मोठी समस्या या जमातीतीत आहे. त्यासाठी "सन १९७९-१९८१ च्या अनुसूचित जाती व जमाती आयोगाने दारिद्र्य निर्मूलनासाठी असे सूचविले आहे की, रोजगारीचा दर कमी आणि उपभोग खर्चाचा दर जास्त असल्यामुळे या जाती जमातींमध्ये दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. या समूहाचे दारिद्र्य निर्मूलन एकाच उद्दिष्टामुळे शक्य आहे, ते म्हणजे न्यायासह सामाजिक व आर्थिक विकास करणे होय."[४] मात्र हे तत्व अंमलात येईल तो सोनेरी दिवस उगवेल केव्हा?

**३.२. व्यसनाधीनता :**

व्यसनाधीनता ही महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये दिसून येणारी एक महत्वाची समस्या आहे. शारीरिक अंग मेहनतीची कामे आदिवासी करतात, ´ÆüÞÖæ®Ö ¿ÖÖ¸üß×¸üÛú £ÖÛúú¾ÖÖ Ûú´Öß ¾ÆüÖ¾ÖÖ ´ÆüÞÖæ®Ö आदिवासी मद्यपान करतात. विशेष म्हणजे या मद्यपान करण्यास धार्मिकतेची जोड मिळालेली आहे. हे आदिवासी देव आणि दैवभोळी, निसर्ग देवतेवर श्रद्धा असणारे आहेत. सण, उत्सव, जत्रा, विवाह, जन्म - मृत्यू, वीर, घटस्फोट, जमात पंचायत सभा यासारख्या अनेक प्रसंगी हे लोक मद्यपान करतात. मूल जन्मला आले की त्याच्या तोंडात पहिला थेंब दारुचा टाकला जातो. मृत्यू झाल्यावरही त्याच्या तोंडात दारुचाच थेंब टाकला जातो. देवाच्या विधीला वा नैवेद्यालाही दारु, तंबाखू वा विडी असते.या व्यसनामुळे कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण होत असतात. कारण दारुला या समाजात अनेक घटना-प्रसंगाच्या वेळेस प्राशन केली जाते. "आदिवासी समाजात सर्व धार्मिक, सामाजिक, आनंदाच्या, दु:खाच्या प्रसंगात दारुला फार महत्वाचे स्थान आहे. लग्न असो, मर्तिकविधी असो, सण असो किंवा गावाचा उरुस असो, महत्वाच्या माणसांना दारु पाजणे, झिंगून नाचत राहणे या गोष्टी सर्रास आहेत की, त्यामुळे आणि दारिद्र्याचे दु:ख विसरण्यासाठी, विरंगुळा म्हणून व्यसनाधीनता फार वाढलेली आहे."[५] हे सत्य डोळ्याआड करता येणार नाही.

दारुच्या या व्यसनामुळे या जमातीतील अनेक स्त्रियांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. दारुड्या नवऱ्याच्या दररोज नित्याच्या शिव्याशाप, मारझोड या गोष्टींना सामोरे जावे लागते. कधी कधी घर, असलेली जमीनही विक्री केली जाते. परिणामी दारिद्र्य, भूक, उपासमार अशा समस्यांना निर्माण होतात. मात्र ही व्यसनाधीनता ही रोजचीच बाब होऊन जाते. दारुचे प्रमाण वाढण्याला काही कारणेही आहेत, यासंदर्भात एस. आर. वाळिंबे लिहितात, "The habit of drinking liquor has social as well as religious significance. The drinks are served during dances, village meetings and casually."[६] याच सवयीचे पर्यावसान व्यसनाधीनतेत होते. परिणामी अनेक कुटुंबे या व्यसनामुळे उद्ध्वस्त झाली आहेत. त्यासाठी दारुबंदी, दारुचे दुष्परिणाम याविषयी शाळा, महाविद्यालयातून, सामाजिक प्रबोधन होणे गरजेचे आहे.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

आदिवासी जमातीत आदरातिथ्यासाठी चहा पाजण्याची प्रथा आहे. तसेच विडी, सिगरेट व तंबाखू खाणाऱ्यांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर आहे. या व्यसनामुळे अनेक प्रकारच्या शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते. या संदर्भात सिमिंग्टन म्हणतात, “They drink as a rece, there children are brought of to it, and no man and or woman can avoid the habit. They will drink if they can begor barrow the means to be it....... ....... In my opinion, therefore, prohibition if feasible, is required more in these area than is place where individual freedom of choice is at my rate possible and where racial damage is not obvious.”[७] सक्तीची धुम्रपान बंदी, जाणीव जागर करणे आवश्यक आहे. त्यावरच या जमातींचे भवितव्य अवलंबून आहे.

**३.३. आर्थिक समस्या :**

आदिवासीं जमातीला दैनंदिन जीवन जगताना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते.आदिवासींना आर्थिक समस्येप्रमाणे जीवनाशी निगडीत अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत. मोल मजूरी व उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने अनेक लोक गांवाकडून शहराकडे धाव घेत आहेत. त्यामुळे काही जमातींची गावे/ पाडे, वाडे व वाड्या ओस पडत आहेत. अशा गावांमध्ये फक्त म्हातारी मंडळी दिसते. या म्हाताऱ्या मंडळीचे आजारपण, उपासमार अशा अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. ज्या शहरांमध्ये या लोकांचे स्थलांतर होते तेथेही निवारा, पाणी, कुपोषण, गुप्तरोग, साथीचे रोग अशा विविध समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते.

रस्ता दुरुस्ती, कारखाने जंगली कामे अशा ठिकाणी गुत्तेदार / ठेकेदार हे या लोकांना कमी पैशाच्या मोबदल्यात गुलामासारखे राबवतात.त्यांचे **आर्थिक शोषण** करतात. मजुराचे आर्थिक शोषण ही एक मोठी आर्थिक समस्या निर्माण झालेली आहे. डॉ. गोविंद गारे आदिवासीच्या शोषणासंदर्भात लिहितात, "आदिवासींच्या दु:खाचे मूळ मुख्यतः आर्थिक शोषणात आहे ही पिळवणूक बिगर आदिवासी समाज, सावकार, धनिकाच्या स्वरुपाने, कोणी जंगल ठेकेदराच्या रुपाने, तर कोणी सेवेचे वृत्त घेऊन पुढारी बनून चालली आहे."[८] तसेच नवीनचंद्र जैन आदिवासींच्या पिळवणूकी संदर्भात म्हणतात, "महाराष्ट्रातील आदिवासी हा झोपडपट्टीत राहतो. त्याच्या उदरनिर्वाहाचे साधन हे जंगलातील लाकूड फाटा, शेतमजुरी, मासेमारी, शिकार करणे इत्यादी असले तरी मुख्यतः आदिवासींचे जीवन हे जंगल आणि जंगलावर अवलंबून आहे. सावकार आणि जमीनदार आदिवासींची पिळवणूक करतात."[९] या शोषणाची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत.यासाठी कठोर कायद्याची गरज आहे.

आदिवासींच्या समस्यांवर प्रकाश टाकताना डॉ. गोविंद गारे म्हणतात, "आदिवासी समाजात उत्पादन साधनासाठी लागणारा पैशा व कुशलता यांचा अभाव आहे. आदिवासी सरळ स्वभावाचे असल्यामुळे इतर पुढारलेल्या समाजातील लोकांशी ते स्पर्धा करु शकत नाहीत. जमीनदार, सावकार, व्यापारी पुढारलेल्या वर्गातील शेतकरी, बागायातदार शेतकरी यांनी आदिवासींची पिळवणूक केल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. आदिवासींच्या चांगल्या सुपीक जमीनी काढून घेऊन त्यांना डोंगर कपारत लोटण्याचे काम शतकानुशतके आहे. डोंगर कपारीतील उंच, सखल, नापिक जमिनी त्यांच्या वाट्याला आल्या आहेत. त्यामुळे निसर्गाच्या अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत आहे. अधिक अंग मेहनत करुनही वर्षभर लागणारे अन्न ते मिळवू शकत नाहीत."[१०] म्हणूनच सिमिंग्टन डी. या ब्रिटीश प्रशासकीय अधिकाऱ्याने ठाणे, नाशिक व पश्चिम खानदेशातील आदिवासीच्या जीवनाची पाहणी केली. सावकार, जमीनदार यांनी आदिवासींचे केलेले शोषण, आदिवसींची हलाखींची आर्थिक परिस्थितीबाबत सिमिंग्टन यांनी महत्वाच्या **शिफारशी** सुचविलेल्या आहेत. ते लिहितात, "...आदिवासींच्या प्रश्नांचा पूर्णतया नव्याने विचार केला पाहिजे व सुधारणेचे घोंगडे काल प्रवाहात भिजत ठेवण्यापेक्षा सरकारने आता अशी पावले उचलली पाहिजेत की, आदिवासींची शोषकांच्या कचाट्यातून पुरती सुटका होऊ शकेल. यासाठी सर्वात प्रथम आदिवासींना शिक्षणाचा मार्ग दाखविला पाहिजे, म्हणजे ते या समाजाचा एक हुशार व उपयुक्त नागरिक होईल."[११] महात्मा फुले यांनी यांनी 'विद्ये विना मती, गेली, मती विना गती गेली. . ...' यातून शिक्षणाचे जे महत्व सांगितले त्यावरच सिमिंग्टन यांनी जोर दिलेला आहे. सिमिंग्टन यांचे विचार खूपच महत्वाचे होते. तत्कालीन ब्रिटीश शासनाने काही शिक्षणविषयक सूचना अंमलातही आणल्या होत्या.

शासनाने जंगलबंदी, वन्यप्राण्यांच्या शिकारीवर बंदी केल्याने जंगलावर अवलंबून राहणाऱ्या लोकांसमोर उद्योगाची, उदरनिर्वाह अन्नाची समस्या निर्माण झालेली आहे.स्थलांतरित शेती, नैसर्गिक पाऊसावर अवलंबून असणारी शेती, वस्तुनियम, वेठबिगार व जमीनीचे हस्तांतरण अशा अनेक आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत.डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते, "देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय

# OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***


उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी ती पुरेशी मात्र निश्चित नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचा संबंध जोपर्यत उत्पन्नाच्या वितरणाशी जोडला जात नाही, तोपर्यंत सर्व विकास हा निरर्थक ठरतो.उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान जोपर्यंत उंचावणार नाही, तोपर्यंत वाढत्या उत्पन्नाच्या प्रमाणास अर्थ प्राप्त होणार नाही. आर्थिक विकासासोबतच सामान्य माणसाचे राहणीमान, आरोग्य शैक्षणिक विकास यासह सामाजिक व आर्थिक सेवा सुविधा उपलब्ध होणे, सामूहिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे; हे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल."[१२] म्हणूनच आदिवासी जमातीच्या जीवनातील समस्या खरोखरच सोडावयाच्या असतील, तर समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय मुख्य प्रवाहात या जमातीला आणल्याशिवाय त्यांच्या विकास होऊ शकत नाही, हे सुर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे.

**३.४. शैक्षणिक समस्या :**

महाराष्ट्रातील आदिवासी जमात ही शिक्षणाच्या बाबतीत उदासीन आहे. मात्र अलिकडे शिक्षणाचे प्रमाणात वाढ होत आहे. ही आनंदाची बाब म्हणता येईल, मात्र ती पुरेशी नाही. आदिवासी जमातीतील मुलामुलींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पालकांच्या काही समस्या आहेत. जमातीच्या सामाजिक, आर्थिक दर्जाचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम झाला आहे. या जमातीतील युवकांना अनेक गंभीर, भयानक दिव्यातून खडतर प्रवास करावा लागतो

आदिवासी जमातीची मुख्यत्वेकरुन वसति ही प्रामुख्याने धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक नगर, सोलापूर, पुणे, ठाणे, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ व मुंबई या जिल्ह्यात आहे. यातील . या जिल्ह्यामधील जमातीचे लोक मोठ्या शहरात मजूरीसाठी धाव घेतात. काही सुरत, बरडोली, बडोदा, सेल्वासा, पुणे, बँगलोर यासारख्या मोठ्या शहरात जातात. अशा मजुरांची मुले गावाकडच्या शाळेत जात असतांना मध्येच त्यांची शाळा बंद होते. तसेच शेजारील शहरात, कारखाने, बांधकाम, ऊसतोडणी, रस्तेबांधणी यासारख्या कामाला जाणाऱ्या मजूरांचे, कुटुंबाचे शहराकडे हंगामी स्थलांतर होते. अशा मजूरांच्या मुलांचीही मध्येच शाळा बंद पडते. हे **शैक्षणिक स्थगन** ही एक मोठी समस्या आहे.

आदिवासी जमातीच्या कुटुंबात प्रत्येकाला पोटासाठी काही ना काही काम करावेच लागते. मुले शाळेत गेली म्हणजे अधिकचा आर्थिक भार कुटुंबावर पडतो. म्हणून शाळा बंद होते. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे हवे ते शिक्षण या जमातीतील लोक आपल्या मुलांना देऊ शकत नाहीत, म्हणून **गळतीचा** मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुलींना घरकाम, लहान मुलं सांभाळणे, शेतीची कामे करावी लागतात. विवाह लवकर केले जातात. मुलांना गुरे, बकऱ्या चारणे, त्यांच्यासाठी चाऱ्याची व्यवस्था करणे, शेतीची कामे करावी लागतात, त्यामुळे कुटुंबाला हातभार लागतो. याचाच परिणाम म्हणून शाळेकडे पाठ फिरविली जाते.

शाळेत होणारे अध्ययन- अध्यापन त्यातील संकल्पना, संबोध हे स्थानिक जीवन, बोली भाषेत असावेत. जेणेकरुन पाठ्यविषयांचे आकलन सहज होईल. नाहीतर अध्यापन व अध्ययनात मोठे अंतर निर्माण होईल. **प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यामधील अंतर** ही एक समस्या आहे.

. दीर्घकालीन सुटी, दळणवळण सुविधांचा अभाव, शिक्षकांच्या बदल्या याही कारणांमुळे तसेच नुसतं शिकून काय करावं, नोकरी लागत नाही असा दृष्टिकोन यासारख्या कारणांचा परिणाम आदिवासी जमातीच्या शिक्षणावर होत आहे.

भारतीय संविधानातील कलम ३४२ अन्वये जे अधिकार, हक्क व सवलती या जमातीला दिलेल्या आहेत, तेही येथील स्वकीय आणि राजकीय सत्ता, शासन उपभोगू देत नाही, हक्कांपासून वंचित ठेवते, म्हणून अभियांत्रिकी, वैद्यकीय सारख्या अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रात अनेक आदिवासी युवकांना मुकावे लागत आहे.

प्राथमिक, आश्रमशाळेतील शिक्षकांना, मुलांसाठी अन्न शिजवून देणे, जनगणनेचे काम, वेगवेगळ्या निवडणूकांचे काम अशी अनेक कामे करावी लागतात. त्याचाही परिणाम शिक्षणावर होऊन समस्या निर्माण होत आहे.

श्री. एन. एल. जाधव या संशोधकांनी नासिक जिल्ह्यात आदिवासींच्या शिक्षणाच्या प्रगतीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात श्री. जाधव यांना शैक्षणिक जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या आढळून आल्या. त्यासंदर्भात ते लिहितात, "आदिवासींचे एकंदरीत जीवनच दारिद्र्य, नशा, सावकार, भगत यांच्या चक्रव्यूहात सापडले आहे. या सर्व बाबींचा अनिष्ट परिणाम हा पाल्यांच्या शिक्षणावर होतो. आदिवासी भागात बहुसंख्य शिक्षक हे त्या गावात राहत नाहीत. तेथील बोलीभाषेशी ते अपरिचित आहेत. शैक्षणिक कामाबरोबरच सुकडी वाटप, कुटुंब नियोजन, प्रौढ शिक्षण संस्था इत्यादी कामेही शिक्षकांनाच करावी लागतात. तसेच आर्थिक दारिद्र्यामुळे मुलांनी अर्थार्जन करावे अशी पालकांची अपेक्षा असल्यामुळे आश्रमशाळेतील गळतीचे प्रमाण वाढते. वर्ग १ ते ४ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रचलित अभ्यासक्रमाचे आकलन होणे कठीण जाते. शेतीचा हंगाम आणि

सुगीच्या दिवसांत तर विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे आश्रमशाळा ओस पडतात."[१३] आदिवासी जमातीत स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. लहान भावंडांची देखभाल आणि घरची कामे करावी लागतात. शाळेत शिक्षिका नसल्यामुळे पालकांना मुलींबाबतीत असुरक्षितता वाटते. "वयात आलेल्या मुलींना सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेतून काढले जाते. त्यामुळे मुलींच्या वाढत्या वयाप्रमाणे शाळेत जाण्याचे प्रमाण घटते."[१४] अशा अनेक समस्यांमुळे स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

एकूणच, आदिवासी जमातीत शिक्षणासाठी अजून खूपच जाणीव जागृतीची गरज आहे. "दारिद्र्यामुळे शिक्षण नाही आणि शिक्षण नाही म्हणून दारिद्र्य घालविता येत नाही."[१५] त्यामुळे दारिद्र्य, स्थलांतर, उदरनिर्वाहासाठी मुला-मुलींना कामे करावी लागतात. भाषा, दळणवळणाच्या अपूर्ण सूविधा, गळती व स्थगन, स्त्री साक्षरतेचे कमी प्रमाण अशा अनेक शैक्षणिक जीवनातील समस्या अधोरेखित करता येतात.

**३.५. कुपोषण समस्या :-**

आदिवासींच्या जीवनात असणारी ही एक भयानक समस्या आहे. आदिवासींच्या सर्वच जमातींमध्ये कुपोषणाची समस्या दिसून येते. साधारणतः कोरकू, कोलाम, माडिया गोंड, भिल्ल, कोळी ढोर, वारली, कातकरी या जमातींमध्ये कुपोषणाची समस्या विशेषकरुन आढळून येते. हे कुपोषणाचे प्रमाण साधारणतः माता आणि बालकांमध्ये जास्त आढळते. गर्भवती आदिवासी महिलांना पुरेसा आहात नसल्यामुळे जन्मतःच मुले कमी वजनाची असतात. अशा कुपोषित बालकांचा मृत्यू होतो. आर. पी. सिरसकर यांनी १९६९ मध्ये 'महाराष्ट्र राज्यातील आदिवासी समस्या' या ग्रंथात लिहितात, "आदिवासी दुर्गम व घनदाट जंगलात राहतात. आदिवासी हा भोळाभाबडा व अबोल स्वभावाचा आहे. आदिवासी बोलीभाषेचा प्रश्न ही एक महत्वपूर्ण समस्या आहे. आदिवासींमध्ये **कुपोषणाची भीषण समस्या** आहे. आदिवासीमधील वाढती व्यसनाधीनता, आदिवासींची शेती करण्याची पद्धती अत्यंत मागास, अज्ञानपणा आणि अंद्धश्रद्धा इत्यादी."[१६] या समस्या त्यांच्या वाट्याला आहेतच, त्यासाठी शासनाच्या रोजगारांच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे.

‘‘सामान्य शारीरिक वाढीकरीता, विकासाकरीता, कर्बोदके, प्रथिने आणि स्निग्ध पदार्थांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे जीवनसत्व आणि खनिजांची आवश्यकता उत्तम शारीरिक स्वास्थ्याकरीता असते. या सर्व घटकांपैकी एकाची कमतरता म्हणजे कुपोषण होय.’’[१७] साधारणतः ‘‘पौष्टिक जीवनसत्वांचा अभाव म्हणजे कुपोषण होय. ’’[१८] अशा पौष्टिक जीवनसत्वांचा अभाव महाराष्ट्रातील आदिवासी बालकांमध्ये दिसून येतो.

महाराष्ट्रात फारच थोड्या आदिवासींकडे शेती आहे, जी आहे तीसुध्दा मोठ्या प्रमाणावर डोंगर उतारावरची डोंगराळ भागात आहे. भिल्ल व टोकरे कोळी जमातींना खानदेशात इंग्रजांनी जमिनी इनाम दिलेल्या आहेत. मात्र त्याही त्यांच्याकडे आज फारच कमी प्रमाणात आढळून येतात. अशा जमिनींचा हलका पोत असल्यामुळे शेतातून उत्पन्नही फारसे मिळत नाही. कमी उत्पन्न, इतर उत्पन्न स्त्रोतांचा अभाव, अज्ञान, बेरोजगारी इत्यादींमुळे बऱ्याच आदिवासी कुटूंबांना एकवेळ जेवणाचीही भ्रांत असते. त्यामुळे बालकांचे कुपोषण ही सर्वात मोठी समस्या आदिवासींमध्ये दिसून येते. ‘‘गेल्या वर्षी भारतातील महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी भागात वय वर्ष ६ च्या आतील जवळपास ९००० मुलांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने कुपोषणामुळे मृत्यू झाला आहे. दर महिन्याला सरासरी ५०० पेक्षा जास्त मुलं कुपोषणाला बळी पडतात.’’[१९] इतके भयानक स्वरुप या समस्येचे आहे, त्यामुळे ही समस्या केवळ आदिवासींची न राहता ती एक जागतिक समस्या बनली आहे.

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

**३.६. कर्जबाजारीपणा व वेठबिगारी :-**

अज्ञान, गरिबी व रोजगारांचा अभाव याचा परिणाम म्हणून आदिवासींच्या जीवनात कर्जबाजारीपणा व वेठबिगारी ही समस्या निर्माण झाली आहे. भारतात देवाण-घेवाणासाठी वस्तुविनीमय पध्दत अस्तित्वात होती. सर्व व्यवहार याच माध्यमातून होत असत. मात्र इंग्रजांचे राज्य भारतावर प्रस्थापित झाल्यानंतर पैशाच्या माध्यमातून व्यवहार होवू लागले.त्याचा प्रत्यक्ष परिणाम आदिवासींच्या दैनंदिन जीवनावर झाला. तसेच इंग्रजी सत्तेमुळे जंगलावरील अधिकारही आदिवासींचे कमी झाले.उत्पन्नाचे साधनांचा अभाव आणि बदललेले विनीमयाचे माध्यम याचा एकत्रित परिणामांमुळे आदिवाशांना कर्ज घ्यावे लागले. कर्जवसूलीच्या नावाखाली त्याच्या अज्ञानाचा फायदा घेत सावकार, जमीनदार, व्यापारी इत्यादींनी त्याची जमीन हडप केली. कर्जबाजारीपणा, नापिकी, सावकार व बँकाचा ताण अशा अनेक कारणांमुळे आदिवासी आत्महत्या करायला लागले, ही एक गंभीर बाब आहे.

कर्ज आणि आदिवासी हे समीकरण असल्यासारखे आहे. सावकारी वा जमीनदाराचे कर्ज फेडण्यात त्याचा प्रामाणिकपणा असतो. कधी कधी आदिवासींच्या पिढ्याच कर्जात बुडतात. म्हणून डॉ. गोविंद गारे लिहीतात, "आदिवासी कर्जात जन्मतो, कर्जातच वाढतो आणि कर्जातच मरतो"[२०] ही आदिवासींची व्यथा नेमक्या शब्दातअभिव्यक्त केली आहे.

आदिवासींना सावकार, जमीनदार यांच्याकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी वेठबिगारीपणा सुरु झाला. त्यात एकच व्यक्ति वेठबिगारीच्या सापळ्यात न राहता संपूर्ण कुटूंबच त्यात अडकत होते.हा एक आर्थिक शोषणाचाच प्रकार होता.जमीन खंडाने घेवून त्यात कुटूंबासह शेतात कष्ट करणे, घेतलेले पैसे परतफेड अशक्य असल्यास त्यांच्याकडे रात्रंदिन राबत राहणे. ही वेठबिगारी निग्रोंच्या गुलामीसारखीच होती.शासनाने त्यावरती बंदी आणली असली तरीही समस्या पूर्ण सुटलेली आहे, असे नाही.

**३.७. धर्मांतराची समस्या :-**

भारतात इंग्रजांचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांनी इथे ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि प्रचार सुरु केला.त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेतला जातो.प्रलोभन दाखविले जाते आणि त्याच्या आधारे धर्मांतर केले जात. त्यामुळे अनेक प्रश्नांना आदिवासींना सामोरे जावे लागते.

**३.८. राजकीय समस्या :-**

कोळी महादेव, भिल्ल, आंध, गोंड यासारख्या काही जमाती सोडल्या तर इतर जमाती राजकारणापासून अलिप्त आहेत.मोजक्याच जमाती राजकीय सत्तेचा उपभोग घेतात. गावात / पाड्यात काही ठराविक कर्मचारी, पोलीस पाटील वा सरपंच यांच्याच कडे अधिकार असल्याने आदिवासींवर अन्याय होतांनाही दिसतो.

राजकारणात अनेक ठिकाणी आदिवासी राखीव पदांवर निवडून जरी आले तरी सत्ता आणि निर्णय बिगर आदिवासीच घेतात.त्यामुळे आदिवासींची गळचेपी केली जाते.आदिवासी महिला प्रतिनिधींची तर जास्तच हेळसांड होते.त्यामुळे राजकीय समस्या सोडविण्यासाठीही जनजागृती होणे आवश्यक आहे.

**३.९ अंधश्रध्दा :**

आदिवासी हे निसर्गाच्या सानिध्यात, जंगल, डोंगर-दऱ्या यांच्यात वास्तव्य करतात. प्रगत जगापासून ते लांब असल्यामुळे जगातली घडामोड त्यांच्यापर्यंत उशीरा पोहचते. वृक्ष, चंद्र-सूर्य, डोंगर-दऱ्या आणि अमानवी गोष्टींवरच त्यांचा विश्वास आहे. अज्ञान आणि निरक्षरतेमुळे हा समाज दैववादी बनलेला आहे. आदिवासी जमातनिहाय देवदेवता वेगवेगळया दिसून येतात. देवदेवतांचे पूजन कुटूंब व गावपातळीवर दिसून येते.मानलेला नवस एखादे कुटूंब फेडते.तर देवीच्या यात्रेत सर्व गाव सामील होते.नारळ, धान्य, कोंबडी, बकऱ्याचा नवस मानला जातो. आजारी पडल्यास दवाखान्यात न जाता भगताकडे आजारी माणसाला घेवून जातात. त्यासाठी कोंबडे वा बकऱ्याचा बळीही दिला जातो.आपल्या भौतिक जीवनातील समस्या सोडविण्याची दैवी शक्ती आधार घेताना दिसतो.भूत, पिशाच्च, दैवी चमत्कार यावर त्यांची श्रध्दा असते. एकंदरीत अज्ञानामुळे निर्माण झालेली अंधश्रध्दा ही आदिवासी जीवनातील मोठी समस्या आहे.

**३.१० शेतीविषयक समस्या :**

आदिवासी जमातींमध्ये शेती करण्याच्या आदिम कलापासून वेगवेगळया पध्दती आहेत. ह्या शेती प्रामुख्याने वृक्ष तोडून करत, डोंगर उतार, सपाट जागा अशा ठिकाणी शेती करत. फिरती शेती, टप्प्याटप्प्याची शेती आणि स्थिर शेती असा आदिवासींच्या शेतीचा प्रवास झाला आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी आपला उदरनिर्वाह करण्यासाठी वेगवेगळे व्यवसाय करत असतो. यात अंगमेहनतीचे व कलाकुसरीचे काम वा उद्योग असतो. जंगलातील मध, डिंक, कंदमुळे जमा करणे, गवत, लाकडाचे भारे व मोळ्या विकणे, शिकार करणे, पशुपालन करणे, शेती करणे, जागले वा मजुरी करणे अशी अनेक कामे ते करतात. यात शेती करणाऱ्यापेक्षा भूमिहीन वा मजूरी करणाऱ्यांचेच प्रमाण अधिक आहे. जे आदिवासी शेती करतात, त्यांनाही तुटपुंजे उत्पन्न मिळते, अज्ञान, तंत्रज्ञानाच्या व पाण्याच्या अभावामुळे शेतीविषयक अनेक समस्या निर्माण होतात.

शासनाकडून मिळालेल्या बक्षीस इनामी जमिनी वा लिजवर मिळालेल्या जमिनींचा पोतही चांगला नसतो.जंगलबंदी, अल्पभूधारकता, अतिक्रमण, शेतीवर मिळालेल्या अनुदानावर, पुढारी व अधिकारी यांना पैसे हडप करणे अशा अनेक शेतीविषयक समस्या गंभीर स्वरुपाच्या आहेत.

**३.११ बेरोजगारी :**

उदरनिर्वाहासाठी आदिवासी लोक पूर्वापार अनेक प्रकारची कामे करतात.यापैकी ९० टक्के त्यांचा वेळ उदरनिर्वाहासाठी जात असे. शिकार, जागली करणे, जंगलातील मध, डिंक जमा करणे, बांबू तोडणे, शेती वा मजूरी , हस्तकला करणे यात जात असे. मात्र कालांतराने यात बदल होत गेले. इंग्रजी सत्तेने यात अनेक बदल झाले.जंगलावर शासनाने निर्बंध लादले.आपल्याच जमिनीला आदिवासींना बेदखल व्हावे लागले. शेतावर राखण घालणारा जागले, शेतात राबणारा मजूर, नावा हाकणारा, वाद्य वाजविणारा आदिवासी पोटासाठी भटकू लागला. कुटूंबाचा उदरनिर्वाह पूर्ण होत नाही.रस्त्याच्या कामात, कारखान्यातला मजूर झाला. शहराकडे स्थलांतर होऊ लागले. आधुनिक तंत्रविज्ञानाने तर मजुराचे कामही कमी केले. अनेक मजूर बेरोजगार झाले.शहराकडे त्यांचे स्थलांतर होऊ लागले. खेडे-पाडे ओस पडू लागले. म्हाताऱ्या माणसांचे हाल होऊ लागले. अशा अनेक समस्या त्यांच्या जीवनात निर्माण झ ााल्या.

**३.१२ आरोग्यविषयक समस्या :**

प्रगत समाजापासून लांब राहणारा, पारंपारिक व धर्मविषयक वेड असणाऱ्या आदिवासींच्या जीवनात अनेक प्रकारच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण झालेल्या आहेत.अज्ञान आणि अंधश्रध्दा असल्यामुळे वेगवेगळे आजार होतात. मात्र रुग्णाला डॉक्टर वा दवाखान्यात न घेऊन जाता त्यास बरे करण्यासाठी वेगवेगळया प्रकारच्या जडीबूटीचा वापर करतात. डॉक्टरांपेक्षा जमातीय भगतावर त्यांची गाढ श्रध्दा आहे. त्यामुळे अनेकदा बाळंतपणातच स्त्रियांचा मृत्यू होतो, रुग्ण दगावतात. जादूटोणा, अंगारे-धुपारे, मंत्र-तंत्र, जडीबुटी इत्यादींचा वापराचा वाईट परिणाम आदिवासींच्या जीवनावर होतो.

रोजच्या रोज आंघोळ करीत नसल्यामुळे अनेक प्रकारचे त्वचारोग होतात. पिण्याचे अशुध्द व अस्वच्छ पाणी, डास,चिलटे, मच्छर यांच्यामुळे डायरिया, काविळ, मलेरिया यासारख्या आजारांना तोंड द्यावे लागते.

पावसाळ्यात खाण्याची विशेष आबाळ आदिवासींची होते, त्यामुळे झाडपाला, कंदमुळे यावर गुजराण करावी लागते. सकस आहार नसल्यामुळे कुपोषण, बालकांचा मृत्यूदर जास्त आदिवासींमध्ये दिसून येतो. विडी, तंबाखू, गांजा, भांग व दारु यांच्या व्यसनाचा शरीरप्रकृतीवर परिणाम होऊन कौटूंबिक व शारीरिक समस्या निर्माण होतात.लांब डोंगर-दऱ्यात वास्तव्य असल्यामुळे वैद्यकीय सेवाही त्यांना वेळेवर मिळत नाही. काही आदिवासी जमातींमध्ये विवाह बाह्य शरीरसंबंधाना मोकळीकता आहे त्यामुळे अनेकांचे विवाह अस्थिर झालेले आहेत.तसेच कमी वयात विवाह यासारख्या कारणांमुळे अनेक प्रकारचे लैंगिक व गुप्तरोंगासारख्या समस्या त्यांच्या जीवनात निर्माण होतात.

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

**३.१३ सामाजिक समस्या व सांस्कृतिक समस्या :**

जगातील १९३ देशांनी शाश्वत विकासाची ध्येये स्विकारली. सबका साथ, सबका विकास अशा विश्वासात्मकतेचा हा मार्ग आहे. हा विकास साध्य करण्यासाठी जगातील अनेक देशांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण स्विकारले. तंत्रविज्ञानाच्या नेत्र दिपक प्रगतीने तर जगातील देश शेजारी शेजारी आले. दळण-वळण, तंत्रविज्ञान, सॅटेलाईट, इंटरनेट, मल्टिमिडीया या व अशा नवनवीन शोधांमुळे जग एक Global Village बनले आहे. या जागतिकीकरणाच्या फायद्याप्रमाणे त्याचे तोटेही आहेत. जगातील अनेक लहान- लहान समूहाप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात अनेक समस्या निर्माण झ ाल्या आहेत.

आदिवासी जमातींचा शिक्षण, नोकरी, व्यवसाय वा रोजगाराच्या निमित्ताने बाह्य जगाशी संपर्क येत आहे. इतर जातीच्या लग्न पध्दती व रिवाजाप्रमाणे आपल्या जमातीत वा कुटूंबात लग्न व्हावीत असे त्यांना वाटते म्हणून हुंडा पध्दत वेगळ्या मार्गाने आदिवासींमध्ये शिरकाव करत आहे.ब ह्ुतेक आदिवासी जमातीत वधुमूल्य किंवा देज देण्याची पध्दत आहे.ती रु.१/- पासून ३ रुपयापर्यंत व धान्य देण्याची पध्दत होती. मात्र हे देण्याची मुलाची ऐपत नसेल तर त्याला नवऱ्यामुलीच्या बापाच्या घरी घरगडी म्हणून काम करावे लागत असे. मात्र अलीकडे ही हुंडापध्दत वा वधुमूल्य अधिकच वाढल्यामुळे अनेक गरीब कुटूंबांना या समस्येची झळ सोसावी लागत आहे वधुमूल्य वाढल्या मुळे पलायन विवाह करतात.अलीकडे आदिवासींमध्ये ही एक समस्या बनली आहे.

काही आदिवासी जमातीत विवाहपूर्व व विवाहबाह्य शरीरसंबंध ठेवण्याची प्रथा दिसून येते.मात्र त्यासंबंधीचे त्यांचे काही नियम ठरलेले आहेत. मजुरीच्या निमित्ताने गेलेले अनेक पुरुष वेश्यागमनाला बळी पडतात. शरीरसंबंधाचे व्यवस्थित ज्ञान नसल्यामुळे अनेक प्रकारचे गुप्तरोग त्यांना होतात. त्यामुळे अशांच्या कुटूंबांना या समस्येला तोंड द्यावे लागते.

आदिवासी जीवनशैली, सामाजिक व सांस्कृतिक रुढी, प्रथा, परंपरा इत्यादींचे संस्करण व नियम करणारी संस्था म्हणजे आदिवासींचे युवागृह वा गोटुल होय. यात एका पिढीचा वारसा दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होऊन त्याचे प्रतिबिंब दिसत असे. तरुण - तरुणींना यात स्वातंत्र्य होते. मात्र जागतिकीकरणाच्या या युगात अशी युवागृहे लयास गेली. सहज सामाजिक व सांस्कृतिक रुढी, प्रथा व संस्कारांचे होणारे हस्तांतरण थांबले. दुसऱ्या वाईट गोष्टींचा शिरकाव झाला म्हणून अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या.

आदिवासी जमातीतील विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील मारिया गोंड, कोलाम व पारधी ह्या जमातीत स्त्री-पुरुष अंगभर वस्त्र परिधान करत नाही. काही आदिवासी जमातीत पुरुष लंगोटी लावून राहतात. मात्र जागतिकीकरणामुळे, बाह्य जगाच्या संपर्कामुळे पुढारलेल्या समाजाच्या वेशभूषेचा परिणाम त्यांच्यावर झाला. तेही अंगभर वस्त्र परिधान करतात. मात्र बेकारी, गरिबी व दारिद्र्यामुळे ते अंगभर वस्त्र परिधान करु शकत नसल्याच्या समस्येला त्यांना सामोरे जावे लागते.

निसर्ग धर्म हाच आदिवासींचा धर्म आहे. निसर्गातील डोंगर-दऱ्या, नदी, वीज, वारा, पशु-पक्षी यात ते देवत्व शोधतात. आधुनिक जगाच्या संपर्काने त्यांना अडाणी, अज्ञानी समजून त्यांचा धर्म व जादूविषयींच्या श्रध्दांना छेद गेला आहे. त्यामुळे आदिवासींच्या जीवनाचा हा एक मोठाच पेच निर्माण झाला आहे.

जग झपाट्याने बदलत आहे. औद्योगिक विकासामुळे खेडे व ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलत आहे. कारखानदारी, वीज, शेतीकरीता पाण्याच्या अतिमागणीस्तव मोठमोठे प्रकल्प उभे राहत आहेत, त्यामुळे सर्रास जंगलातील वृक्षांची कत्तल केली जाते.अशा ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी समूहांचे, पशु-पक्ष्यांचे **स्थलांतर** होवून वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. नर्मदा सरोवरासारख्या मोठ्या प्रकल्पांच्या वेळेला अनेक आदिवासी पाड्यांचे **विस्थापन** केले. हक्काची जमीन घर जाऊन दुसऱ्या लांबच्या ठिकाणी त्यांचे विस्थापन केले जाते.तेथील सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाशी एकरुप होतांना अनेक अडचणी निर्माण होतात.त्याचप्रमाणे मुआवजा वेळेवर मिळत नाही. अनेकांना वेळेवर मदत मिळत नाही. प्रसंगी आंदोलने होतात.याला हिंसक वळण लागते. प्रकल्पांची कामे रखडली जातात.अशा अनेक समस्या पुनर्वसन करतांना निर्माण होतात.

जगाच्या सांस्कृतिक संपर्कामुळे आदिवासी **कलांचा ऱ्हास** होत आहे. आदिवासींचे संगीत, नृत्य, वारल्यांची चित्रकला,दगडी व लाकडावरचे कोरीव काम, मुखवटे बनविण्याची कला लोप पावत आहे. त्यामुळे सांस्कृतिक जीवनातील ही चिंताजनक समस्या आहे.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

**३.१४ आतंकवादी प्रवृत्तींच्या समस्या :**

ही समस्या प्रामुख्याने विदर्भातील चंद्रपूर, राजूरा, कोरपना, मूल, गडचिरोली, अहेरी, एटपल्ली, सिरोंचा, धानोरा, कोरची, गोंदिया व देवरी या भागांमध्ये आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे भ्रष्टाचारी प्रशासन, व्यापारी व सावकारांनी आदिवासींच्या अज्ञान व भोळेपणाचा फायदा घेवून केलेले आर्थिक शोषण, पुढाऱ्यांची भंपकबाजी यामुळे तेथील आदिवासी तरुण वैतागला होता. म्हणून शोषणाविरुध्द संघर्ष, न्यायाची भूमिका घेत ही चळवळ उभी राहिली. त्यांच्या ध्येयामुळे त्यांना सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळाला. भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांची मनमानी, सामान्य जनतेचे होणारे शोषण त्यामुळे या चळवळींना चांगलेच खतपाणी मिळाले. पुढे पुढे ही चळवळ उग्र स्वरुप धारण करुन हिंसाचाराकडे वळली. अनेक सुशिक्षित तरुण - तरुणी या चळवळीकडे आकर्षित झाले, त्यांना प्रलोभने दिली गेली. पोलिसांचा खबऱ्या समजून बऱ्याच जणांच्या हत्या केल्या गेल्या, शेजारील छत्तीसगड मधील माओवादीही यात शिरले. आज या नक्षली कारवायांमुळे शासन व जनता परेशान आहे.अनेक आदिवासी कुटूंबाची नक्षलवादी समस्यांमुळे वाताहत झाली आहे.

**३.१५ भाषिक समस्या :-**

आदिवासी जमातींचा बाह्य जगाशी संपर्क येत आहे. शिक्षण, नोकरी व व्यवसायामुळे त्याला प्रचलित भाषा समजणे गरजेचे होते. जागतिकीकरणाच्या परिणामाने आज जगातील अनेक आदिवासी समुहांच्या भाषा लोप पावल्या आहेत. कोळी महादेव, टोकरे कोळी, ठाकर यांच्या बोली मृत झाल्या आहेत, त्यामूळे मातृभाषेपासूनची ही विलगता मोठी समस्या बनली आहे. शाळेत ही मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यम असणाऱ्या शाळेत आदिवासी मुलांना अध्ययनास अनेक अडचणी निर्माण होतात. आदिवासी भाषांचा लोप म्हणजे त्यातील लोकसाहित्याचाही लोप हे सूत्र लक्षात घेता भाषिक समस्येचे गांभिर्य लक्षात येईल.

**४. आदिवासींच्या समस्येवरील उपाय :-**

१. शासनाने वनविषयक धोरण बदलले पाहिजे म्हणजे हक्काची जागा त्यांना मिळेल.

२. शासन दरबारी त्यांचे अनेक प्रस्ताव वर्षानुवर्षे धूळ खात पडत असतात, त्यावर लवकर निर्णय झाले पाहिजे.

३. स्वच्छ राहणीमान, शुध्द पेयजलाची, गटारांची व्यवस्था व नियोजन केले तर अनेक आरोग्याच्या समस्या निर्माण होणार नाहीत.

४. जास्त भाषिक संख्या असणाऱ्या आदिवासी बोलीभाषेत सुबक पाठ्यपुस्तकांची निर्मिती करुन त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे.

५. बाह्य जगाच्यासंपर्कामुळेआदिवासीकलांचाऱ्हासहोतआहे. त्यासाठी संग्रहालय तयार करावेत. त्यांचे नृत्य, संगीत, कलांना राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी करुन घेतले पाहिजे.

६. आदिवासींच्या संदर्भात शासनाचे धोरण पारदर्शी असावे. कृषिविषयक योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली पाहिजे. भ्रष्ट अधिकाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे.

७. नक्षलवादासारख्या निर्माण झालेल्या समस्यांमुळे अनेक तरुणांच्या जीवनाची वाताहत झालीआहे, अशा वाताहत झालेल्या कुटूंबांना शासकीय मदत, सवलत हवी. तरुणांना मुख्य प्रवाहात सामील करायला हवे.

८. कारखाने, वीज व जल प्रकल्प उभारतांना तेथील वस्त्या, लोकसंख्या विचारात घेवून जागेची निवड करायला हवी. विस्थापन सुकर व्हावे.

९. व्यसनाधीनतेच्या संदर्भात त्यांच्यात जाणिव जागृतींच्या कार्यक्रमांचे नियोजन करायला हवे.

१०. शासनाने हक्काचा रोजगार उपलब्ध करुन दिला तर बेकारी व दारिद्रय कमी होण्यास मदत होईल.

११. गर्भवती महिलांना व बालकांना सकस आहाराची योजना राबवायला हवी.

१२. हुंडा प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

१३. ग्रामीण भागात खेड्या-पाड्यापर्यंत वैद्यकीय सेवांची उभारणी झाली पाहिजे.

**५. निष्कर्ष :**

१. शाश्वत विकासध्येयांची आदिवासी समूहासाठी साध्य करणे ही एक तारेवरची कसरत आहे.

२. दारिद्रय, जल, अन्न,वस्त्र व निवाऱ्यांची ध्येय साध्य करणे म्हणजे आदिवासींच्या समस्या निर्मूलण करणे होय.

३. महिला व बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक व त्याला बळी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

४. शुध्द पाण्याचा अभाव, त्यामुळे अनेक शारीरिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

५. जागतिकीकरणामुळे आदिवासींच्या कलांचा ऱ्हास होत आहे. युवागृहे/गोटूलचा ऱ्हास होत आहे.

६. गावापासून रोजगाराच्या निमित्ताने बाहेर असणाऱ्यांमध्ये बाह्य शारीरिक संबंधामुळे अनेक दुर्धर गुप्तरोंगाची समस्या निर्माण झाली आहे.

७. शेतीविषयक शासकीय धोरणांचा परिणाम म्हणून बेरोजगारी व दारिद्रयाचे प्रमाण वाढले आहे.

८. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेत शासकीय अधिकारी- कर्मचारी, जमिनदार, सावकार त्यांचे शोषण करतात. वेठबिगारी करावी लागते. या सर्वांचा एकत्रित परिणामातून अन्याय, शोषणास विरोध करण्यासाठी आदिवासी चळवळ निर्माण होऊन त्याचे पर्यावसान नक्षलवादात झाले आहे.

९. बाह्य संपर्कामुळे भाषा, राहणीमान विषयक समस्या निर्माण झाल्या आहेत.

१०. बेरोजगारी, दारिद्रय व समाजमान्यता यामुळे दारु पिण्याचे प्रमाण अधिक असून व्यसनाधिनता ही समस्या निर्माण झाली आहे.

११. वीज व जलप्रकल्प, कारखाने व विकास करतांना आदिवासींचे विस्थापन व पुनर्वसन मोठ्या प्रमाणात केले जाते.

१२. जागतिकीकरणाने आदिवासींच्या जीवनात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक व भाषिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

१३. शासकीय ध्येय-धोरणे, नियोजनबध्द कार्यक्रम, आरोग्य व शैक्षणिक सुविधा, जाणिवजागृती केली तर आदिवासींच्या जीवनातील समस्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

**६. संदर्भः**

[1] www.wikipedia.org/wiki/poverty

[2] शाश्वत विकासाची सामाजिक किंमत, लोकसत्ता, रविवार २ फेब्रूवारी २०२०

[3] www.en.wikipedia.org/wiki/poverty

[4] श्री. दांडेकर आणि रथ, भारतातील दारिद्र्य, साठे प्रकाशन, पुणे, १९७३, पृ.२४

[5] डॉ. गोविंद गारे, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ८८

[6] S. R. Walimbe, People of India, Maharashtra, (Gen. Edi. K. S. Singh), Vol. XXX, Part 2, Popular Prakashan Pvt. Ltd., Mumbai, 2004, P. 1086

[7] प्रा.डॉ.नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे १९८६, पृ.३६१

[8] डॉ. गोविंद गारे, आदिवासींचा प्रश्न आणि परिवर्तन, अमृता प्रकाशन, औरंगाबाद, १ ९९४, पृ. १३

[9] Navinchandra Jain, Tribal in Maharashtra State, in Vidyut Joshi (Ed.), Tribal Situation in India, Issues in Develoment, Rawat Publication, Jaipur, 1998, P. 100

[10] डॉ. गोविंद गारे, आदिवासींचा प्रश्न आणि परिवर्तन, उ. नि., पृ. ४९)

[11] सोनक सुषमा व इतर, सिमिंग्टन अहवाल, १९३८, शिफारशी निष्कर्ष, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे, मार्च, १९८६, पृ. २७

[12] A. K. Sen, Poverty, Inequalisty and Un employment, Economic and Political weekly, Mumbai, August 1975, P. 12

[13] एन. एल. जाधव, नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजातील शैक्षणिक प्रगती, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, १९९० पृ. क्र. ४७

[14] दैनिक सम्राट, दि. २२/१/२००७, पृ. ५

[15] डॉ. गोविंद गारे, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ४३

[16] R. P. Siraskar, Problems of Tribal in Maharashtra, Seminar on Tribal situation in India,

[17] Indian Institute of advance of study, Simla, 1969, P. 87

[18] Type of differences of Malnutrition,www.malnutrition.org.

[19] “About Malnutrition” www.malnutrition.org/2007/apr/chi-mutrition.html

[20] Child Malnutrition in Maharashtra: Interim status report 2005,yashada, p.12

[21] आदिवासींचे प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४, पृ.१३